म. ग्रं. सं. ठाणें

विषय

ग्रंथालय क्रमांक

लेखक द्वा. ना. रणदिवे

सन

पुस्तकाचें नांव शिक्षक-पूर्वार्ध

25

को० का० २
३२३ पु०सं० १११०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# शिक्षक

ही गोष्ट

## द्वारकानाथ नारायण रणदिवे

सब जीज्ज, पिंपळगांव, जिल्हा नासिक

यांणीं रचली.

निचा हा

## पूर्वार्ध

मुंबईंत

इंडियन प्रिंटिंग प्रेस मध्यें छापिला.

सेपटम्बर, सन १८८३.

(या पुस्तकासंबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.)

किंमत एक रुपया.

TO

**Vinayek Ganesh Samorth, Esq.,**

HEAD CLERK, SUPERINTENDING ENGINEER'S OFFICE, RAJPUTANA,

**THIS FIRST VOLUME OF THE TALE**

IS DEDICATED

BY

THE AUTHOR.

परम प्रिय मित्र

राजमान्य राजश्री

# विनायक गणेश समर्थ

राजपुतानांतील सुपरिन्टेन्डींग इंजीनियरचें

आफिसांतील हेड क्लार्क यांस

हें पुस्तक ग्रंथकर्त्यानें

अत्यंत प्रितीनें

अर्पण केलें

आहे.

पुणे

## ग्रंथकर्त्यांचें त्यांच्या मित्रास पत्र.

परम प्रिय मित्रा,

बहुत दिवसांचें वचन आज पुरें करीत आहें–आणि तेंही पण अपुर्तेपणीं; परंतु माझा नाइलाज झाला. सरकारी कामामुळें मला पाहिजे तशी फुरसुद मिळाली नाहीं. यामुळें हा पूर्वार्धच तुजला दाखवावा असें वाटलें. तो छापून प्रसिद्ध करण्याचा हेतु नव्हता; परंतु कांहीं मित्रांच्या आग्रहामुळें हा छापिला आहे. हा तुला पसंत पडला तर उत्तरार्ध लिहिण्याचें हातीं घेईन. कळावें.

पिंपळगांव बसवंत, जिल्हा नासिक,
तारीख १९ सप्तंबर, १८८३.

हा. ना. र.

# ग्रंथकर्त्याची त्याच्या प्रिय वाचकांस विनंती.

प्रिय वाचकहो,

के साहेबांनीं लिहिलेला सन १८५७ सालांतील बंडा-चा इतिहास वाचला ह्मणजे माझ्या गोष्टीस काय आधार आहे तो आपल्यास समजेल. लार्ड डालहौसीच्या कारकि-र्दीचे भाग, त्याच इतिहासाच्या आधारानें लिहिले आहेत. तसले भाग नाव्हल सारख्या पुस्तकांत असणें बरोबर नाहीं असें प्रथम मनांत येऊन ते या पुस्तकांतून गाळण्याचा वि-चार होता; परंतु ते मुख्य गोष्टीशीं बरेच लागून आहेत, व कायम ठेविले तरी हरकत नाहीं, असें कांहीं मित्रांनीं सुचविल्यावरून तसेच ठेविले आहेत. ते आपल्यास रूचती-ल तर पाहावें.

या पूर्वार्धांत 'शिक्षका'नें आपलें काम वाजवीपेक्षां जास्त बजाविलें आहे. व या संबंधानें पुस्तक दोषास पात्र आहे असें मी समजतों. परंतु याबद्दलही मतभेद आढ-ळेल. अस्तु. त्याचा आपण आतां लौकरच निर्णय कराल.

गोष्ट अगदीं नवीन धर्तीवर लिहिण्याचा यत्न केला आहे. तींत पुष्कळ व्यंगें असतील यांत संशय नाहीं. तथा-पि त्यांकडेस लक्ष न देतां ही अल्प सेवा स्वीकारावी अशी विनंती आहे.

उत्तरार्धांत कानपूरच्या कतलीची हकीगत यावयाची आहे. परंतु कतलेची जागा पाहिल्याशिवाय तें वर्णन चां-गलें लिहितां येणार नाहीं ह्मणून कानपुरास जाऊन ती जागा पाहून नंतर उत्तरार्ध लिहिण्याचा हेतु आहे.

परंतु प्रियवाचकहो, हा पूर्वार्ध आपल्यास कसा आवडतो तें समजलें पाहिजे; नाहीं तर व्यर्थ श्रम करण्यांत काय अर्थ आहे? या पूर्वार्धापैकीं पहिले २४ भाग तर सन १८८१ च्या आक्टोबरच्या सुमारासच लिहून तयार झाले होते. शेवटचा २५ वा भाग मात्र येथें लिहिला. अशा गोष्टी वाचण्यापासून फारसा फायदा नाहीं असें मनांत येऊन ते भाग तसेच जुन्या पुस्तकांत बांधून ठेविले होते. ते कांहीं मित्रांस दाखविल्यावरून त्यांणीं गोष्ट पुढें लिहावी किंवा झाली आहे तेवढी तरीं छापावी असा मोठा आग्रह केला. त्यावरून ते भाग गेल्या डिसेंबर महिन्यांत छापखान्यांत पाठविले. दुसऱ्या कामामुळें फुरसुद बहुधा नव्हती ह्मणून पुस्तक छापून पुरें होण्यास इतके दिवस लागले. असें असूनही नजर चुकीनें यांत अशुद्धें राहून गेलीं आहेत. याबद्दल आपण क्षमा करावी अशी मोठ्या नम्रपणें विनंती करितों.

पिंपळगांव,<br>
ता. १५ सप्तंबर १८८३. } ह. ना. र.

---

## सूचना.

पान ७० यावरील पहिल्या तीन ओळीं नंतर १० वा भाग समजावा.

# शिक्षक.

## भाग १.

सायंकाळचा सुमारें दोन तीन घटका दिवस राहिला आहे अशा समयीं एक तरुण प्रवासी सह्याद्रीच्या एका घाटाच्या पायथ्यास येऊन पोहंचला. त्याच्या चेहऱ्यावरून व पेहरावावरून असें दिसत होतें कीं, त्याचा प्रवास दोन चार दिवसांपासून सुरू होता, तो सुमारें २८ वर्षांचा सदृढ, आनंदवृत्ति, व गौरवर्ण असा होता. परंतु त्यावेळीं त्याचें तोंड उन्हाच्या तापानें काळसर दिसत होतें. पोशाक धुळीनें भरून त्यावर कोंकणांतील मातीचा तांबडा रंग चढला होता. बरोबर दोन मनुष्यें होतीं; एक, त्याचा जेवण करणारा ब्राह्मण, व दुसरा भाडेकरी. ज्या वेळीं ही मंडळी घांटाच्या पायथ्याजवळ येऊन ठेंपत होती त्या वेळीं आमचा प्रवासी घोड्यावर बसलेला असून बरोबरचे दुसरे दोघे बाजूनें त्याच्या जवळून चालले होते. घाटाच्या पायथ्याजवळ येऊन पोहोंचतांच आमच्या प्रवाशानें चट्कन घोड्यावरून खालीं उडी मारली आणि भाडेकऱ्याकडे वळून ह्मटलें:—

**प्रवासी**—कायरे रामजी, घाट ह्मणतात तो हाच ना?

**भाडेकरी**—व्हय साहेब ह्योच, आतां आपनांस ह्यो चढुनशनी वर गेल पायजे.

**प्र०**—आजचा मुक्काम गांठण्यास किती रात्र पडेल?

**भा०**—सान, एक तास, बगा, रात व्हायिल; येरवाळीच

जायला व्हयिल, पन बगा ती वाट जरा सुमार हायी.

प्र०–रस्ता अडचणीचाच आहे काय? वः!! मग त्याच रस्त्यानें जावयाचें. प्रवासांत अडचणी ह्मटल्या ह्मणजे एक प्रकारची मौज आहे.

भा०–बरहायी सरकार मर्जी. चला तर याच वाटन जायाच. हितन जी मळलेली वाट दिसतीया ती थेटवरत जाऊनशनी रस्त्याला मिळालिया, माझ्या मागून संभाळुन-शनी याहो.

प्र०–अरे हो, चल; कांहीं संभाळण्यास नको; तूं उगाच चल.

मुशाफररावजीनें "कांहीं संभाळण्यास नको" असें ह्मटलें व मोठ्या हुशारीनें घाट चढण्यास आरंभ केला खरा. परंतु कांहीं वेळ वर चढून गेल्यावर बरेंच संभाळण्यास पाहिजे, असें त्याच्या अनुभवास आलें. प्रथमतः बराच वेळ रस्ता सवघड लागला, परंतु सुमारें घटका दीड घटका चढून गेल्यानंतर पुढें पाहतात तों मनांत किंचित् भीति उत्पन्न झाली.

वाट फारच विकट जागेंतून गेलेली होती. कोंकणांत ज्या वाटेस "पाज" ह्मणतात अशी ती वाट होती. जेथून ते चालले होते तेथें तिची रुंदी फार तर एक हात असेल. वर मोठा एकसारखा चढाव, दोहों बाजूंस मोठमोठ्या दरी, वळून पाहिलें असतां लागलेच डोळे फिरून जाण्यासारख्या खोल. असा तो मार्ग पाहतांच मोठ्या धैर्यवान पुरुषाच्या मनांतही किंचित् भय उत्पन्न झाल्यावांचून राहिलें नसतें. त्याकडे पाहून आमचा प्रवासी क्षणमात्र उभा राहिला. पण तो स्वभावतः मोठा दृढ, मोठा धीराचा व अभिमा-

नी असल्यामुळें त्यास भीतीची तत्क्षणीं लाज वाटली. तो मनांत ह्मणतो, "हा भाडेकरी पहा कसा भ्याल्याशिवाय तकट जात आहे आणि मी भ्यावें काय!" इतकें बोलून लागलेंच हुशारीचें अवसान आणून चालूं लागला. पुढें भाडेकरी, त्याच्या मागून घोडें, मागून आमचे मुशाफर, व शेवटीं त्याचा ब्राह्मण, अशा थाटानें ते चालले. भाडेकऱ्याच्या तर तो पायांखालचाच रस्ता होता ह्मणून तो खुशाल चालला होता. त्यास भीतीचा लवलेशही नव्हता असें तो तोंडानें भाडेकऱ्यांच्या ऐटीवर गाणें ह्मणत होता त्यावरून स्पष्ट दिसत होतें.

बापड्या घोड्याच्या मनांत काय होतें तें मात्र खातरीनें सांगतां येत नाहीं. तोंडावाटे फेंस पडत होता, व फुरफुर शब्द चालला होता, एवढ्यावरून त्यास चढण्याचे बरेच श्रम होत होते असें वाटतें; तथापि एका गोष्टीनें त्यास आनंद झाला असावा—पाठीवरचें मुशाफररूपी ओझें अशा अवघड जागीं उतरलें होतें. मुशाफररावजींची वृत्ति त्यासमयीं भीतिसूचक तर नव्हतीच. उलटा त्यांच्या चेहऱ्यांत एका प्रकारचा आनंद दिसत होता. "आज शूरत्वाची परीक्षा आहे, किंचित्मात्र भीति दाखविली तर माझें मनच मला नामर्द ह्मणेल," असें मनांत आणून हुशारीच्या ऐटीनें पाऊल टाकीत चालले होते. पण ती कशी झाली तरी ऐटच. अंतर्यामींची भीति समूळ नाहींशी झाली नव्हती असें, पाऊल किंचित् काळजीनें व हळुहळु टाकीत होते, एवढ्यावरून स्पष्ट दिसत होतें. शेवटीं भटजीबुवा चालत होते. त्यांची मात्र दुर्दशा होत होती असें वाटतें. पाऊल अगदींच हळू, बेतानें, कधीं मध्येंच, हात टेंकीत, घडिघडी उभे रहात-मध्येंच

"रावसाहेब काय ही वाट?–मी पडलों जरा हात द्या" असें ह्मणत रावसाहेबांच्या बोटांचा आश्रय धरून मोठ्या कष्टानें वरतीं जात होते. याप्रकारची ही विकट मजल त्यांणीं चांगली एक घटकाभर केली. शेवटीं ते सर्व सुखरूप सह्याद्रीच्या माथ्यावर येऊन पोंहचले. मग मागें फिरून आलेल्या रस्त्याकडे पाहूं लागले, तों तेथें क्षणभर विसावा घ्यावा असें त्यांस वाटलें. कारण त्या भयंकर चढणीनें ते सर्व दमले होते; व वाराही त्यावेळीं शीतळ वहात होता; तशांत समोरचा देखावाही मोठा मनोहर दिसत होता. त्यावेळीं सूर्य क्षितिजाखालीं जात होता. सूर्यास्ताची शोभा नेहमींच आल्हादकारक. तशांत आमचे मुशाफर त्यावेळीं सह्याद्रीच्या एका उंच टेंकडीवर उभे होते; ह्मणून तेथून सभोंवारची शोभा वर्णनीय दिसत होती. समोर सूर्याचें तें अस्ताचलीं आलेलें आरक्त बिंब, जणुं काय सर्व दिवसाच्या प्रवासाचा श्रमच सुचवीत आहे काय? असें दिसत होतें. चोहोंकडेस त्या लहान लहान सर्व टेंकड्या, त्यांजवर पडलेल्या सोनेरी किरणाचा प्रकाश कमीकमी होत चालल्यामुळें त्या लवकरच रात्रीच्या अंधकारांत अदृश्य होण्याच्या बेतांत होत्या. खालीं पाहिलें तर तो विकट मार्ग. दोहों बाजूंस त्या भयाण व फार खोल, किर झाडीनें लोपलेल्या दरी. हें सर्व पाहून आमचा मुशाफर कांहीं वेळ सानंदाश्चर्यानें स्तब्ध राहिला. आणि आपल्याशींच ह्मणतो–तेथें दुसऱ्या कोणाजवळ बोलणार जवळ एक भाडेकरी पण तो अडाणी व मूर्ख; दुसरा ब्राह्मण पण तो अक्षरशून्य. ज्ञानसंपन्न मनुष्यांजवळ कोणी आपल्या योग्यतेचा जोडीदार नसेल तर त्यांस त्यांचें मनच.

आपला सोचती असें वाटत असतें. ह्मणून तो आपल्या मनाशीं ह्मणतो, ' काय अप्रतिम शोभा ही? कवींचें मन रममाण होण्यास ही जागा योग्य होय! हें मोठें आश्चर्य होय कीं, अशा सृष्टिसौंदर्यानें अमच्या देशांतील महाराष्ट्र कवींची कवनशक्ति कधीं जागृत झाली नाहीं.' अशा देखाव्यांत कांहीं वर्णन करण्यासारखें आहे असें त्यांस फारसें कळून आल्याचें समजत नाहीं. कदाचित् मी त्यांचे ग्रंथ वाचले नसतील पण एवढें खरें कीं स्काट, वर्डस्वर्थ, टॉमसन यांनीं जसें सृष्टिसौंदर्याचें वर्णन केलें आहे तशा मासल्याचें वर्णन आपल्या कवींनीं कोठें केलें असेल, असें मला वाटत नाहीं. याचें कारण काय बरें असावें? सृष्टिसौंदर्य सर्व ठिकाणीं सारखेंच. मग असें कां बरें?" अशा व यासारख्याच दुसऱ्या विचारांच्या गर्दींत आमचे विद्वान राजश्री असतां भाडेकरी मध्येंच ओरडून ह्मणतो.

भा०-कां रावसाब, हित वाडोळस बसलाया? आनी कितीस बसायाच? मजल आटापली पायजे; रातवी पडाय लागलीया.

मु०-अरे हो खरेंच. कायरे रामजी, येथून रस्ता किती लांब राहिला बरें?

भा०-कसलाजी लांब, त्यो बगा त्या तितन वांयिच गेल कीं ह्मोर थेट रस्ताच.

मुशाफरजीस "त्या तितन वांयिच गेल कीं ह्मोर" याचा अर्थ बरोबर समजला नाहीं, व ती विचारण्याची वेळही नव्हती. ते समजून उमजून आडमार्गानें चालले होते. तशांत रात्रीची छायाही पडत चालली. काळोखाची भीति नव्हती तरी शुभ्र चांदण्याचीही फारशी मदत

नव्हती; कारण त्या दिवशीं शुद्ध चतुर्थी होती. ह्मणून पुढें क्षणभरही न रेंगाळतां मुशाफरजी घोड्यावर बसले आणि भाडेकऱ्यानें दाखविलेल्या वाटेनें नीट चालले. भाडेकरी व ब्राह्मण हे दोघे बोलत मागाहून पाठोपाठ निघाले.

भा०— कायर बामना, हे तुझे यजमान कुठल र?

ब्रा०— कोठचे कां असतना? पण आपण रस्त्याला कधीं मिळूं तें सांग अगोदर.

भा०— पन भितोस कां बामना; तुला कोन हित खायाला बसलाय? हाट् खुळ्या! पन् खरच पुसशील तर किं नाहीं, ही समुरली पन्नास हात वाट बांयिच सुमार हायि. हित बग रानबी लईच किर लागूनशनी गेलया. आनी खरच रात्रीच एकल्याच्यान जान्याची हितन बग सुईच नाहीं. पन राव, भिऊं नका. मी हाय बग तुझ्या संग. तूं कां भितोस? पन भटा, आतां गेल्यावर थोडकस बेसन देशिल का?

ब्रा०—(मनांत फार भिऊन जातो आणि आपल्याशींच ह्मणतो) आमचे रावसाहेब मोठे विलक्षण आहेत. रस्ता सोडून आडमार्ग मुद्दाम कां बरें घ्यावा? उगाच शूरत्वाची फुशारकी मिरवायाला जातात. आंगांत शक्ति ह्मटली तर तेवढीच—जेवायाला बसले तर दुसरी चपाती सगळी कांहीं जात नाहीं. काल दोनप्रहरीं अमळ ऊन लागलें तेव्हां कसें पाणी पाणी करीत होते आणि शूरत्वाचा डौल मारितात! शूरत्व कोठें शक्तीशिवाय बोललें आहे? आणि जे खात नाहींत त्यांला शक्ति कसची?

पुष्कळ खात नाहींत असा आमचे भटजीबुवांचा ह्मणण्याचा अर्थ असावा; कारण त्यांचा आहार व जेवणाव-

रची भक्ति जरा वर्णनीय होती. मग ( मोठ्यानें ह्मणतो ) "शिन्च्या, आमच्या जिवांत जीव नाहींत आणि तुला बेसन लाडू आठवूं लागले काय?"

भाडेकरी महा काशीकर होता. "बेसन" ह्मणजे "बेसनाचे लाडू" हें त्याच्या ध्यानांत नव्हतें. ह्मणून तो आपल्याशीं ह्मणतो, "ह्यो बामन लाडू कसलं ह्मनतोया. खुळाबिळा तर न्हाईना. पन खरच बामन लाडू झोडणार भल बस्ताद!!" लाडवाचें स्मरण भटजीबुवाच्या बोलण्यावरून होतांच एखाददुसरा लाडू भटजीबुवाकडून उपटावा असें आमच्या रामजीबुवांच्या मनानें घेतलें. आणि खरेंच, लाडू कोणास नकोत? पण भटजीबुवा वस्ताद आहे. तो आपली डाळ एकाएकीं शिजूं देणार नाहीं हें त्याणें दोन तीन दिवसांच्या अनुभवावरून जाणलें होतें. कारण एक दिवसही भटजीबुवाच्या हातून त्या बिचाऱ्यास फराळाचें कांहींच लाभलें नव्हतें. आतां ही संधी बरी आहे असें त्याणें पाहिलें. भटजीबुवा भीतीनें कांपत आहेत व भटजीबुवांनीं आपल्यास शिवीही दिली आहे, हें सर्व क्षणभर मनांत आणून रामजी रागाचें अवसान आणितो; ताठ उभा राहतो; आणि हातांतील दांडकें उगारून ह्मणतो:-

"भा०—आर भटा, कुनालर शिन्च्या ह्मनतोस? तुला दावूं कां कोन शिन्चा तो.

ब्रा०—( भितो ) छी:, रामजी, अरे खुळ्या, मस्करीनें ह्मटलें ह्मणून इतका कां रागावतोस? हा लंवडीच्या! अरे शिन्च्या ह्मणजे आमचें तोंडीं लावणें. कांहीं झालें तरी शिन्च्या ह्मणायाचेंच. अरे, माझ्या पोटच्या पोरांला देखील मी शिन्च्या ह्मणतों. त्यांत कांहीं अर्थ आहे कीं काय!

भा०—( अधिक चवताळलेंसें करून ) भटा, त्वांड आटपूनशनी बोल बर. हित हायि माझ्या संग गांठ. मी भाडेकरी हाय. पन जातीचा अस्सल मराठा हाय. दखल हायिका ? लंवडीच्या कुनाला म्हनतोसरे ? तूं आपल्या पोरांसनी शिन्च्या म्हणतोस तर म्हन जा बापडा खुशालपन मला तस म्हनशीलका काय ? बर, आतां बगुनशान घेतों कस हाय तें; हो तूं पुढं एकटा, मी तुझ्या संग न्हाई येत जा.

हें ऐकून गोविंद्भटजी फारच भितात आणि म्हणतात:—

भट०—हें काय बरें असें रामजी ? मी या रात्रीचा कसा बरें एकटा पुढें जाऊं ?

भा०—कां बरें ? येकल्याला कां न्हाईं जातां येत ? अर, येकल्याला फराळ कसा भराभर जातोया ? तित कुट दुकल्याची गरज लागतिया ? तित मातर रामजीची सोबत न्हाईं लागत; आनि हितच हवी काय ?

भटजीबुवांनीं रामजीच्या बोलण्याचा झोंक ताडला.

भटजी—( मोठ्यानें हंसून ) वः, अरे रामजी, तूं भारी रे खोल मनाचा ! अरे एवढ्याशासाठीं केवढा द्राविडीप्राणायाम केलास हा ? तुला प्राणायाम काय तो समजणार नाहीं. तूं वेड्या पडलास शूद्र ! अरे फराळाचें पाहिजे होतें तर प्रथमच कां नाहीं बोललास ? (बगलेंतला बटवा हातांत घेतो.) हा पहा बटवा बहुगुणी आहे. यांत तुला पाहिजे तें आहे. पान आहे, सुपारी आहे, तंबाखू आहे आणि थोडेंसें फराळाचेंही आहे. मी पहा ह्या बटव्यांत लाडू म्हण, कडबोळीं म्हण, किंवा निदान पोहे म्हण, कांहीं तरी टा-

कल्याशिवाय कधीं बाहेरच पडावयाचा नाहीं. चालतांन जरा दम लागला कीं, टाकलें कांहीं तोंडांत. त्याणें पहा, रामजी, आपली प्रकृति अगदीं साफ राहते.

• भटजीबुवांच्या बोलण्याचा सर्व हेतु रामजीचा राग घालविण्याचा होता. तो बगलेंतला बटवा भटजीबुवांच्या हातांत येतांच बराच शेवटास गेला. मग भटजीबुवा ह्मणतात.

**भट०**—रामजी, ही घे चंची; यांत पान, सुपारी, तंबाखू पाहिजे तर आहे; पण बेट्या तुला हवें फराळाचें. थांब तर मग

असें ह्मणून बटव्यांतून एक पितळेचा डबा काढितो आणि तो उघडून त्यांतील एक लाडू रामजीस देतो व एक आपल्याकरितां काढून घेतो.

याप्रकारें आमचे गोविंदभटजी व भाडेकरी रामजी, चैनीनें फराळ करून पुनः चंची सोडून मोठ्या डौलानें पानसुपारी खात व अनेक तऱ्हेच्या गप्पा झोंकीत हळुहळु मोठ्या नोकीनें चालले होते, व मध्येंच केव्हां केव्हां रामजीचा गाण्याचे चुटके ऐटीवर ह्मणण्याचा सपाटा सुरू होता इतक्यांत पुढें गेलेलें घोडें रिकामेंच मागें आलें. वर रावसाहेब नव्हते. हें पाहून भाडेकरी व ब्राह्मण भयानें अगदीं गांगरून गेले. पुढें त्यांस पाऊल टाकण्याचा हिय्या होईना, इतक्यांत एकाएकीं बंदुकीचा आवाज झाला तो ऐकून तर ते फारच भिऊन गेले. परंतु पुढें मनुष्यांची गलबल ऐकूं येऊं लागली ती ऐकून भाडेकरी ब्राह्मणास आपला हात देऊन मोठ्या धीरानें पुढें गेला.

---

## भाग २.

इकडे रावसाहेब घोड्यावर बसून भाडेकऱ्यानें दाखविलेल्या वाटेनें नीट चालले असतां सुमारें शंभर कदम गेल्यावर पुढें पाहतात तों वाट एका टेंकडाच्या बाजूनें खालीं एका लहान ओवळींतून वळगानें गेली आहे. उजव्या बाजूस बऱ्याच उंचीची या वाटेला कांहींशी समांतर अशी टेंकडीची रांग लांबच्या लांब लागून गेली असून डाव्या बाजूस जमीन किंचित् उतरती होती. त्यांत लहान लहान झुडपांची गर्दी असून जवळूनच बारीक "खळखळ" असा शब्द ऐकूं येत होता, त्यावरून त्या झुडपांत जवळच लहानसा पाण्याचा प्रवाह वाहत असावा असें अनुमान होत होतें. चंद्र आपल्या निकट किरणांनीं पुढील वाट प्रकाशित करीत होता. समय किंचित् भीतीचा आहे असें आमच्या मुशाफरजींस वाटलें. आणि ते मनांत ह्मणतात, "त्या भाडेकऱ्यानें रस्ता जरा बिकट ह्मटला तो त्या मागच्या चढणीस किंवा ह्या भयप्रद जागेस उद्देशून ह्मटला हें कळत नाहीं. मागच्या चढणीवर तर रामजीबुवा गाण्याच्या चैनींत चालले होते; आणि आतां?"—(वळून मागें पाहतात तों मागें भाडेकरी व भट हे कोठें दिसले नाहींत, ते वळगाच्या आड होते)—"आतां टेंकडीचा मार्ग राहिला आहे, तेव्हां बिकट जागा ती हीच वाटते" असें ह्मणत आहेत तों घोडा एकदम उभा राहिला. पुढें पाऊल घेईना. व कान उभारून, टवकारून पाहूं लागला: रावसाहेब आतां मात्र भ्याले. परंतु मागाहून येत आहेत त्यांची वाट पाहत बसावें तर रावसाहेबांस ठाऊक होतें कीं, आपला भट हांसेल.—तो नेहमीं त्यांस हांसत असे.—पुढें जावें

तर घोडा पाऊल घेत नाहीं. अशा समयीं त्यांनीं क्षणभर विचार करून घोड्यावरून खालीं उडी टाकली आणि "खरें शौर्य तें हेंच" असें मनांत आणून आणि दोघे येत आहेत ते फार लांब खचित नसतील असें ताडून काय आहे तें पाहण्याकरितां ते पुढें निघाले. घोडें भाड्याचेंच तें तेथेंच उभें राहिलें. प्रथमत: त्याच्या दृष्टीस कांहीं पडलें नाहीं परंतु आणखी पुढें गेले तों वाट अम्मळ उजव्या हाताकडे वळून खालीं उतरती होत गेली होती असें दिसलें. त्या वाटेनेंच ते खालीं उतरले. मग मागें पाहतात तों घोडोबा मागच्या पावलानें पोबारा करीत आहेत, समोर पाहतात तों सुमारें दोनशें हातांवर खालीं रस्ता आहे. मग कांहींसे पुढें जाऊन डाव्या बाजूकडे त्यांनीं नजर फेंकली त्यावेळीं जें कांहीं अरिष्ट त्यांच्या दृष्टीस पडलें तें पाहतांच मोठ्या धैर्याचा मनुष्यही गर्भगळित झाला असता.

सुमारें पंचवीस तीस हातावर एका मोठ्या वृक्षाखालीं एक बैल मरून पडला आहे व त्याच्या जवळ एक मोठा भयंकर वाघ शेपटी हालवीत उभा आहे, एक पंजा बैलाच्या फव्यावर आहे, तोंड—बैलाच्या मानेचे लचके तोंडींत असल्यामुळें—रक्तानें लाल झालें आहे! रावसाहेब तें स्वरूप पाहतांच एकदम थबकले. ह्या भयंकर अरिष्टांतून आतां आपली निभावणी खचित होत नाहीं असें त्यांस वाटलें. आतां मागें जावें तर आपले पाय वाजून तो काळस्वरूपी पंचानन आपणास तत्क्षणीं फाडून टाकील असें त्यांस वाटूं लागलें, पुढें तर जाण्याची सोयच नव्हती. ह्मणून ते तेथेंच उभे राहिले. काय चमत्कार आहे पहा! ज्या वेळीं मनांत भीति नव्हती त्यावेळीं त्यांस चालण्यास

कांहीं वाटलें नाहीं, व आपलीं पावलें वाजतील ही शंकाही त्यांच्या मनांत आली नाहीं. परंतु जेव्हां मनांत भीति उभी राहिली तेव्हां जी गोष्ट ते पूर्वी निःशंकपणें करीत होते तीच आतां त्यांस करितां येईना. त्यांस ठाऊक होतें कीं, जोंपर्यंत त्या काळरूपी व्याघ्राची पाठ आपल्याकडे वळलेली आहे तोंपर्यंत जिवाची कांहीं आशा आहे. पण जर कां एकदां त्याची व आपली नजरानजर झाली तर मग आपण मेलोंच, मग आशा नाहीं. आपली व त्याची दृष्टादृष्ट होत नाहीं असा मुनासब धीर देण्यासाठीं (लिहिण्यास मोठें आश्चर्य वाटतें) ते स्वतः वाघाकडे टक लावून पाहत उभे असल्यामुळें "दृष्टादृष्ट" होण्यास एका क्षणाकडून तयारीच होती. असो. रावसाहेब एकसारखे त्या वाघाकडे टक लावून स्तब्ध आहेत इतक्यांत त्यांच्या झोंप्याच्या वरच्या बाजूकडील टेंकडीकडे कांहीं खसखसलें, आणि त्या क्षणीं वाघानें त्या बैलाच्या मानेवरील तोंड वर करून मागें फिरविलें, तों मुसाफराची व त्याची दृष्टादृष्ट झाली. मग काय विचारावें ! ! तें अति भयंकर स्वरूप व आपण एकटे. त्यावेळीं आमच्या प्रवाशांच्या मनाची जी स्थिति झाली तिचें वर्णन कोण करील? आमचे प्रवासी जातीनें हूड होते व धीराचे होते खरे, परंतु हा हूडपणा व धैर्य कांहींसें इंग्रजी विद्येनें आलें होतें. असें उसनें धैर्य कोठें प्रसंगीं उपयोगीं पडणार आहे काय? रावसाहेब अगदीं गर्भगळित झाले.

इकडे वाघानें त्यांस पाहतांच त्यांवर मोठ्या आवेशानें उडी मारण्याचें अवसान घातलें व तत्क्षणीं एक उडी मारली. त्या बरोबर रावसाहेब धडकीनें बेशुद्ध होऊन जमिनीवर खालीं पडले. दुसऱ्या क्षणांत वाघाची दुसरी उडी

रावसाहेबांच्या आंगावर येऊन पडणार, इतक्यांत बंदुकीच्या मोठा आवाज झाला आणि तो वाघ ज्या अवसानांत होता त्या अवसानांतच जेथल्या तेथें खिळून राहिला. समोरच्या टेंकडीवरून कोणी शिकाऱ्यानें अचूक गोळी मारून आमच्या रावसाहेबांच्या प्राणसंकटाचा शेवट केला.

मग लागलेच मागून भाडेकरी व ब्राह्मण व समोरून कांहींशा आडव्या रस्त्यानें पांचसहा असामी शिकारी असे त्या ठिकाणीं येऊन पोहंचले. भाडेकरी व ब्राह्मण हे येतांच आपल्या यजमानाच्या साहाय्यास गेले. शिकारीमंडळी प्रथमत: वाघा[illegible] गोळी व तो अगदीं गतप्राण झाला आहे अशी खातरी करून घेऊन मग कोणी त्याचे पाय, कोणी कान, कोणी दांत पाहूं लागले. त्या मंडळींत जो पुढारी होता त्याणें त्याची [illegible]सून [illegible]क्यापर्यंत लांबी मोजली. आणि " भला अटकीचा [illegible] आहे असें ह्मणून साल्हादवृत्तीनें जेथें बाकीचे हे तिघेजण होते त्यांकडेस आला. त्याच्या मागून त्याचे सोबतीही आले. ते जवळ येऊन पाहतात तों त्यांस कोणी एक प्रवासी अगदीं निचेष्ट पडला आहे, व त्याच्याजवळ दोन मनुष्यें असून तीं त्यास शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असें दृष्टीस पडलें. हें पाहून त्या शिकारीमंडळींतील लोक आपल्या पुढाऱ्यास ह्मणतात, " महाराज, आपल्या बंदुकीनें आज ह्या पडलेल्या ब्राह्मणाचा जीव वांचविला ही केवढी आनंदाची गोष्ट !!"

पुढारी—खरेंच; ईश्वराची कृपा. हा गृहस्थ खालून एकटा रात्रीचा बिनधास्त चालतांना पाहिला तेव्हां मला तर हा बहादुर आपण होऊन मुद्दाम जणुं आपला जीव

देण्यास जात आहे काय असें वाटलें. पण खरेंच अंताजी-राव, ती जर कां गोळी चुकती तर हा बिचारा मेलाच असता. असो. खरोखरच ईश्वरानें आज मोठी कृपा केली.

इतक्यांत आमचे प्रवासी शुद्धीवर आले आणि आपलें संकट, आपल्या समोर असलेल्या भाग्यवान् पुरुषाच्या लोकोत्तर पराक्रमामुळें नष्ट झालें, असें जेव्हां त्यास समजलें तेव्हां त्यानें लागलेंच उठून त्या मुख्य शिकाऱ्याच्या चरणावर मस्तक ठेविलें.

क्षणमात्र अवलोकनानें आमच्या चतुर प्रवाशानें ताडिलें कीं, आपल्या समोर कोणी श्रीमान् व शूर मराठा शिकारी सरदार उभा आहे. त्याचें तें उंच धिप्पाड शरीर, त्या मोठ्या मिशा व कल्ले व तो सुंदर चेहरा; हीं सर्व चिन्हें मराठे सरदारकुळांतील जन्माची साक्ष देत होतीं. त्याची ती उत्तम कापडाची इंग्रेजी धर्तीची इजार व तो "कोट," जरीची फीत लावलेली ती टोपी, कंबरेस तें इंग्रेजी 'काडतुसें' ठेवण्याचें तोसदान, व हातांतील ती मोलवान "रायफल" बंदुक, हीं सर्व श्रीमंती व शिकारीचा नाद यांचीं सूचक होतीं.

आमचे रावसाहेब लागलेच त्या सरदारास ह्मणतात. "हे वीरश्रेष्ठा, आपण मला आज जीवदान दिलें. आपण आपल्या कर्तबगारीनें माझा प्राण वांचविला याबद्दल मी आपला जन्मभर उपकार विसरणार नाहीं."

हें त्याचें नम्रतेचें व सौजन्याचें भाषण ऐकून तो सरदार ह्मणतो, "अहो मुसाफररावजी! आपण या रस्त्यानें कोठें चालला होतां? हा रस्ता रात्रीच्या समयीं अगदीं उपयोगीं नाहीं, हें तुह्मांस कोणीं सांगितलें नाहीं काय?"

प्रवासी—ही आडवाट अम्मळ निकट आहे असें मी ऐकिलें होतें. परंतु मीच होऊन या वाटेनें मुद्दाम आलों. असो. माझा अविचार आपल्यासारख्या थोर व कृपाळु गृहस्थांची ओळख होण्यास कारण झाला. हें मी मोठें भाग्य समजतों.

सरदार आमच्या प्रवाशाच्या भाषणानें आनंद पावले. त्यांस वाटलें कीं, हा गृहस्थ सभ्य, विचारशील, विद्वान असून याची भाषणपद्धतीही सुरस आहे. मग यास आपल्या गांवीं घेऊन जावें असें मनांत आणून त्यास ह्मणतात,—"मुशाफर-रावजी तुह्मी आतां आमच्याबरोबर नगरास यावें अशी आमची इच्छा आहे. तुह्मांस येण्यास कांहीं हरकत आहे काय?"

प्र०—महाराज, हरकत कशाची? तशांत मलाही नगरास जावयाचें आहे. परंतु नगर येथून अर्ध्या मजलेवर आहे असें मला कोणी सांगितलें आहे ह्मणून आतां येथें जवळच गांव आहे तेथें आजची रात्र राहण्याचा बेत होता. तशांत आजची मजल बरीच झाली आहे. या उपर आपली जशी आज्ञा होईल.—

सर०—नगरास कोणाकडे?

प्र०—महाराज मी मुंबईहून आलों. नगरास राजेसाहेबांकडे जाणें आहे. त्यांनीं मला बलाविलें आहे.

स०—काय ह्मणतां! तुमचें नांव नारायणराव कीं काय?

प्र० होय महाराज.

स०—अहो संताजीराव—काय ही मौज!!—अहो हे आपले मुंबईहून येणारे विद्वान् नारायणराव. ज्यांचेविषयीं आजच हेंडरसन साहेबाचें पत्र आलें आहे. वाहवा! ही खाशी मौज!! (सरदार नारायणरावाचा हात धरितात) खासें

राव, आज आमचे 'पंडित बाबाच्या मुखांत जात होते, बा-हवा! संताजीराव आटपा लौकर, ते हुजरे अद्याप आले कीं नाहीं? दोन असामी आतांच जवळच्या गांवीं पाठवा व त्यांस सांगावें कीं, हा वाघ वेड्यांकडून उदईक वाड्यांत आणावा. तुह्मीं येथील बंदोबस्त करून घोड्यावरून लौकर या. नारायणरावजीचें सामान नीट जपून आणा. सामान फार आहे असें दिसत नाहीं. आह्मीं यांना घेऊन जातों. चला नारायणराव. एथून अर्ध्या हाकेवर आपली गाडी उभी आहे. चला.

---

## भाग ३.

आमचे प्रवासी नारायणराव व त्यांचे प्राणदाते सरदार गाडींतून नगरास जाऊन पोंहचेपर्यंत आम्हीं आपल्या वाचकांस नगरची व त्या गाडींतील सरदाराची थोडीशी माहिती सांगितली तर ती त्यांस उपयोगीं पडेल असें वाटतें.—

नगर हें, शहर....पूर या नांवाचें लहानसें एक मांडलिक राज्य दक्षिणेंत. मुंबई इलाख्याखालीं होतें; त्याचें राजधानीचें मुख्य शहर. या राज्याचा विस्तार फारसा नव्हता. याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ऐंशीं मैल असून पूर्वपश्चिम रुंदी सुमारें पस्तीस मैल होती. या लहानशा प्रांताखालीं लहानमोठे एकशें ऐंशीं गांव होते. त्यांत नगर हा गांव सर्वांत मोठा असून तेथेंच राजा नेहमीं राहत असे. नगर हें शहर एका विस्तीर्ण सपाटीवर असून त्याच्या पश्चिमबाजूस सुमारें पांच कोशांवर सह्याद्रि पर्वताची एक रांग आलेली आहे. तिच्यावर चढून गेलें ह्मणजे तेथून एका बाजूस ते विशाल पर्वत; त्यांच्या दरींतील रानांची ती अद्वितीय शोभा; व पलीकडे तो खडकाळ कोंकणप्रदेश यांचा सर्व देखावा एकदम दृष्टीस पडतो. समोर पूर्वाभिमुख उभें राहून पाहिलें असतां....पूर या प्रांतांतील सर्व प्रदेश दिसतो. दूरदृष्टी केल्यानें, सुमारें सात आठ कोशांवर एक लहानशी नदी वाहत चाललेली दृष्टीस पडते. ही नदी दक्षिणवाहिनी होऊन पुढें....या गांवाजवळ कृष्णानदीस मिळाली आहे. नगर व त्याच्या आसपासच्या प्रदेशाची शोभा फारच वर्णनीय आहे. पूर्वेकडील नदी कित्येक ठिकाणीं फार खोल, कित्येक ठिकाणीं

फार उथळ, पण सर्व ठिकाणीं लहानशी चैनीची होडी चालण्यासारखी असल्यामुळें नगरवासी लोक गांवाजवळ नदी असल्यापासून होणाऱ्या सर्व प्रकारच्या सुखाचा अनुभव घेत होते. नदीच्या खोल डोहांत राजाच्या हत्तींस जलविहारास जागा होती व उथळ जागीं बायका व मुलें यांस डुबकण्यास सवड असे. या प्रांताची जमीन फार सुपीक असल्यामुळें शेतकरी लोक खाऊन पिऊन सुखी होते.

या लहानशा सुंदर व सुपीक प्रदेशावर **रावराजे समशेरबहाद्दर** हे राज्य करीत होते. **समशेरबहाद्दर** याचें नांव पूर्वीपासून इतिहासांत प्रसिद्ध आहे. तो प्रतापदिनकर 'शिवाजी'- ज्यानें हा दक्षिण देश कोठें युक्तीनें, कोठें अपल्या अप्रतिम शौर्यानें, कोठें बुद्धिचातुर्यानें, कोठें आपल्या वर्णनीय सौजन्यानें, अशा अनेक तऱ्हेनें मुसलमानांच्या अमलांतून सोडवून त्या ठिकाणीं मराठ्यांच्या नांवाचा झेंडा उभारिला, तो ज्याकाळीं उदय पावला त्या काळीं त्याच्या तेजानें अनेक मनुष्यें प्रसिद्धीस आलीं. त्यांपैकींच रामचंद्रराव हे होते. तो काल दक्षिणेंतील शौर्यास अनुकूल होता. जें शौर्य यवनांच्या प्रतापाच्या प्रखर तेजाखालीं अगदीं लोपून गेलें होतें, तेंच शौर्य, यवनांचें तेज कमी होऊं लागल्याबरोबर चमकूं लागलें. रामचंद्रराव शूर असल्यामुळें, व आपल्या शौर्यास शिवाजीजवळ योग्य स्थळ मिळेल असें त्यास वाटल्यामुळें, तो पंचवीस मनुष्यांसह प्रथमतः शिवाजीस जाऊन मिळाला. जातीनें शिपाई, तशांत शिवाजीसारखा धनी मिळाला. मग काय विचारावें! प्रत्येक लढाईंत शिवाजीनें रामचंद्ररावास शाबासकी द्यावी.

ठाणे

सिंहगड घेतला त्या दिवशीं तर रामचंद्ररावानें कमाल केली. त्या दिवशींच्या लढाईचें पहिलें बक्षिस घेणारा तो सिंहासारखा महायोद्धा तर ईश्वरेच्छेनें राहिलाच नाहीं. परंतु शिवाजीनें आपल्या प्रिय तानाजीस त्या दिवसाच्या शौर्याबद्दल जो किताब दिला असता, तो त्यानें रामचंद्ररावास लागलाच दिला. त्या दिवसापासून रामचंद्ररावास "रामचंद्रराव समशेरबहाद्दर" ह्मणूं लागले. शिवाजीनें स्वतः आपल्या हातानें दिलेली तरवार रामचंद्ररावाच्या हातांत झळकूं लागली. रामचंद्रराव शेंभर स्वारांचा नाईक झाला. नगर व त्याच्या सभोंवारचे दहा गांव त्याच्या स्वाधीन झाले. पुढें समशेरबहाद्दर हे मराठ्यांच्या सैन्यांत नेहमीं स्वतःची पांचशें शिबंदी व शेंभर स्वार यांनिशीं चाकरी करूं लागले. त्या काळीं पदरच्या लोकांस हल्लींप्रमाणें महिनेमहा पगार द्यावा लागत नसे. नियमित तैनात कायती मोठमोठे कामगारांसच बहुधा असे. लाहानसान पायदळ व स्वार यांस कोठेंतरी प्रसंगानुसार लूट, बसण्यास घोडा, हातांत तरवार, व रोजची पोटगी मिळाली ह्मणजे पुरे असे. मग ते पाहिजे त्या सरदाराच्या हाताखालीं चाकरी करण्यास तयार असत. त्यावेळीं मुसलमानांबरोबर लढाईस ह्मटलें ह्मणजे, लोक एका पायावर उभे. त्या परधर्मी लोकांच्या जाचणुकीमुळें लोकांचा वैरभाव पूर्णपणें जागृत झाला होता. तशांत त्याकाळीं चांगल्या शूर सरदारांची उणीव नव्हती. देशांत स्वस्थता असली ह्मणजे सहजीं चालू असणारे हजारो उद्योग, ज्यांच्या योगानें सांप्रतकाळीं लाखों मनुष्यें आपापला निर्वाह करीत आहेत, ते त्यावेळच्या लोकांस ठाऊक नव्हते. देशांत

फारसा व्यापार नव्हता, राजाच्या पदरीं चाकरी मिळण्याची खात्री नव्हती; तेव्हां शूर असूनही गरीब व निरुद्योगी लोकांस लढाई शिवाय दुसरा कोणता धंदा पसंत पडावा? दुसरें असें-लढाईंत गेल्यानें स्वतःचा कांहीं तोटा नव्हता, झाला तर फायदाच होत असे. शिवाजीच्या लढाया नेहमीं फायद्याच्याच असत. शिवाजीस नवीन राज्याची स्थापना करणें होती; ह्मणून त्याची प्रत्येक लढाई विशेषेंकरून लुटीच्या उद्देशानें होत असे. या कारणामुळें त्या काळीं लहानसा पण हिमतीचा व शूर मनुष्य सहज शेंपन्नास लोक आपल्या जवळ ठेवूं शकत असे. रामचंद्ररावास पांचशें शिबंदी व शंभर स्वार यांसह मराठ्यांची चाकरी करण्यास कांहीं कठीण गेलें नाहीं.

रामचंद्ररावामागें समशेरबहाद्दर हें घराणें दिवसेंदिवस फार प्रसिद्धीस येत चाललें. जो मुलूख मुळचा दहा गांवचा होता; तो वाढत वाढत चांगल्या सुपीक अशा दीडशें गांवांचा झाला. मुलखाचा वसूलही त्याप्रमाणेंच वाढला. पेशवे मराठ्यांच्या राज्याचा कारभार पहात असतांही हें सरदारघराणें वाढत चाललें. थोरले माधवराव पेशवे हे गुणग्राही असत. त्यांच्या दरबारांत समशेरबहाद्दर यांस खडी ताजीम असे.

अशा प्रकारें समशेरबहाद्दर कीर्तीनें व संपत्तीनें वाढत चालले असतां ........... पेशवाईचा कारभार पाहूं लागले. ....च्या कारस्थानीपणाविषयीं फार आख्या आहे. परंतु विचारी व दूरदृष्टी लोक आहेत ते ह्मणतात कीं, त्याचें चातुर्य मोठ्या प्रतीचें नव्हतें. त्याच्या चातुर्यास खरें राज्यकारणी चातुर्य ह्मणतां येत नाहीं. त्याची

दृष्टि आपल्या पुण्याच्या किंबहुना आसपासच्या प्रदेशापलीकडे कधीं गेली नाहीं. इंग्लिश कोण, ते आले कोठून, त्यांच्या येण्यापासून सर्व देशावर बरेवाईटाचें कोणतें कार्य होण्याचा संभव होता, ह्याविषयीं त्याच्या मनांत कधीं फारसा विचार आला नसावा. आपली तुंबडी भरावी व आपण असतां आपल्यावर शिरजोर कोणी नसावा एवढीच त्या पुरूषाची इच्छा होती असें दिसतें. एवढेंतरी खरें कीं, त्यास परोत्कर्ष अगदीं सहन होत नसे. सर्व राज्यांत शहाणपणामध्यें, अधिकारामध्यें, व संपत्तीमध्यें आपल्या तोडीचा कोणी नसावा इतकेंच नव्हे, तर आपल्या खालोखालही कोणाची स्थिति नसावी, असें त्यास वाटे. दुसऱ्याची मानखंडणा करून आपला वरिष्ठपणा दुसऱ्यास दाखविणें हेंच कायतें त्याचें चातुर्य असे. आपल्यास सर्वांनीं वचकावें हाच त्याचा आनंद. मोठ्यांचा सभेंत उपमर्द करणें हाच त्याचा मोठा अधिकार. अशा पुरूषाच्या कारकीर्दींत त्याच्या मागें राज्यव्यवस्था सुरळीतपणें चालविण्यासारखे शहाणे लोक तयार झाले नाहींत यांत नवल तें काय? समशेरबहाद्दर यास ताजीम देणें हें या पुरूषास फार वाईट वाटलें. एके दिवशीं सवाई माधवराव यांच्या दरबारांत जेव्हां समशेरबहाद्दर आले तेव्हां भालदारानें "ताजीम" असें रीतीप्रमाणें पुकारलें नाहीं. संताजीराव समशेरबहाद्दर ही नवीन व अपमानाची रीति पाहून विस्मित झाला; आणि पुढें पाऊल न टाकतां ....कडे पाहूं लागला. परंतु ....ची मुद्रा रागीट दिसली. संताजीराव चतुर होता. सभेंतून रागानें मागें जाणें वाईटच. पण अपमान सोसून निमूटपणें बसणें हेंही

वाईट. असें जाणून झटदिशीं एके आंगास वळून पेशव्यांजवळ कांहीं सरदार ताजीमदार उभे होते त्यांत जाऊन मिसळला आणि ती वेळ त्यानें मारून नेली.

संताजीराव फार शहाणा व दूरदर्शी होता. त्याणें दरबारांत झालेल्या प्रकारावरून ताडिलें कीं, पेशव्यांनीं आपली नीति सोडली. अशा धन्याची चाकरी करणें हें त्याला लज्जास्पद वाटूं लागलें. त्याणें देशांत झालेला इंग्लिशांचा शिरकाव व त्यांचें दिवसेंदिवस पुढें पडत चाललेलें पाऊल हें पाहून, हें सर्व पुढें कोणत्या थरास जाणार हें ताडलें. लोकांचें शौर्य, त्यांचें युद्धकौशल्य, त्यांचें राज्यचातुर्य, इत्यादि पाहून त्याची खात्री झाली होती कीं, हे लोक या देशांत सार्वभौमत्व पावण्यास आले आहेत. पेशवाई खचितच लौकर लयास जाईल अशी अटकळ बांधून त्याणें इंग्लिशांशीं स्नेह केला. इंग्रज सरकारानें समशेरबहादरें आपले दोस्त करून त्यांच्याशीं स्वतंत्र तह केला. पुढें बाजीरावाबरोबर इंग्रजांचा जो संग्राम झाला त्यांत समशेरबहादर हे पेशव्याविरुद्ध लढले. इतकेंच नव्हे, तर किंबहुना त्यांच्याच शौर्यानें इंग्रजांस पेशवाई घेणें कांहींसें सुलभ गेलें. असें इंग्रजांस तरी वाटलें असावें; कारण समशेरबहादर यांस त्या मदतीबद्दल रावराजे ही पदवी, सोन्याचा तोडा, मोर्चल व पन्नास गांव, व आपल्या मुलखाचा चिरकाल स्वतंत्र अम्मल हीं मिळालीं. नवीन तह होऊन त्यांत ह्या देणग्या नमूद झाल्या. परंतु त्याच तहांत एक दोन दुसरीं कलमें होतीं; त्यांचा भावी परिणाम, त्या दूरदर्शी संताजीरावाच्याही धोरणांत आला नाहीं. आपण राजे झालों, आपल्यास

सोन्याच्या तोड्याचा व मोर्चेलाचा अधिकार मिळणार, या आनंदांतच तो दंग झाला. आणि खरोखरी असें वैभव प्राप्त झालें असतां कोणास आनंद होणार नाहीं? त्या आनंदांत त्यास दुसऱ्या गोष्टींचा विचार झाला नाहीं. तहाचीं कलमें ऐकत असतां जेव्हां "तुह्मीं आमच्या सल्ल्याशिवाय आपल्या शत्रूंबरोबर लढूं नये. तुमच्या शत्रूंपासून आह्मीं तुमचें नेहमीं संरक्षण करूं" असें कलम आलें तेव्हां त्याबद्दल कांहीं विचार न करितां "ठीक आहे. पुढें वाचा," असें त्याणें ह्मटलें. पुढचें कलम असें होतें:–

"तुमचें राज्य तुह्मी कंपनी सरकाराशीं इमानें इतबारें वागाल तेथपर्यंत पुत्रपौत्रादि वंशपरंपरा चिरकाल चालेल." हें कलम ऐकून संताजीरावास अत्यानंद झाला. त्याला वाटलें, आपल्या राज्याचा पाया आतां शेषाच्या मस्तकावर जाऊन बसला. आतां आपल्या राज्यास भीति नाहीं. समशेरबहादर हें नांव आतां चिरकाल राहील. इंग्रेज आहेत तोंपर्यंत तरी राहील. आणि इंग्रेज या देशांत चिरकाल खचित राहणार असें त्यास वाटलें. "चिरकाल चालेल"!! आणखी काय पाहिजे! अशा आनंदांत व ऐहिक अत्युत्तम सुखाचा अनुभव घेऊन संताजीराव परलोकवासी झाला.

सुखी बापडा!! "चिरकाल" या शब्दास भुलून तो आनंदांत दंग झाला. "पुत्रपौत्रादि वंशपरंपरा" याचा अर्थ पुढें काय होईल हें त्यावेळीं त्यास कळलें नाहीं ह्मणून बरें झालें!

संताजीराव यांच्या मागें जे रावराजे झाले ते आपल्या कुळाप्रमाणेंच जातीनें शूर होते. परंतु देशाच्या दुर्दै-

वामुळें ह्मणा, अथवा कांहीं ह्मणा, त्यांच्या शूरपणाचें तेव्हां कारण राहिलें नव्हतें. सभोंवारचे प्रांतीं एकदोन वेळीं बखेडे झाले त्यावेळीं संताजीरावांच्या मुलाची विरश्री फुरफुरून त्यास आपली तरवार गाजवून आपल्या कुळाच्या नांवाप्रमाणें लौकिक मिळवावा असें वाटलें. परंतु त्या तहांतील कलम त्यास आड आलें. इंग्रज सरकारच्या सल्ल्याशिवाय आपल्या शत्रूंशींही लढाई करण्याची मनाई होती. लढाईस जाण्याविषयीं परवानगी मागतां " तुह्मीं स्वस्थ असा. आह्मीं आपलीं पलटणें पाठवून शत्रूंचा बंदोबस्त करितों. तुमच्या तसूभर जमिनीच्या तुकड्यास भीति नाहीं " असें उत्तर मिळालें. तें ऐकून राजास अम्मळ वाईट वाटलें. त्याणें आपल्या पूर्वजांची तरवार म्यानांतून उपसून मनगटावर तिचें पान पुसिलें आणि मोठ्या शौर्यानें तें हातांत धरून ह्मटलें, " कायरे करूं, हा हात कसा फुरफुरतो आहे. असें वाटतें कीं, जाऊन त्या चोरांची खोड जिरवावी; परंतु उपाय नाहीं." असें बोलून हिरमुसल्या तोंडानें तिजकडे पाहिलें आणि ती पुन्हः म्यानांत घातली. पुढें प्रसंग आले त्यावेळीं तरवार उपसावयास संताजीरावाच्या नातवास हुजऱ्याची जरूर लागूं लागली. कारण ती म्यानांतून बाहेर झट्कन येण्याचीच पंचाईत पडूं लागली. इतका तीस गंज आला. ती वर्षांतून विजयादशमीच्या दिवशीं मात्र एकदां बाहेर दृष्टीस पडे.

रणधीरराव—( त्या गादींतील सरदार ) हे संताजीरावाचे नातू. हे आपल्या बापाच्या पश्चात् सन १८३० इसवींत, गादीवर बसले. त्यावेळीं त्यांचें वय बत्तीस वर्षांचें होतें. त्यांच्या अंगीं आपल्या आज्याचें शौर्य नव्हतें. हा

त्यांचा अपराध कोण ह्मणेल? हा परिणाम इंग्रजांच्या समागमाचा किंवा त्यांच्या युक्तीचा होता? अथवा ती गोष्ट होणें हा त्यांच्या कालाचाच साहजिक परिणाम होता. असो, पण रणधीररावांची ही वरील उणीव इतर उत्तम गुणांनीं भरून आली होती. ते स्वाभाविकच मनानें मोठे दयाळु, उदार व न्यायी असे होते. त्यांत त्यांच्या बापानें त्यांजविषयीं पुष्कळ काळजी घेतल्यामुळें त्यांस उत्तम शिक्षण मिळालें होतें; त्यामुळें त्यांणीं आपल्या छोटेखानी राज्याची व्यवस्था उत्तमप्रकारें ठेविली होती. सर्व बंदोबस्त इंग्रजी राज्याप्रमाणें होता. व्यवस्थेंतही कित्ता त्यांचाच. यामुळें इंग्रजसरकारची त्यांजवर बहाल मर्जी असे. त्यांच्या पूर्वजांचें शौर्य त्यांच्या अंगीं असल्याचा सूचक असा त्यांच्या अंगीं एक गुण होता कीं,—त्यांस शिकारीचें फार वेड असे. शिकारीचें वेड हें शूरांस शोभविणारें भूषणच होय. शिकारीचा छंद शूरांस शोभतो अथवा शूरच त्या छंदास उत्तमप्रकारें शोभवितात. आमच्या वाचकांपैकीं शिकार ही थोड्यांसच माहित असेल ह्मणून खऱ्या शिकाऱ्याच्या मनाचा उल्हास व उमेद कशी असते याचें अनुमान थोड्यांसच करवेल. खरा शिकारी ह्मटला ह्मणजे त्यास भूक नाहीं, तहान नाहीं, ऊन नाहीं, पाऊस नाहीं; तो घोड्यावर बसला ह्मणजे, माळ असो, डोंगर असो, मोठा कडा असो, त्याला सर्व सारखेंच. पायीं चालत असला तरी तो सर्व दिवसभर खांद्यावर बंदूक टाकून, कमरेस तोसदान लटकावून, बरोबर आपले शिकारी कुत्रे व सोबती, अशा थाटानें, माळ पहात नाहीं, डोंगर पाहत नाहीं, रान पाहत नाहीं, कांटे पाहत नाहीं. एकसारखा शिकारी-

च्या नादांत गर्क होऊन हिंडत असतो. सर्व रात्र जरी झाडावर अथवा झुडपाआड टपत बसणें पडलें तरी देखील तो तिळप्राय डगमगत नाहीं. आणि इतके श्रम करून जर का एखादी शिकार साधली—मग तें लहानसें "वाघरूंट" कां असेना—तर त्याचा आनंद काय सांगावा! जगांतील अत्युत्तम वस्तूचा लाभ एके अंगास व या "वाघरटाचा" लाभ एके अंगास. त्याचा तो आनंद अनुपम होय. शिकाऱ्याचा साहसीपणा फारच आश्चर्य करण्यासारखा असतो. रिकाम्या वेळीं आपल्या कृत्याचा जेव्हां शांतपणें तो विचार करितो तेव्हां तो चकित होऊन कधीं कधीं मनांतल्या मनांत भयही पावतो, आणि आपल्याशींच ह्मणतो, "मी त्या दिवशीं एवढा डोंगर घोड्यावरून उतरलों कसा?" अथवा "एवढी दरड उडालों कसा?" अथवा "सर्व रात्र काळोखांत अशा किर्र रानांत घालविली तरी कशी!" फार काय सांगावें! शिकार आटोपल्यावर आलेल्याच रस्त्यानें त्यास पुन्हा माघारेंही कितीएक वेळां जातां येत नाहीं. परंतु एवढें खरें कीं, शिकारीसारखा दुसरा उत्तम छंदच नाहीं. निदान ज्या शूर लोकांचे युद्धसंग्रामाचे दिवस राहिले नाहींत त्यांच्या मनोरंजनार्थ या छंदासारखा दुसरा छंदच नाहीं. आणि असेंच रणधीरराव यांचे अनुभवास आलें. त्यांनीं ह्मणावें कीं, आपल्या शस्त्रांस आतां शत्रु नाहींत ह्मणून काय झालें? वाघासारखा मनुष्यजातीस प्रबल शत्रु दुसरा कोण आहे? त्यांनीं नेहमीं वाघांचीच शिकार करावी. वाघ हेरल्याची वर्दी आली ह्मणजे मोठें महत्त्वाचें कामही एका अंगास पडे. त्यांच्या महालांतील थोरल्या

मुख्य दिवाणखान्यांत चहूंकडे वाघांचीं कातडीं मांडलेलीं होतीं. यावरून त्यांस आपल्या आवडत्या शिकारींत बरेंच यश येई असें वाटतें.

रणधीरराव यांचें आयुष्य बऱ्याच प्रकारें सुखानें गेलें—सर्वांशीं सुख या जगांत कोठें आहे? राज्य नीतीनें चालविल्यामुळें प्रजा यांजवर फार संतुष्ट असे. राज्यकारभारांत पूर्ण स्वतंत्रता होती. दरबारांत जरी इंग्रजांकडून रेसिडेन्ट होता तरी राज्यव्यवस्थेंत त्याचा अगदीं हात नव्हता. रणधीरराव यांचा सर्व वेळ मौजेंत जात असे. प्रातःकाळची रपेट करून आल्यानंतर पुढें भोजन होईपर्यंत सर्व वेळ पूजनार्चनादि पारमार्थिक व्यवसायांत व आपल्या शास्त्रीबुवाजवळ गूढ विषयांवर बोलण्यांत जात असे. दोन प्रहरपासून संध्याकाळचे चार वाजेपर्यंत राज्यव्यवस्था पाहणें होत असे. नंतर संध्याकाळची पुनः रपेट होत असे. हाच बहुधा नेहमींचा क्रम. शिकारीस जाण्याच्या दिवशीं मात्र वरील नियम चालत नसे, आणि हा नियम चालला नाहीं असे दिवस वर्षांतून पुष्कळ जात असत.

आजचा दिवस वर लिहिल्याप्रमाणें वर्षांतून पुष्कळवेळां येणाऱ्या दिवसांपैकीं होता. आमचे प्रवासी नारायणराव पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें सायंकाळच्या समयीं घाट चढत असतां इकडेस त्याचवेळीं रणधीरराव हे संताजीराव व आपले दुसरे सरदार यांसह नगराहून निघून घाटमाथ्याजवळ येऊन पोहंचले होते. वाघ टेहळल्याची वर्दी सकाळींच आली होती. त्या दिवशीं सकाळीं महाराज नित्याप्रमाणें पहांटेस उठून मुखमार्जनादि विधि उरकून आपल्या बसण्याच्या खोलींत आले आणि पाहतात

तों संताजीराव पूर्वींच खोलींत उभे आहेत. त्यांस पाहतांच खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांचें व संताजीराव यांचें भाषण झालें:–

रणधीरराव–कां संताजीराव, आज आमच्यावर कडी? कांहीं विशेष?

संताजीराव–( हंसून ) थोडेंबहुत, आतांच वर्दी आली आहे कीं, त्या शामगांवच्या दक्षिणेकडील बाजूस घाटाखालीं जाण्यास पायवाट आहे तेथल्या दरींत, गेल्या रात्रीं एक बैल वाघानें मारलेला आहे. तेव्हां आज सायंकाळीं तो वाघ खचित तेथें यावयाचा.

रणधीर०–ह्मणतां काय संताजीराव! ही बातमी थोडी काय? चला निघूंया तर मग. अवकाश करावयाचा नाहीं.

सं०–महाराज! इतकी घाई कशाकरितां? अद्याप निघण्यास अवकाश आहे. शामगांव काय, दोन तासांचा रस्ता.

हें बोलणें संपत आहे तों एका हुजऱ्यानें टपालांतील कागद आणून महाराजांपुढें ठेविले. ते पाहून संताजीराव ह्मणाले:–

संताजी०–महाराज, टपाल तर पहावें प्रथम. हें काय? हें समजलें. आपलें मुंबईचें वर्तमानपत्र "प्रभाकर." आज शुक्रवार नव्हे? महाराज, हें पत्र कोणाचें बरें?

महा०–(तें घेऊन फोडून वाचतात आणि) "हें मुंबईचें, त्या सोसाइटीच्या साहेबाचें. आपण बाबासाहेबांकरितां एक इंग्रजी शिक्षक मागितला होता, त्याविषयीं ते साहेब ह्मणतात, 'आमचे सोसायटींतील नारायणराव धनुर्धर, हुशार, इंग्रजींत निपुण, व स्वभावानें गरीब, कुलवा-

न, यास पसंत करून आपलेकडे पाठविलें आहे. ते आपल्याकडे लवकरच येऊन दाखल होतील."

**संताजी**०—नांव काय ह्मटलें? नारायणराव धनुर्धर? वः खासें नांव आहे महाराज.

**रणधीर**०—बरें झालें. आतां बाबासाहेबांच्या विद्याभ्यासाची काळजी राहिली नाहीं आणि पंडित आले ह्मणजे मला पुष्कळ गोष्टी समजून घ्यावयाच्या आहेत. असो. पण संताजीराव, आजची शिकार साधली पाहिजे बरें?

याप्रमाणें प्रात:काळीं प्रकार झाल्यानंतर अस्तमानास रणधीरराव, संताजीराव व दुसरी कांहीं मंडळी, बैल मरून पडला होता त्या ठिकाणच्या समोरच्या टेकडीवर एका उंच दगडाआड बंदुका भरून वाघाची वाट पहात बसली होती. पुढें काय झालें तें वाचकांस कळविलेंच आहे.

---

# भाग ४.

दुसऱ्या भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें रणधीरराव राजे व आमचे प्रवासी नारायणराव गाडींत बसून निघाले, ते लागलेच दोन तासांनीं नगरास सुखरूप येऊन पोंहचले. आपल्या बिकट प्रवासाचा त्याच रात्रीं अशा विलक्षण रीतीनें शेवट होईल, असें नारायणरावजींच्या ध्यानींमनींही नव्हतें. राजवाड्यांत आल्यावर तेथील पाहुणचार व वेतवात पाहून नारायणरावास मोठा आनंद झाला. राजा गुणग्राही असून त्यास विद्वानांच्या समागमाची इच्छा आहे; हें पाहून तर नारायणरावास अत्यानंद झाला.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ६ वाजतां महाराज नित्याप्रमाणें उठून पोशाख करून दिवाणखान्यांत जाऊन बसले, व नारायणरावजींस बलाविण्यास हुजऱ्या पाठविला. नारायणरावजीस नेहमीं लवकर उठण्याची संवय होती, ह्मणून ते राजानें बोलावणें आलें, तेव्हां तयारच होते. ते लागलेच त्या हुजऱ्याबरोबर निघून महाराज बसले होते तेथें आले; तेव्हां महाराजांनीं त्यांस आपल्या जवळच बसण्यास खुर्ची दिली. मग—

**महाराज**—कसें काय नारायणरावजी! आपण मुंबईचें? आपलें नांव धनुर्धर?

**नारायणराव**—होय सरकार.

**महा०**—आपण अभ्यास मुंबईत केला?

**नारा०**—मुंबईमध्यें "एल्फिन्स्तन् इन्स्टिट्युशन्" ह्मणून इंग्रजी शिकविण्याची एक मोठी शाळा आहे, तेथें केला.

महा०—नारायणरावजी, तुह्मी मोठे भाग्यवान् ! उपयुक्त व अमोल्य विद्येच्या भांडाराची किल्ली तुह्मी संपादिली आहे. खरेंच सांगतों नारायणराव ! ज्या ज्या वेळीं मी आमचे रेसिडेन्ट साहेबाचे भेटीस जातों त्या त्या वेळीं मला इंग्रजी भाषेचें ज्ञान नाहीं, याबद्दल पराकाष्ठेचें वाईट वाटत असतें.

नारा०—(महाराजांची ही विद्येविषयीं अभिरुचि पाहून फार आनंद पावून) महाराज ! ! आमच्या या देशांतील सर्व राजेरजवाड्यांस व इतर संस्थानिक व बडेलोकांस ज्या दिवशीं आपल्यासारखें वाटूं लागेल, त्या दिवशीं आमच्या ह्या देशाच्या उन्नतीस प्रारंभ झाला असें खास समजावें. ज्ञानप्राप्तीची इच्छा मनुष्यमात्रांस साहजिक आहे. परंतु कांहीं अनिर्वाच्य दुर्दैवामुळें आमच्या देशांतील बडेलोकांस ज्ञानप्राप्तीची अलीकडेस अरुचि झाली आहे.

महा०—मला तर, नारायणरावजी, स्वतः ज्ञानप्राप्ति करून घ्यावी असें वाटतें; इतकेंच नव्हे, तर या माझ्या छोट्या राज्यांत विद्येचा जिकडे तिकडे फैलावा व्हावा, व सर्व लोक ज्ञानसंपन्न व्हावेत अशी माझी फारच इच्छा आहे. आणि याचकरितां आपणास मीं येथें आणविलें आहे. बरी आठवण झाली. तुह्मांस येथें आणविण्याचा मुख्य हेतु इतका वेळ कळविला नाहीं. कोण आहेरे बाहेर ! (हें ऐकतांच एक हुजऱ्या येतो).

हुजऱ्या—जी सरकार मी मोतीसिंग आहें. काय आज्ञा?

महा०—अरे, बाबासाहेबांस इकडे लवकर घेऊन ये.

हुजऱ्या—आज्ञा सरकार. (असें ह्मणून निघून जातो.)

महा०—नारायणरावजी ! माझ्या मनांत ह्या आपल्या

प्रांतांत कांहीं शाळा चालावयाच्या आहेत. या आमच्या नगरांत, एक इंग्रजी शिकण्याकरितां शाळा, व एक मुलींकरितां शाळा अशा दोन प्रथमतः एकदम सुरू करावयाच्या आहेत. मराठी शाळा तर आहेतच. या सर्व शाळांवर देखरेख तुह्मीं केली पाहिजे. याशिवाय तुह्मांस एक मोठें महत्त्वाचें काम सांगावयाचें आहे. आमच्या बाबासाहेबांकडून आपण मराठी व इंग्रेजी अभ्यास उत्तमप्रकारें करविला पाहिजे. बाबासाहेबांची चर्या पहाल तर—

इतक्यांत, सुमारें ६।७ वर्षांचें एक मूल, पूर्वी आलेला हुजऱ्या घेऊन येतो. नारायणराव त्याजकडे क्षणभर पहातात; आणि आनंद पावतात. कारण बाबासाहेबांचें स्वरूप मोठें मनोहर व चित्तवेधक होतें. त्या स्वरूपांत सौंदर्य व चपलता हीं एकदम दिसत होतीं. सर्व पोशाख इंग्रजी धर्तीचा होता. डोकीस टोपी जरीची फीत लावलेली अस्मानी मखमालीची होती. तिचा कलाबतूचा गोंडा झोंकदार रीतीनें डाव्या कानावर लोंबत होता. अंगांत किरमिजी रंगाच्या उत्तम रेशमी कापडाचा "कोट" होता; खालीं अस्मानी रंगाची उत्तम बनातीची "पाटलून" होती; व पायांत "बूट" होते. हा नवीन तऱ्हेचा पोशाख आह्मांस वाटतें, मुलांस एक प्रकारें मोठा झोंकदार दिसत असतो. बाबासाहेबांस तर तो फारच शोभत होता.

हें मनोहर मूल जवळ येतांच महाराजांस हंसत मुजरा करितें; आणि त्यांच्या खुर्चीजवळ जाऊन उभें राहतें. त्याकडे पाहून—

महा०—कसें काय राव! आज बाहेर रपेटीस गेला होतां कीं नाहीं?

बाबा०—होय महाराज. आतां हीच जाऊन आलों. काय सांगूं महाराज! आतां मोठी मौज पाहिली.

महा०—ती मौज कोणती बरें? सांगा पाहूं आह्मांला.

बाबा०—महाराज, मी आज त्या नदीकडे गेलों होतों. आह्मी वेशींतून अम्मळ पुढें गेलों तों एक वानर त्या मोठ्या उंबराच्या झाडाखालीं बसून उंबर खात होता. एक उंबर तोंडांत टाकी, आणि वर पाही. मी ह्मटलें कीं, हा वर काय पाहातो? अम्मळ जवळ गेलों, आणि पाहिलें तों तेथें दुसरा एक वानर होता. तो हातांनीं उंबर तोडून खालीं टाकी. कायती महाराज मौज! हातानें उंबर तोडी व तें तोंडांत घाली, अर्धेसें खाई आणि मग तें खालीं टाकी. वरचा वानर खालीं उंबर टाकीपर्यंत खालीं बसलेला वानर उगाच त्याजकडे पाहत असे. डोळे मिटी, उघडी, एका हातानें करकर कुल्ले खाजवी. मी जवळ जातांच तो बसल्या ठिकाणींच इकडे तिकडे पाहूं लागला; अगदीं जवळ गेलों तों तो उठून मागें मागें हळू हळू सरकूं लागला. मी त्याच्या पाठीस लागलों. तो पुढें, मी मागें. मी धांवूं लागलों तसा तोही अम्मळ धांवूं लागला. मी किंचित् थांबलों कीं, तो थांबे व मला वेंकावेंल्या दाखवी. मी हातांत एक दगड त्यास मारावयाला घेतला तों त्यानेंही एक घेतला. नाईकबुवा मला ह्मणूं लागले, 'जाऊंद्याहो बाबासाहेब, तो वानर पाठीस लागेल; व ओरबाडील.' मी ह्मटलें, 'काय ओरबाडतो!' आणि तसाच मग त्याच्या मागें मी धांवत सुटलों. येथून त्या लितकर धांवलों तों बूट जवळच्या वडाच्या पाळास अडकून मी पडलों—मला कांहीं लागलें नाहीं!!—नाईक लांब

होते. मी पडलों तों तो वानर मागें वळून माझ्याकडेस उलट धांवूं लागला; इतक्यांत आपला टिप्या तेथें धांवतच आला. आणि त्या वानरास पकडणार तों वानर झटदिशीं झाडावर चढला; आणि वर एका डाहळीवर बसून वेडावणें दाखवूं लागला. टिप्यानें तर भोंकून भोंकून जीव बेजार केला. तो वानर बसल्या ठिकाणाहून कांहीं केल्या हलेना. मग मी आपल्या हातांतील काठी त्याजकडे बंदुकीसारखी धरली. तेव्हां तो अम्मळ दूर झाला. महाराज, बंदुकीस वानर भितात काय? मला बंदूक मारावयास केव्हां शिकविणार?

महा०—(आनंदी मुद्रेनें) हळू हळू सर्व शिकवूं बरें. हे पहा तुह्मांस इंग्रजी शिकविण्यास गुरुजी आणिले आहेत. पण तुह्मीं पडलां तेव्हां कांहीं लागलें कीं काय?

(नारायणरावजीस हासत मुजरा करून)

बा० सा०—छी:! कांहीं नाहीं. लागतें काय?

नाईक—नाहीं महाराज! बाबासाहेबांस बरेंच लागलें आहे, त्यांची इजार काढून पहावी.

महाराज मग बाबासाहेबांची इजार (पाटलून) काढवितात आणि पाहतात तों दोन्हीं ढोंपरांस पुष्कळ खरडून ती जागा तांबडी झाली होती. तें पाहून—

महा०—हें काय?

बा० सा०—हं यांत काय आहे! मी कांहीं रडलों नाहीं. परवां तात्यासाहेबांबरोबर धांवतांना पडलों तो कुठें रडलों? पडलों तरी पण पुढें गेलोंच.

महा०—नाईक! बाबासाहेबांस आंत घेऊन जा; आणि या लागलेल्या ठिकाणी कांहीं लावण्यास सांगा, जा लौकर. (नाई-

क आज्ञा महाराज असें ह्मणून बाबासाहेबांस घेऊन जातो).

बाबासाहेब बाहेर गेल्यावर महाराज नारायणरावजींकडे पाहतात; आणि विचारितात. कां आपणास शिष्य कसे काय वाटतात?

नारा०—काय विचारावें! नुसतें तोंडाकडे पाहिलें तर तो कोण्या थोर व दैवशाली श्रीमान कुळांतील आहे असें लागलेंच स्पष्ट कळतें. बोलणें तरी किती शूरत्वाचें आहे? ईश्वरानें महाराजांस पुत्ररत्न महाराजांयोग्य दिलें आहे.

तें ऐकतांच महाराज अम्मळ सुस्कारा टाकितात; आणि (मनांत) "बाबासाहेबांस पुत्र ह्मणण्याचें मज अभाग्याचे प्रारब्धीं कोठें आहे! असें पुत्ररत्न ईश्वरानें मला दिलें असतें तर मग या जगीं माझ्यासारिखा दैवशाली दुसरा कोण असता?" ( उघडपणें ).

महा०—नारायणरावजी, बाबासाहेबांस मी पुत्राप्रमाणें वाढविला आहे.

नारा०—बाबासाहेब महाराजांचे पुत्र नव्हेत तर.

महा०—बाबासाहेब पुत्र नव्हेत. बाबासाहेबांची गोष्ट मोठी मौजेची आहे—एके दिवशीं.

इतक्यांत एक हुजऱ्या शामगांवच्या वेळ्यांनीं तो रात्रींचा श्वाव आणिला आहे अशी वर्दी सांगण्यास येतो. तें ऐकतांच महाराज उठतात आणि नारायणरावास ह्मणतात,

"बाबासाहेबांविषयीं हकीकत मग सांगेन. चला आतां आपण कालचा वाघ पाहूं. काल त्याणें तुमची बरीच गाळण केली होती. चला तर"—असें ह्मणून तत्क्षणींच ते खालीं चौकांत वाघाकडे जातात.

महाराजांच्या मागोमाग नारायणरावजीही जातात.

वाघाजवळ गेल्यावर महाराज, जवळ दुसरी मंडळी जमली होती तीस पूर्वदिवसाच्या शिकारीची हकीकत मोठ्या उल्हासांत येऊन सांगत होते, तो उल्हास शिकाऱ्यांसच समजावयाचा, आमच्या वाचकांपैकीं शिकारी-फारसे असतील असें वाटत नाहीं;-असतील तर आमचें मोठें भाग्य समजूं; आणि त्यांची क्षमा मागूं. पण बहुधा नसतीलच. तेव्हां महाराज कालच्या शिकारीचें वर्तमान आपल्या सभोंवार जमलेल्या मंडळीस सांगत आहेत; वं नारायणराव त्या वाघाच्या तडाक्यांत कसे सांपडत होते; आणि ते कशाप्रकारें निभावले हें कळवीत आहेत तोंपर्यंत आम्हीं आपल्या वाचकांस बाबासाहेब हा मुलगा कोण व तो वाड्यांत येऊन महाराजांस पुत्राच्या ठिकाणीं कसा झाला तें सांगितलें असतां आमच्या वाचकांस आवडेल असें वाटतें. म्हणून ती गोष्ट आम्ही सांगतों.

---

## भाग ५.

मागें रणधीरराव यांचा इतिहास सांगितला त्या वेळीं त्यांच्या संसारसुखाचें वर्णन करणें राहिलें. त्याविषयीं आतां सांगितलें ह्मणजे छोटे बाबासाहेब कोण, कोठले, व ते वाड्यांत कसे आले याविषयीं वाचकांस बरेंच वर्तमान कळेल असें वाटतें.

रणधीररावांस "संसारसुख" बिलकूल नव्हतें. त्यांच्या वयास पस्तिसावें वर्ष लागलें तरी पोटीं पुत्र नव्हता. यामुळें राजाचें मन नेहमीं एकांतामध्यें व्यग्रता पावे. पुत्राविषयीं त्यांस मोठा हृद्रोग लागला होता. परंतु त्यांच्या त्या स्वाभाविक नेहमींच्या उल्हासी वृत्तीमुळें पहाणारांस महाराज सदोदित आनंदी दिसत. जसा एखादा मोठा वृक्ष फलपुष्पांनीं व हिरव्यागार पर्णांनीं सुशोभित असून त्याच्या आंत कीड लागल्यामुळें आंतून अगदीं पोकळ झालेला असतो, तो पाहणारांस इतर वृक्षांप्रमाणेंच सुंदर दिसतो व त्याची छाया इतर झाडांप्रमाणेंच गार असते; परंतु त्याच्या अंतर्गत किड्यांची ती पोखर कोण जाणतो! पण एखाद्या समयीं जेव्हां कां तो एकाएकीं अकस्मात् लहानशा वाऱ्याच्या जोरानें मोडून पडतो तेव्हां लोक क्षणभर आश्चर्य करून ह्मणतात, 'काय वाऱ्याचा प्रभाव हा! एवढा वृक्ष कसा काडीप्रमाणें मोडून पाडिला! परंतु मग ते जेव्हां किड्यांनीं आंतून तो अगदीं पोखरलेला पाहतात तेव्हां त्याचें अकस्मात् उलथून पडण्याचें कारण समजतात. त्या वृक्षाप्रमाणेंच ह्या राजाची स्थिति होती तो थोर व खोल मनाचा असल्यामुळें त्याची अंतर्यामींची

स्थिति कोणास कळत नव्हती. त्याची नेहमींची आनंद-वृत्ति पाहून लोकांस आश्चर्य वाटे. ते ह्मणत, राजा काय नादी आहे? त्यास मूल नसल्यामुळें, त्याचा वंश खुंटण्याचा समय आला असतां देखील हा नेहमीं आनंदी असतो. आपला एकच शिकारीचा नाद घेऊन त्यांत दंग असतो; तेव्हां याच्या मनास ह्मणावें तरी काय? पण ते सर्व लोक बाह्यदृष्टीनें पहाणारे होते.

कारण महाराज पुत्र नसल्यामुळें अंतरीं दुःखी असत. खरा शूर आपलें दुःख दुसऱ्यांस दाखविण्यांत कमीपणा मानतो. आणि खरोखर शूरपणा हा ऐहिक दुःख क्षुद्रवत् मानून तिकडे दुर्लक्ष्य करविणारा आहे. शूरास कसेंही दुःख होवो, त्याचा मोठा प्रियपदार्थ गमावो, त्याच्या मुखांतून दुःखोद्गार निघणार नाहीं. त्याच्या डोळ्यांला पाणीसुद्धां येणार नाहीं. ह्मणणारे हा मनाचा कठोरपणा असें ह्मणोत; परंतु मला वाटतें, हा पौरुषाचा खरा विजयध्वज होय. मनाच्या धर्मावर ज्याणें आपला अमल बसविला तोच या जगांत खरा विजयी ह्मणावा. पण हें काम महा-दुर्घट आहे. "मन हें ओढाळ गुरूं" असें ह्मणतात तें खरेंच. मनाच्या ओढी अनिवार आहेत. मनुष्य कितीही शूर असला तरी त्याचे हृदयोद्गार कधीं तरी बाहेर पडलेच पाहिजेत. तळ्याचें पाणी कितीही खोल, कितीही स्थिर असलें तरी तें जर आंतून प्रचंड भूकंपादि उत्पातांनीं उचंबळलें तर मग त्या पाण्यास अवरोध कोठचा? तें बांधाबाहेर यावयाचेंच, तद्वतच मन कितीही स्थीर असलें, कितीही शांत व धीराचें असलें तरी, जर कां एखाद्या दुर्निवार प्रवृत्तीनें व्यग्रता पावलें तर मग तें कोणाच्यानें

आवरेल? शरीराचे व्यापार कांहींसे स्थिरावले म्हणजे मग मनाचें दुःख बाहेर पडतें. जोंपर्यंत बाह्य इंद्रियांचे व्यापार सडकून चाललेले असतात तोंपर्यंत मनाचें दुःख जरा कुंठित असतें. त्यास बाहेर पडण्यास ईश्वरानें स्वतंत्र मार्ग करून ठेविलेला नाहीं. परंतु रात्रीच्या समयीं जेव्हां शरीर दिवसाचे नानाविध व्यापार बंद करून विश्रांति घेण्याच्या बेतांत असतें तेव्हां दुःखास जणूं काय सर्व द्वारें मोकळीं सांपडतात. तें मग फारच अनिवार होतें. बिछान्यावर पडतांच दिवसाच्या श्रमानें लवकर झोंप आली तर बरें, नाहीं तर मग मनाच्या व्यापाराची सुरुवात झालीच. मग झोंपेचें काय चालावयाचें आहे?

रणधीररावांस या गोष्टीचा पक्का अनुभव होता. म्हणून ते बहुधा रात्रीं लवकर झोंप येईल अशा तऱ्हेनें दिवसास वागत असत. ज्या दिवशीं शिकारीस जात असत त्या रात्रीस त्यांस चांगली झोंप येई; आणि म्हणूनच ते बहुधा वरचेवर शिकारीस जात असत. शिकारीस गेले नाहींत, तर दररोज घोड्यावर बसून फार लांब रपेट करून येत असत. त्या श्रमामुळें त्यांस झोंप न लागण्याची बहुधा भीति नसे. एके दिवशीं ते शिकारीस न जातां नेहमींप्रमाणें प्रातःकाळचे सर्व नेमधर्म आटपून जेवणानंतर न्यायासनीं येऊन दररोजचें काम पाहूं लागले. तों त्या दिवशींचा खटला फार भानगडीचा होता. खटला वडिलार्जित जिनगीच्या वांटपाचा असून त्यांत वादी, आपण दत्तकपुत्र या नात्यानें आपल्या बापाच्या भावाकडून आपल्या बापाचा हिस्सा मागत होता. प्रतिवादीची तक्रार अशी होती कीं, वादी हा दत्तकपुत्र खरा; परंतु वादी हा आपल्या जनक पित्याचा एकु-

लता मुलगा असल्यामुळें तो दत्तक देण्यास योग्य नव्हता; ह्मणून झालेलें दत्तविधान गैरकायदा आहे. अशीं दोहों पक्षकारांचीं साधकबाधक प्रमाणें वकीलांची संपत असतां प्रतिवादीच्या वकीलानें पुत्रजन्माची अवश्यकता व दत्तविधीनें पुत्र घेण्याचें कारण वगैरे हिंदुशास्त्रांतील गूढ विषयावर लांबलचक संभाषण केलें. "पुत्र" शब्दाची व्याख्या व तद्विषयक सर्व बोलणें रणधीररावाच्या मनास फार लागणारें होतें. कचेरी आटोपल्यावर स्वारी नित्याप्रमाणें घोड्यावरून फिरण्यास गेली नाहीं. चित्तीं अमळ उदास वाटलें, ह्मणून आपल्या खोलींतच जाऊन बसले; व हुजऱ्यास हाक मारून शास्त्रीबुवांस बोलाविण्यास सांगितलें. मग जेवणाची वेळ होई तोंपर्यंत महाराज व शास्त्रीबुवा एकांतांत बोलत बसले.

जेवण झाल्यावर महाराज आपल्या रंगमहालीं गेले. मनास किंचित् चांचल्य झालें होतें. पुत्र नसल्यामुळें वारंवार त्यांस वाईट वाटत असे, पण तें बाहेर कोणास कळत नसे. आपल्या प्रियपत्नीजवळही महाराज यासंबंधीं कधीं फारसें बोलत नसत. इतका मनावर त्यांचा नेहमीं दाब असे. परंतु त्या रात्रीं महाराजांस चैन पडेना. मन्वादि शास्त्रकारांनीं निपुत्रिकांस अधःपात सांगितलेला प्रकार न्यायकचेरींत कानावर पडल्यामुळें तोच विषय मनांत घोळत होता. महाराजांच्या चित्ताची व्यग्रता राणीनें पाहिली. राणी फार चतुर व सद्गुणी होती. आपल्या प्रियपतीचा ज्यांत आनंद ती गोष्ट करणें हेंच काय तें आपलें कर्तव्यकर्म असें ती मानीत असे. राजाचें राणीवर अतिप्रेम होतें. परंतु तें फार बाहेर दृष्टीस पडत नसे. सर्व

मनाच्या वासना आपल्या ताब्यांत ठेविल्या आहेत असें दाखविणें यांत राजास मोठा आनंद वाटत असे. राणीस ठाऊक होतें कीं, महाराज आपल्यावर मनापासून प्रीति करितात, यांतच ती आनंद मानीत असे. राजा जरी महालांत फारसा बसत नसे व त्याचा सर्व वेळ बाहेरच्या कामांत व [illegible] जाई तरी त्याबद्दल राणीला कांहीं वाटत नसे. तिच्या मनीं महाराजांनीं नेहमीं आनंदी असावें. आपल्या स्वतांच्या सुखाचा तिला कधींही विचार सुचत नसे. आह्मांस वाटतें, खऱ्या प्रीतीचें लक्षण हेंच होय.

महाराजांचें व्यग्र झालेलें चित्त पाहून, राणी अमळ भयभीत होत्साती आपल्या प्रियपतीचा डावा हात अतिप्रेमानें आपले हातांत घेऊन जवळ जाऊन बसते व फार लडिवाळपणें 'चित्तवृत्ति आज अशी कां दिसते?' ह्मणून विचारिते.

**राजा**—(राणीनें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर न देतां) 'प्रिये, आपल्यास ईश्वरानें एका गोष्टीची उणीव ठेविली; याला काय बरें उपाय करावा?

**राणी**—(आपल्या पतीच्या मुखांतून कधींच नाहीं, आणि आज प्रथमच असे उदासीन शब्द आलेले पाहून त्यांचे समाधानार्थ) या गोष्टीस काय उपाय आहे? ईश्वराचे मर्जीप्रमाणें मनुष्यानें असलें पाहिजे!!

**राजा**-खरेंच. तूं ह्मणतेस तेंच खरें. आपले शास्त्रीबुवाही असेंच ह्मणतात. सर्व गोष्टी ईश्वरेच्छेप्रमाणें घडत असतात. आपण निपुत्रिक असावें, असा जर ईश्वराचा संकेत असला तर मग काय करावयाचें आहे! नाटकाचा सूत्रधार आपल्या मर्जीप्रमाणें नाटकांत प्रत्येक जणास

त्याची योग्यता पाहून कामें लावून देतो; मग त्यांत कोणास राम होऊन विजयी व्हावें लागतें, कोणास रावण होऊन रणांगणीं मरावें लागतें. पण ज्याप्रमाणें प्रत्येकानें आपआपला भाग ' मग तो कसाही असो ' उत्तम करून दाखविण्यांत सर्व नाटकाचा रंग असून सूत्रधाराचा आनंद असतो, तद्वतच प्रिये, या जगद्रूपी विस्तीर्ण रंगभूमीवर ईश्वर सूत्रधार होऊन त्यास योग्य वाटलें तें त्याणें सोंग दाखविण्यास आपल्यास पाठविलें आहे. यांत आह्मी आपआपला भाग उत्तम करून दाखविणें हेंच आपलें कर्तव्य आहे; व त्यांतच आपला सूत्रधार संतोष पावणार आहे. तसें करण्यांतच आपण आपली चाकरी योग्य बजाविली असें होणार आहे. आपल्याकडे वाईट सोंग घेण्याचें आलें तर कुरकुरावें कसें? नाटकांतील पात्रांची निवड पात्रांकडे नाहीं. कोण मनुष्य कोणतें सोंग उत्तम प्रकारें वेईल याचा परीक्षक सूत्रधार होय. त्याला सर्व नाटकास रंग आणावयाचा असतो. तेव्हां ( कंठ अम्मळ सद्गदित होऊन ) प्रिये, आपल्याकडे निपुत्रिक राजाचें सोंग घेण्याचें त्या सूत्रधारानें ठरविलें आहे; याबद्दल आपण व्यर्थ कां दुःख करावें? त्याची मर्जी ! त्याच सोंगाची आपण उत्तम बतावणी करूं या ह्मणजे झालें.

राणी हें ऐकून अमळ उगाच राहिली. कशी झाली तरी ती स्त्रीच. आपल्या प्राणपतीची वृत्ति नेहमीं आनंदी असावयाची तशी ते दिवशीं न पाहतां, जेव्हां तिणें ती उदासपणाची पाहिली त्या काळीं तिला एका प्रकारचें धैर्य आलें होतें ह्मणूनच तिणें महाराजांच्या उत्तेजनार्थ " ईश्वराच्या मर्जीप्रमाणें मनुष्यानें असलें पाहिजे, " असें समाधा-

नाचें भाषण केलें. जणुं काय तें समाधान तिचेठायीं पूर्णपणें वसत होतें. परंतु खरें ह्मटलें तर तसें नव्हतें. कारण आपल्या पतीच्या मनाचें समाधान झालें असें पाहून तिनें आपल्या मनाचें खरें स्वरूप लागलेंच प्रगट केलें. ती ह्मणते,—

राणी–प्राणनाथ! आपण ह्मणतां हें खरें आहे. पण असा समज पुरूषांचा लवकर पडतो. आह्मीं अज्ञान स्त्रियांनीं मनाचें शांतवन कसें करावें? वंशखंडन व अधःपात यांचें भय कसें टाळावें?

राजा–प्रिये, तूं ह्मणतेस त्याविषयीं मी दोन तीन वेळां आपल्या शास्त्रीबुवांपाशीं बोललों व त्यांनींही त्यांनीं बरेंच समाधान केलें आहे. "वंशखंडन" ह्मणून जें कांहीं तूं ह्मणतेस त्याविषयीं ते ह्मणतात कीं, जर फार बारीक विचार केला, तर तें कधींच होणें नाहीं. बरें, कदाचित् प्रत्यक्ष पोटचें मूल नसेल, तर दुसऱ्या कोणाचें चालणार नाहीं काय? जगांतील प्रत्येक मनुष्य आपला बंधु होय. सर्व जग आपलें कुटुंब आहे. असो, हें समजणें जरा कठीण आहे. परंतु वंशखंडन होणें ह्मणजे काय? आपल्या पश्चात् आपलें नांव घेण्यास कोणी नाहीं हेंच नव्हे काय? आपणास पुत्र होऊन त्यानें आपलें नांव चिरकाल राखावें ही इच्छा मनुष्यमात्रांस साहाजिक आहे. पण प्रिये, शास्त्रीबुवा ह्मणतात–आपलें नांव चिरकाल राहण्यास संततीपेक्षां दुसऱ्या चिरकाल राहणाऱ्या गोष्टी नाहींत काय? प्रत्येक वेळीं संतति खुंटण्याचा संभव आहे, तो मार्ग स्थाइक नाहीं. आणि प्रिये, पुराणांतरीं जीं नांवें आपण ऐकतों त्यांचा वंश हल्लीं कोठें आहे? तरी

त्यांचीं नांवें अजरामर झालीं आहेत. कीर्ति ही अजरामर आहे. मग वंश असण्याचा हेतु जर नांव चिरकाल राहणें हाच आहे, तर वंशापेक्षां कीर्तीनें आपलें नांव चिरकाल राहवितां येणार नाहीं काय? प्रिये, त्या शास्त्रीबुवांचें बोलणें किती चतुरतेचें व समाधानाचें आहे! तें बोलत असतां माझ्या दुःखाचा तर मला अगदीं विसर पडतो.

राणी—ज्ञात्यांचा समागम असावा ह्मणतात तो अशासाठींच.

राजा—प्रिये, तुझ्या दुसऱ्या शंकेचें निवारण जरा कठीण आहे. पुराणांतरीं व मोठमोठ्या शास्त्रकारांनीं निपुत्रिकांस अधःपात आहे, असें ठरविलें आहे त्याचेंही शास्त्रीबुवांनीं उत्तम तऱ्हेनें समाधान केलें आहे. परंतु तें तुला समजणार नाहीं. आपण आपलें एवढेंच घेऊन मनाची समजूत करावी कीं: जर एखाद्या गोष्टींत आपला उपाय नाहीं तर ती शास्त्रकारांनीं कितीही पापाची आहे असें सांगितलें तरी त्या पातकाची उत्पत्ति आपल्याकडून नसल्यामुळें आपण त्याची भीति बाळगूं नये. मग ईश्वराचीच अशी मर्जी असें समजून स्वस्थ असावें.

राणी—प्राणनाथ! या सर्व गोष्टी विचाराच्या झाल्या. सर्वच वेळ आपलीं कृत्यें विचारानें कोठें होत असतात? वेळेवेळीं माझेठायीं मातृत्व जागृत होऊन घरीं लहान मूल खेळत असावें, त्याचें आपण लालन पालन करावें असें 'प्रिया! काय सांगूं! बोलण्यास लाज वाटते' या मनाला वारंवार वाटत असतें." (इतकें सांगत आहे तों हृदय दुःखोद्गारांनीं दाटून नेत्रांतून अश्रु गळतात व तोंडावाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

एक शब्दही निघत नाहीं. उसासा टाकून राजाच्या डाव्या खांद्यावर डोकें टेंकून स्तब्ध राहते. )

राजा—( आपल्या अंगावरील शेल्याच्या पदरानें तिचे डोळे पुसून व तिचा हात आपल्या हातांत घेऊन ) प्रिये! मला असें वाटत नाहीं असें तूं समजतेस काय? अग, मी वारंवार शिकारीस जातों याचें कारण काय! हेंच. घरांत असलें ह्मणजे हे विचार वारंवार डोळ्यांपुढें जणुं उभेच राहतात! हें सर्व राज्य व ऐश्वर्य शून्यप्राय वाटून सर्व सुखोपभोग विषवत् भासतात! हें मनांत आलें ह्मणजे त्याचा उद्गार कधीं तरी बाहेर पडणार, मग ती मला मोठी शरमेची गोष्ट होईल. मला वाटत असतें कीं, आपण आपल्या प्रजेला नेहमीं ईश्वरानें ठेविल्या स्थितींत कसें संतुष्ट असावें अशाविषयीं उत्तम मासला दाखवून द्यावा आणि ह्मणूनच मी वारंवार कांहीं तरी धांदलीच्या कामांत असतों. शिकार ह्मण, फिरणें ह्मण, कांहीं तरी करीत असतों. राज्यकारभार करीत असतां हे विचार येण्यास जागाच नाहीं.

राणी—प्रिया! ही आपली गोष्ट झाली. मीं घरांत एकटी असणार. मी काय बरें करावें? आह्मां स्त्रियांस अन्य व्यापार नसल्यामुळें आह्मीं नेहमीं रिकाम्या असणाऱ्या यामुळें आमचे विचार एकाच प्रियविषयांत निमग्न असतात. त्यांपासून आमची सुटका कशी व्हावी?

राजा—प्रिये! तुला जर घरांत करमणुकीकरितां एक लहान मूल खेळण्यास पाहिजे तर आपल्या पदरच्या माणसांपैकीं कोणाचें तरी एक मूल आणून एथें कां ठेवीत नाहींस? मला वाटतें, तुझ्याजवळ आपलें मूल संगोपनार्थ —

आणून ठेवण्यास कोणी पाहिजे तो मोठ्या आनंदानें राजी होईल.

राणी–महाराज, आपण सुचविलें तें बरोबर आहे. पण माझ्या मनास वाटतें, तसें लोकांचें मूल आणून ठेविण्यांत काय समाधान आहे? कांहीं केलें तरी तें लोकांचेंच. आपण एकवेळ त्याच्याकडे पाहिलें नाहीं तरी त्याची आई आहेच. मला वाटतें, लहान मुलाच्या संगोपनानें जो आईस आनंद होत असतो तो एकाअर्थी साहजिक तर खराच परंतु तो बऱ्याच अंशीं तें लहान मूल सर्वांशीं आपल्यावर अवलंबून असतें ह्मणून असतो. आईस वाटत असतें कीं, त्या अर्भकाकडे मी जर पाहिलें नाहीं तर त्याचें कसें होईल? त्याजकडून वेळचेवेळीं स्तनपान करविलें नाहीं तर तें कसें वांचेल? त्या बाळकाचें सर्वोपरी आपल्यावर अवलंबन हेंच आईच्या सुखाचें कांहीं अंशीं तरी कारण आहे. कारण आपणच पहा, लहानपणीं जशी आईची बाळकावर ममता असते तशी तेंच मूल मोठें झालें ह्मणजे नसते.

राजा–हे चतुरे, तूं ह्मणतेस तें खरें आहे.

राणी–हे प्राणपति! ह्मणून मी ह्मणतें, लोकांचें मूल घेऊन काय उपयोग? पोटचें मूल नसलें तरी असें मूल असावें कीं त्यास कोणी नसावें. तें सर्वोपरी आपल्या उपजीवनार्थ आपल्यावरच अवलंबून असावें, आपण जवळ जातांच आपलीच आई आली असें त्यास वाटून त्याणें हंसावें, आपण जवळ नसतां त्याणें रडावें. सारांश, आपल्याशिवाय त्यास जगांत कोणीं नसावें. अशा मुलाचें संगोपन करण्यानें कांहीं तरी मनाची समजूत करितां येईल.

राजा–हं समजलों–

राणी–प्रिया! काय सांगूं? आज आपण ह्या विषयावर बोलणें काढिलें ह्मणून मी बोललें. नाहीं तर मी आपल्यास वाईट वाटेल ह्मणून फार कधीं बोलत नसतें. आह्मां स्त्रियांचें मन फार हलकें, पुरूषांसारिखें विचारानें स्वस्थ होणारें नव्हे. एक तर, आह्मांस पुरूषांसारखे प्रौढ विचार नाहींत. त्यामुळें हा विचार माझ्या मनांत वारंवार येतो. पण काय करावें? असो. आज माझ्या मनाचें बरेंच समाधान केलें आहे. पण–

राजा–आतां "पण" नको. प्रिये, आतां रात्र किती झाली हें तुला ठाऊक आहे काय? (इतक्यांत दोन वाजतात) काय? दोन वाजले? मी तर कदाचित् बारा वाजले असतील असेंच समजत होतों. पुरे आतां. उदईक मला मोठ्या पाहटेस शिकारीस जावयाचें आहे. त्या आपल्या उत्तरेकडील डंगांत मोठ्या वाघाची चाऊल असल्याची वर्दी आली आहे.

असें बोलणें झाल्यावर राजा व राणी बिछान्यावर जाऊन पडलीं.

## भाग ६.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें राजा व राणी निद्रा यावी ह्मणून बिछान्यावर जाऊन पडलीं. पण दोघांसही बराच वेळ झोंप आली नाहीं. अगोदरच पूर्वरात्रीची झोंप मोडली होती. तशांत मन व्यग्र होणाऱ्या विषयावर त्यांचें संभाषण झालें होतें. यामुळें त्यांस बराच वेळ झोंप आली नाहीं. पुढें राजास निद्रा लागली परंतु राणी बराच वेळ बिछान्यावर या कुशीवरून त्या कुशीवर व त्या कुशीवरून या कुशीवर होऊन निद्रा येईल ह्मणून पहात होती. शेवटीं पहांटेच्या सुमारास तिला उगाच कोठें चुटका लागला. ती गाढ निद्रा नव्हती. तिचें मन पूर्वीं चाललेल्याच विषयांत घोळत होतें, असें वाटतें. कारण चार वाजण्याच्या सुमारास राजेसाहेब झोंपेंत असतां ती एकाएकीं ओरडली. तिणें पाहिलें कीं, आपल्या महालाखालून कोणी एक विक्राळ बाई कडेवर एक मूल घेऊन जात आहे. ती आपल्यास पाहून मोठ्यानें ओरडली आणि कडेवरचें मूल हातांत घेऊन मोठ्या जोरानें वाड्याच्या पायरीवर आपटीत आहे, इतक्यांत एका मोठ्या भव्य वाघानें येऊन त्या विक्राळरूपी ह्मातारीच्या बाईवर उडी मारली. मूल आपण ज्या खिडकींत उभी आहें त्या ठिकाणीं उडून येऊन पडलें व तें आपल्याकडे पाहून हांसलें. पण ती बाई मोठ्यानें ओरडून उंच उंच होत चालली, होत होत आकाशास तिचें डोकें लागलें. त्यावेळीं आकाशांत मोठी मेघगर्जना होऊं लागली. जिकडे तिकडे अंधार पडला. इतकें पाहून राणी भ्याली व झोंपेंत किंकाळी फोडून जागी झाली आणि पाहते तों आपण पाहिलेलें सर्व

स्वप्न, अशी तिची खातरी झाली. मात्र स्वप्नांतील खरेपणा ह्मणण्यासारखा एवढाच दिसून आला कीं, जागी झाली तेव्हां आकाशांत मोठी मेघगर्जना चालली होती. तावदानांच्या खिडकींतून तिणें पाहिलें तों विजा चमकत आहेत असें दिसलें. कांहीं वेळानें मोठ्यानें पाऊस पडण्यास सुरवात झाली. तें सर्व पाहून राणीनें राजास हळूच जागे केलें, व स्वप्नांत ओरडल्याचा सर्व प्रकार सांगितला आणि विचारिलें प्राणनाथ, याचा काय बरें अर्थ असावा?"

राजा—हे प्रिये, तूं काय वेडी आहेस? स्वप्नाचा कोठें अर्थ ऐकिला आहे? मनांतीलच विचार कांहीं रूपांतरानें स्वप्नांत दिसत असतात. तुह्मींच ह्मणत असतां कीं "मनीं वसे तें स्वप्नीं दिसे" रात्रीं आपल्या बोलण्यांत मूल, वाघ वगैरे आलेंच होतें. तेव्हां त्यासंबंधीं कांहींतरी स्वप्न पडलें यांत काय नवल!

प्रातःकाळ झाला; रणधीररावाची मोठी निराशा झाली. कारण मोठ्या वाघाची वर्दी आली असतां जाणें होईना. सकाळपासून पावसानें एकसारखी झोड धरली. सर्व प्रदेश जलमय होऊन गेला. आठ नऊ वाजतां पाऊस खळला परंतु मग जो वाऱ्याचा सोसाटा सुरू झाला—तो कांहीं विलक्षण!—मोठमोठे जुनाट वृक्ष समूळ उलथून पडले, घरांवरील कवलें गवताप्रमाणें उडूं लागलीं, शहरांत पुष्कळ ठिकाणीं फार नाश झाला.

अशा समयीं बाहेर सहल करण्यास अथवा मौज मारण्यास जाण्याचें कोणाच्या मनांत येईल? रणधीरराव शहरांत कोणीकडे किती नासाडी झाली याबद्दल चौकशी करून कळविण्यास शहरच्या कामगारांस सांगून आपण

नित्यकृत्यास लागले. सायंकाळचे पांच वाजतां त्यांनीं गाडी जोडून आणण्यास सांगितलें. त्यांच्या मनांत आलें कीं आपण स्वत: जाऊन शहरांतून फिरून यावें. मग गाडींत बसून दोन तीन वेशी फिरले. कित्येक लोकांचीं घरें पडलीं होतीं, कित्येकांचीं गुरें मेलीं होतीं, कित्येकांच्या घरांत पाणी शिरून फार नाश झाला होता. त्या स[illegible] राजेसाहेबांनीं स्वतां विचारपूस केल्यामुळें त्या लोकांस मोठा आनंद झाला. त्यांस योग्य मदत देण्याविषयीं तेथल्या तेथेंच महाराजांनीं हुकूम देऊन मग ते नदीकडे जाण्यास निघाले. नदीकडे जाण्याचा रस्ता एका भरवस्तीच्या गल्लींतून होता. त्या गल्लींतून घोड्यांची गाडी हाकतांना हाकणारास एकसारखें "पैस पैस" ह्मणावें लागत असे. त्याप्रमाणें महाराजांचा 'कोचमन' पैस पैस ह्मणत गाडी भरधांव हाकीत चालला होता. त्यावेळीं संध्याकाळ झाला होता. रस्ता सकाळच्या पावसानें अगदीं चिकट झाला होता. गाडी नदीच्या वेशीजवळ आली. आणि पुढें बाहेर जाणार इतक्यांत समोरून नदीकडून कांहीं बायका व मुलें यांचा एकच घोळका आला. वेशींत शिरतात तों घोडा बुजला व समोरून गाडी भरधांव येत आहे असें त्यांणीं पाहिलें. 'कोचमन' तोंडानें वरचेवर 'पैस पैस' करीत होता. आसपासचे लोक "अरे पोरांनो एका आंगास व्हा, गाडी खालीं सांपडून मरता कीं काय?" असें ह्मणत होते.

अशी एकच गर्दी झाली. मुलें कोणी एका आंगास झालीं, कोणी दुसऱ्या आंगास रस्त्यावर टाकण्याकरितां खडी फोडून ढीग रचिले होते त्यांवर मोठ्या चपळतेनें

चढलीं आणि गाडी त्या गर्दींतून निभावून बाहेर जाणार इतक्यांत कसें झालें असेल तें असो, जवळच्या घरांतून एक म्हातारी धावऱ्या धावऱ्या आडवी येऊन " बाळ्या ! बाळ्या ! कोठें आहेस रे इकडे ये " असें एकदम ओरडली.

बाळ्या—एक लहान दोन अडीच वर्षांचें मूल—त्या खडीच्या ढिगावर चढत होता, त्याणें म्हातारीचा शब्द ऐकतांच मान फिरवून मागें पाहिलें तों पाय निसटून तो खालीं पडला. त्याचक्षणीं बाळ्यावरून गाडी जाऊन त्याच्या आयुष्याचा शेवट होणार होता. परंतु कोचमनानें मोठी हुशारी केली. एका निमिषमात्रांत घोडे किंचित् बाजूनें नेले—बाळ्या वांचला—परंतु दुसऱ्या बाजूस म्हातारी आली होती, तीस घोड्यांचा धक्का लागून ती धाडकन खालीं पडली. राजेसाहेबांनीं गाडी लागलीच थांबविली, आणि आपण खालीं उतरून ते म्हातारीजवळ गेले. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण म्हातारीनें परलोकाची वाट धरली.

तें पाहून महाराजांस अत्यंत दुःख झालें. ही म्हातारी कोण व कोठची व ती कोठें राहते व तिचे घरांत आणखी कोण माणसें आहेत, याची लागलीच त्यांनीं चौकशी केली, तेव्हां समजलें कीं, ' ती म्हातारी तेथें येऊन चार दिवस झाले. ही कोण व कोठून आली तें कोणास ठाऊक नाहीं तिला दुसरें कोणी नाहीं. एक तें दोन अडीच वर्षांचें मूल.' त्या मुलाचें नांव घेतांच राजेसाहेबांस त्याची आठवण झाली. ते म्हातारीच्या गर्दींत त्यास विसरले होते. मग त्याला लागलेंच उचलून महाराजांनीं

पोटाशीं धरिलें. म्हातारीला कोणी नाहीं—एकटें हें मूल—म्हातारी एकाएकीं मरून गेली. ह्या सर्व गोष्टी मनांत उभ्या राहून महाराजांस राणीच्या स्वप्नाचें स्मरण झालें आणि म्हातारीचा शेवटचा विधि करण्याविषयीं हुकूम देऊन त्या मुलास आपल्याबरोबर गाडींत घेतलें आणि गाडी माघारी फिरविली.

वाड्यांत गाडी येण्याच्या पूर्वींच नदीच्या वेशीजवळ कांहीं अपघात झाल्याची बातमी राजवाड्याभर झाली होती; म्हणून महाराज येतांच राणी काय झालें तें विचारण्यास समोर आली, तों महाराजांनीं तो बाळ्या राणीपुढें ठेविला. बाळ्या अवधाकलेला होता.

गाडी, राजवाडा व राजवाड्यांतील लोकांची गर्दी वगैरे त्यानें कधीं पाहिलेलें नव्हतें. जेव्हां राणीचे समोर त्यास ठेविलें आणि राणीनें सदय अंतःकरणानें त्याजकडे पाहिलें तेव्हां तो म्हातारीचा बाळ्या राणीच्या तोंडाकडे पाहून आनंद पावला, आणि त्यानें "आई" म्हणून हाक मारिली !!

त्या दिवसापासून "बाळ्या" हा राजवाड्यांत राहिला. म्हणून राणी त्याजवर पोटच्या मुलाप्रमाणें प्रीति करूं लागली. त्याच्या गळ्यांत तांब्याची तायती होती ती जाऊन तेथें मोत्यांची कंठी आली. फाटक्या मळकट चिंध्या जाऊन उत्तम रेशमी आंगरखे व तुमानी आल्या. बाळ्या कोणाचा कोण, कोठचा, हें कोणास कळलें नाहीं. राजानें पुष्कळ शोध केला, परंतु ती म्हातारी कोठून आली त्याचा शोध लागला नाहीं. मग राजानें त्या म्हातारीची सर्व चीजवस्त—ती फार नव्हतीच—व बाळ्याचे पूर्वींचे कपडे, ती तायती वगैरे सर्व एका पेटींत घालून, तिला

मोहरबंद केली आणि ती पेटी बंदोबस्तानें ठेवण्यास सांगितलें.

त्या दिवसापासून बाळयाचें नांव बाबासाहेब झालें. त्यांच्या दिमतीस त्याच्या वयास शोभणारे चाकर मिळाले. महाराजांनीं मनांत आणिलें कीं, हा मुलगा कोणाचाही असो, त्याचें लालन पालन करणें ईश्वरानें मजवर सोंपविलें आहे, असें दिसतें. त्या जगदीशाची ती आज्ञा मी मनापासून पाळीन.

बाबासाहेबास पांचवें वर्ष लागतांच त्याच्या विद्याभ्यासाकडे राजेसाहेबांनीं लक्ष्य पोंचविलें. पुढें त्यांनीं त्या कामीं रेसिडेन्टाची सल्ला घेतली. रेसिडेन्टानें सांगितलें कीं, त्या मुलाकरितां एव्हांपासून मुंबईतील सोसाइटीचे शाळेपैकीं एकादा चांगला सुशिक्षित विद्वान गृहस्थ आणवावा. राजेसाहेबांस आपल्या प्रांतांत शाळाखात्यांत सुधारणा करण्याची होती, त्याकरितां एका विद्वान पंडिताची गरज होतीच. ह्मणून राजेसाहेबांनीं लागलेंच मेहेरबान हेंडरसन साहेबांस पत्र लिहिलें. त्यांजकडून उत्तर काय आलें व कोण विद्वान पंडित बाबासाहेबांस शिकविण्याकरितां आले तें मागें सांगितलेंच आहे.

# भाग ७.

नारायणरावजीस आपला लहानगा शिष्य पाहून आनंद झाला. त्याची वाड्यांत प्रवेश होण्याची हकीगत ऐकून त्यांस मोठी मौज वाटली. बाबासाहेब खचित कोणी दैववान प्राणी आहेत अशी त्यांनीं मनांत गांठ घातली. त्यांची ती हुशारी व कोणतीही नवीन गोष्ट शिकण्याविषयीं ती उत्सुकता हीं पाहून त्यांस वाटूं लागलें कीं, इंग्रेजी विद्येच्या अभ्यासापासून जे आपल्या मनांत एका प्रकारचे नवीन विचार उत्पन्न झाले आहेत ते बाबासाहेबांस शिकवून त्यांचें मन सुशिक्षित करावें. त्यांना वाटूं लागलें कीं आपल्या शिरावर मोठी जबाबदारी आहे. एका होतकरू मुलाचें शिक्षण आपल्याकडे आलें आहे—एका स्वदेशबांधवाचें भावी बरें किंवा वाईट आपल्यावर अवलंबून आहे. शिक्षकाचें काम साधारण आहे असें कोणी ह्मणोत—परंतु मला वाटतें कीं, तितक्या महत्वाचें काम या जगीं दुसरें कोणतेंच नाहीं. बालपणाच्या शिक्षणावर मुलांचें भावी स्वरूप सर्वांशीं अवलंबून असतें. ही जबाबदारी आपले आईबाप किंवा शिक्षक पूर्णपणें जाणूं लागले आहेत किंवा नाहींत याचा जरा संशय आहे. परंतु ती आमच्या नारायणरावजींनीं पूर्णपणें मनांत वागविली होती. नारायणराव आपला बहुतेक वेळ बाबासाहेबांबरोबर घालवीत असत. रणधीरराव शिकारीस जात त्यावेळीं मात्र नारायणराव महाराजांच्या मंडळींत जाऊन मिळत. नारायणरावजींनीं वाड्यापासून जवळच एका घरांत बिऱ्हाड केलें होतें. त्यामुळें ते बहुतेक सर्व वेळ वाड्यांतच असत. महाराजांस नारायणरावांच्या

समागमाची फारच गोडी लागली. बाबासाहेबांची खेळण्याची वेळ आली ह्मणजे नारायणराव व महाराज गोष्टी बोलत किंवा वर्तमानपत्रें वाचीत बसत. नारायणरावांकडे इंग्रजी वर्तमानपत्रांतील बातमी सांगण्याचें काम असे. सारांश, नारायणरावांचा बहुतेक वेळ वाड्यांतच खर्च होई आणि त्यांत त्यांना आनंदच असे; कारण बिऱ्हाडीं येऊन तरी काय करायाचें होतें? बिऱ्हाडीं कसलीही करमणूक नव्हती. बिऱ्हाडांत काय तो एक ब्राह्मण. बापड्याचें सारा वेळ बोलणें जेवणसंबंधी असावयाचें—नारायणरावजी रात्री घरीं जेवणास आले कीं, गोविंदभटजींनीं चालविली पटपट. सगळा दिवस शहरभर फिरायाचें आणि घरीं आले ह्मणजे यजमानापाशीं पाहिलें असेल किंवा ऐकिलें असेल त्याचा फाडा वाचावयाचा, असा त्यांचा नेहमींचा क्रम असे. नारायणराव स्वभावानें चौकस व आनंदी असल्यामुळें त्यांना त्यांत थोडी मौज वाटे. गोविंदभटजींचें भाषण एखादे समयीं ऐकण्यासारखें असे. नगरास आल्यावर चार सहा महिने झाले नाहींत तोंच नारायणरावाच्या सौजन्याविषयीं गावांत प्रसिद्धि झाली. तशांत ते महाराजांच्या कृपेंतील झाले ह्मणून नारायणरावांस मोठमोठ्या गृहस्थांकडील जेवणाचीं आमंत्रणें वारंवार येऊं लागलीं. एके दिवशीं नारायणराव एका श्रीमान् गृहस्थाकडे जेवणास गेले होते. मेजवानीचें जेवण ह्मटलें ह्मणजे जेऊन आल्यावर मग आपल्या गोविंदास बाहेर पडतांच यावयाचें नाहीं हें त्यांस ठाऊक होतें—मग त्यास निजूनच रहावें लागत असे. त्या दिवशीं रात्री नारायणराव घरीं आल्यावर मनांत ह्मणतात, "गोविंदाची आज कुटाळकी चालावयाची नाहीं, आज त्याचें तोंड

बंद राहील." मग घरांत आल्यावर ह्मणतात "क्कां गोविंदराव! आजचा कसा काय समाचार? आतां बहुधा तुह्मांला भूक नसेलच! पण आमच्याकरितां थोडेंसें कांहीं करा." तेव्हां,–

गोविंदभट–( मोठ्यानें सुस्कारा टाकून ) रावसाहेब, आज मोठी फजिती झाली.

रा०सा०–मला सांगायला नको. तुझी फजिती होत नाहीं कधीं!!–वेड्या लोकांकडे जेवायाला गेलास ह्मणजे तुला सुमार रहात नाहीं–फजिती झाली नाहीं असा तुझा एक दिवस तरी गेला आहे काय? आज एवढेंच जास्त दिसतें कीं, नेहमींची फजिती तुझ्या तोंडांतून बाहेर पडत नसते ती आज पडली. तेव्हां जरा आज कांहीं विशेष झालें असावें. पण त्यांत कांहीं नवल नाहीं! आजचा बेतच बेड्या तसा होता!!

गो० भ०–रावसाहेब तुमची नेहमींचीच थट्टा; पण आज खरोखर थट्टा करण्यासारखें कांहीं झालेलें नाहीं. आज मीं आपल्या मूर्खपणाबद्दल घरीं फडफडां तोंडांत मारून घेतल्या.

रा० सा०–अरे असला काय मूर्खपणा तूं केला? असें झालें तरी काय?

गो० भ०–रावसाहेब काय सांगूं! पण रावसाहेब येथील कायहो सोदेगिरीची रीत ही? मी पहा आज सोळा आणे फसलों ह्मणून ह्मणतों कीं, फजिती झाली.

रा० सा०–अरे कशी ती सांग एकदांची.

गो० भ०–काय रावसाहेब सांगावें–आपण त्या मोठ्या माजघरांत जाऊन पानावर बसलां. आमचीं पानें मागच्या

सोप्यांत होतीं. मी आपल्या पात्रावर बसलों. माझ्या शेजारीं दोनच्यार गृहस्थांचे ब्राह्मण होते. वाढणीं झालीं आणि जेवणास आरंभ करावयाचा–तेव्हां मनांत ह्मटलें एकदां सर्व पान पहावें;–आणि आपले आवडीचे पदार्थ असतील ते पाहून त्या वेळानें जेवणें, मग तिखट कोशिंबिरींपासून पाहण्यास केली सुरुवात. सर्व जिन्नस उत्तम–भाज्या, सांभारें, तो आंबेमोहराचा सुवासिक भात, तें पिंवळेंधमक वरण, व लोणकढें तूप, पाहून वाटलें याच वेताची पानाची डावी बाजू असेल. मग तिकडे पाहतों तों गव्हांच्या रोट्यांचे तुकडे–रोट्यांचा व माझा बारावा बृहस्पति–मनांत ह्मटलें कीं या गृहस्थानें रोट्या खायाला का इतके मंडळीस बोलाविलें! मग मी भात, वरण व तूप यांवर सपाटा चालविला! "भटजीबुवा, काय पाहिजे?" ह्मणून वाढपी विचारूं लागले. मीं ह्मटलें "महाराज भात, वरण व तूप येऊंद्या" ते ह्मणाले "अहो भात कशाला घेतां?" मी ह्मटलें "भातच पाहिजे." (मनांत ह्मटलें रोट्यांपेक्षां तो सुंदर भातच बरा.) ते ह्मणाले "घ्यावा तर." आणि माझ्या जवळ बसलेल्या भटांकडे डोळे मिचकावून त्यांनीं मला धूम भातच वाढला. जवळचे वस्ताद! येथचे पडले माहितगार; ते पहिले मुदींतीलच भात राखून हात खोळंबून बसले. त्यांचें पाहून बरें मी सावध व्हावें कीं नाहीं? परंतु काय करावें! माझें दुर्दैवच ओढवलें! मी आपला भात खात सुटलों. पोट बरेंच भरलें तों वांगीभाताची आली परात–मनांत चरें झालें!–कोंकणांत वांगीभात कर्णोपकर्णीं ऐकिलेला होता. मनांत ह्मटलें आतां सांठवूं कोणत्या पोटांत?' पण अगदीं पोट भरलें नव्हतें ह्मणून चांगला सपाटा मारला.

पुन्हा वांगीभातच आला पुन्हा घेतला. जवळचे ब्राह्मण आपले हातराखून होते—तें पाहून मीं मनांत ह्मणूं लागलों—'हे देशांतले आणि असे काय जेवतात? तर मग मी कोंकण्या जेवणारा—बरां.' भात झाल्यावर पाणी पिऊन बसलों. पोट चांगलें भरलें. आतां हललें अखेरचा—साधा भात येईल. तों आपली केशरीभाताची परात घेऊन वाढपी पुढें उभे. आतां काय करावें! कपाळावर हात मारून घेतला. मागाहून लाडू आले ते मोतीचूर कीं काय ह्मणतात ते लाडू—माझें तोंड बंद—अहो तोंड उघडें—पण घशाखालीं घांस उतरेल तर शपथ. तेव्हां मात्र जवळच्या ब्राह्मणांनीं सपाटा चालविला. काय त्यांचें खाणें तें "पडूंद्या पडूंद्या" हें चाललें होतें. मला वाढपी ह्मणतात "कां भटजीबुवा आतां हात कां खोळंबला? चालूंद्या किंहो!" मी खालीं मान घातली. पराकाष्ठेचें वाईट वाटलें. गोडाची मनापासून भक्ति आणि पोट तर भरलें. पानावर तो उत्तम भात व ते लाडू, खाण्याची पराकाष्ठेची इच्छा, पण कांहीं इलाज चालेना. रावसाहेब खरोखर सांगतों आतां त्याची आठवण झाली तर तोंडाला पाणी सुटतें—पानावरून उठायचें असतें तर पहिलें अन्न पाडून टाकून पुनः बसलों असतों. खरोखरी रावसाहेब मनांत इच्छा आहे, पदार्थ प्राप्त आहे, पण त्याचा जर उपभोग घेववत नाहीं तर त्यासारखें या जगीं दुसरें दुःख नाहीं.

रा०सा०-खासें! गोविंदराव तुमची फजिती ती हीच काय?

गो०भ०-हीच रावसाहेब दुसरी कसली असणार? पण खरें रावसाहेब अशी काय हो येथल्या लोकांची जीवघेऊ रीत ही? काय पदार्थ केले असतील ते प्रथमच आ-

पले वाढून टाकावे ह्मणजे जेवणारांस बरें ! आपले आवडीचे कोणते पदार्थ आहेत तें पाहून त्या बेतानें मनुष्य प्रथमपासूनच जेवील. नाटकांत कसें चांगलें असतें ! आपण तें—मुंबईंत ग्रांटरोडांत "[illegible]यणराव [illegible]व्यांचा मृत्यु" पहावयास गेलों होतों—पहिला भाग [illegible]सुर-आख्यान होता—आ[illegible] गेल्याबरोबर लगेच हातांत एक कागद मिळाला. [illegible] जवळच्यांला वि[illegible]लें "काय आहे हें?" ते ह्मणाले खेळांत 'पहिल[illegible] [illegible]पर्यंत काय होणार तें यांत लिहिलें आहे. मी तें सर्व ऐकिलें व मनांत ह्मटलें हें काम खासें ! पहिले ते गणपति व ती सरस्वती व ती बाणासुराची सभा आणि तें सर्व ठाऊक आहे. बाणासुर आख्यान तर दहा वेळ पाहिलें होतें. आतां ह्मटलें खुशाल एक झोंप ताणावी मग उठावें. असा कागद मिळणें हें पाहणारांस चांगलें—अमुक पहावयाचें तर द्या लक्ष, अमुक नाहीं पहावयाचें तर घ्या झोंप. याप्रमाणें ह्मटलें वाढपांत असावें. काय असेल तें सर्व एकदम वाढून सोडावें. सर्व ठिकाणीं अशी चाल आहे आणि येथेंच ही भिकार चाल कोणी घातली ?

रा॰सा॰—पुरे बाबा आतां; तूं ह्मणतोस ती सुधारणा करण्याविषयीं राजेसाहेबांस आपण सुचवूं बरें.

गो॰भ॰—(हंसतो) राजेसाहेबांस नको सांगायला. पण खरें ह्मटलें तर ही सुधारणा ह्या देशांत अवश्य पाहिजे होती. तुह्मी नेहमीं सुधारणा करण्याच्या गोष्टी बोलत असतां, ती एवढी कां बरें करीत नाहीं? सभा करून एकादें लेक्चर—

रावसा॰—गोविंदा आतां पुरे बरें.

अशा प्रकारें नारायणरावाच्या घरीं संभाषणाचें सुख असे, मग त्यांचा वेळ घरीं कसा जावा?

## भाग ८.

वर्षे कशीं पहा हं हं ह्मणतां जातात. तीं आपल्यास समजत सुद्धां नाहींत. आपण कधीं ओटीवर बसलेले असतों, आणि आपल्याकडे कोणी एक मोठी मुलगी कडेवर मूल घेऊन येते. तिला पाहून आपण एके आंगास सरतों. पण ती लाजत नाहीं. ती अगदीं आपल्याजवळ येते, अगदीं आंगाशीं येऊन भिडते. हें पाहून आपणास तिचा दांडगेपणा वाटतो. आणि ही दांड पोर निर्लज्ज आहे असें आपण मनांत समजतों. ती मुलगी हंसते आणि ह्मणते "मामा मला ओळखिलें नाहीं का? अहो मी तुमची चंद्री" "मामा" तिजकडे निरखून पाहतात—आश्चर्य पावतात—आणि ह्मणतात "चंद्रे तूंच का ग ती?—अग—तूं केवढी धिप्पाड झालीस! अग तूं 'परवां' मुठीएवढी होतीस आणि आतां केवढी झालीस ही!! अग हें मूल कोणाचें?"—तें ऐकून कांहीं उत्तर न करितां चंद्री हांसते मग "मामा" ह्मणतात—"अग ह्मणतेस काय? हें मूल तुझें! अग तुला 'परवां' पर्यंत कडेखांद्यावर घेऊन फिरवीत होतों इतक्यांत ग तूं मोठी झालीस केव्हां? आणि तुला मूल झालें केव्हां?" सारांश, वर्षांचीं वर्षें लोटलीं तरी आपणास "परवांच" असें वाटत असतें—सुखाचा काळ तर फारच लौकर जातो. मागील भागांत सांगितलेल्या गोष्टीस दहा वर्षें तेव्हांच लोटलीं.

"परवांचे" बाबासाहेब. त्यांच्या वयास आतां १८ वें वर्ष लागलें. इतक्या काळांत नारायणरावांच्या देखरेखीखालीं त्यांचा अभ्यास चांगला झाला. मराठी अभ्यास पण होऊन इंग्रेजींतही बराच प्रवेश झाला. बाबासाहे

वांवर महाराजांची फारच मर्जी होती. त्यांजकडे पाहून महाराज आपल्या राणीजवळ नेहमीं ह्मणत, "हा कोणाचाही असो—हलक्या कुळांतील खचीत नाहीं असें माझें मन सांगतें. हा एकाद्या सरदार कुळांतील असावा. याचें स्वरूप पहा कसें मनोहर आहे! आंगीं शूरपणा जणुं उपजतच होता असें वाटतें. लहानपणापासूनच तरवारी, बंदुका यांची आवड. अशी आवड साधारण मुलें कधीं दाखवितात काय? कसरतीनें याचें शरीर कसें ऐटदार बनलें आहे? बंदूक मारण्यांत तर याचो हात धरणारा येथें कोणी दिसत नाहीं; अभ्यासांतही याचप्रमाणें—नारायणराव वेळोवेळीं मजपाशीं त्याची फार स्तुति करीत असतात. दुर्गुण ह्मणायला काय तो एक तापटपणा. सर्व चाकरमाणसांवर जणूं काय आपण तरूण धनीच, असा कडक अम्मल करीत असतो. परवां फिरायाला निघतेवेळीं मोतद्दारानें त्याचा तो 'अस्मानतारा' अरब, इंग्रेजी जीन घालून पुढें आणिला तों त्याची लगाम जरा मळीण होती, सामान चांगलें पुसलेलें नव्हतें. तें पाहतांच बाबासाहेबानें मोतद्दाराच्या पाठीवर जोरानें दोन चाबूक ओढिले. तो बिचारा पागेच्या कामगाराकडे रडत गेला. चाकरांस ठाऊक आहे हा कोण व या वाड्यांत कसा आला. पण ते आपली कृपा त्यावर पूर्ण आहे हें पाहून वचकतात. कसें बोलतील बिचारे! असो; पण प्रिये, भागूबाईपणापेक्षां मुलानें असला दांडगेपणा करावा हें बरें. असा उद्दामपणा हा आंगांतील एका प्रकारचें शूरत्वच दाखवितो. तो मुलगा पुढें कोणत्या प्रकारचा मनुष्य होईल याचा हा पूर्वसूचक गुणच आहे असें ह्मटलें तरी चालेल."

यांप्रमाणें महाराज बाबासाहेबांविषयीं वारंवार बोलत असत. एके दिवशीं राणी महाराजांस ह्मणते, "प्रिया, बाबासाहेब मजजवळ असला ह्मणजे फार गरीब असतो. त्याचें तें सौजन्य, मजवरील माया, व हर-एक गोष्टींत माझी चाकरी करण्याविषयीं तत्परता हे गुण पाहून मला फारच आनंद होतो. जसें त्याचें शरीर सुंदर आहे तसें त्याचें मनही सुंदर आहे. प्रिया, पुढें त्याचें कसें काय करावयाचें?" तेव्हां–

राजा–तो विचार माझ्या मनांत नेहमीं घोळत आहे. प्रथम माझ्या मनांत त्याचें लग्न करून टाकण्याचा विचार आला आहे. त्याचें कूळ शीळ कांहींच माहीत नसल्यामुळें येथील कोणी आपली मुलगी देण्यास पुढें होत नाहीं. परंतु आपले नवीन आलेले सेनापति हे मात्र कबूल करतील तर पाहावें. कालच त्यांच्याजवळ मी गोष्ट काढिली होती. त्यांची ती मुलगी तुह्मी पाहिली नसेल? मीही इतके दिवस पाहिली नव्हती. ती जाणती व सुंदर आहे असें ऐकिलें मात्र होतें. आज प्रातःकाळीं नारायणरावजींबराबर सहज मुलींचे शाळेंत गेलों होतों. बराबर बाबासाहेब होताच. तेथें तें कन्यारत्न पाहिलें. काय तें स्वरूप! अद्वितीय.!! मी वयातीत तरी देखील तिचेवरील दृष्टि माझ्यानें दुसरी-कडे करवेना. मग बाबासाहेबांची अवस्था काय झाली असेल याचें अनुमान तूंच कर. तिला पाहतांच तो चपापला. त्याला वाटलें असेल कीं वीजच चमकली कीं काय? माझी दृष्टि त्याजकडे व तिजकडे लागलेली होती. त्याचें अंग कांपत होतें. मुखावर लाली आली होती. डोळे कावरेबावरे झाले होते. त्या सर्व चेष्टांवरून त्या-

च्या मनांत कांहीं विलक्षण तऱ्हेचा भाव उत्पन्न झाला असावा असें दिसलें. सुंदरीनें (त्या मुलीचें नांव सुंदरी) एकवेळ मात्र बाबासाहेबांकडे पाहिलें तों तिची व बाबासाहेबांची दृष्ट एक जाहली तेव्हां दोघेंही ओशाळल्यासारखीं दिसलीं. सुंदरी लागलीच दृष्टि माघारी घेऊन खालीं पाहत सलज्ज उभी राहिली. पुढें तिच्या मनांत काय आलें होतें हें सांगवत नाहीं. पण ती आपल्या पायांवर एकसारखी नजर लावून पायाचीं बोटें वर खालीं चाळवीत उभी होती, व ती त्यावेळीं व्यग्रचित्त होती असें वाटलें. कारण जेव्हां तिजकडून पुस्तक वाचून घेतलें त्यावेळीं ती अगदीं भांबावून गेल्यासारखी दिसत होती.

वाचकहो, महाराज मुलींच्या शाळेंत गेले त्यावेळीं त्यांनीं पहिल्या वर्गांतील मुलींचें वाचन, भूगोल, व इतिहास, यांत थोडी परीक्षा घेतली. त्यावेळीं वर्गांत पहिल्याच जागीं एक सुमारें तेरा चौदा वर्षांची सुंदर मुलगी होती. तीच वर सांगितलेली "सुंदरी" होय.

सुंदरीनें त्यावेळीं वर्गांत—जणुं तिचें मन कांहीं अन्य विषयांत अगदीं निमग्न झालें आहे अशी वर्तणूक केली. प्रश्न विचारिला असतां तिकडे तिचें लक्षच नसावें. खालच्या मुलीनें ह्मणावें "सुंदरे, तुला विचारिलें आहे, अशी काय करितेस?" तेव्हां तिनें लाजल्यासारखें व्हावें; आणि खालीं मान घालून सलज्ज मुद्रेनें "काय प्रश्न?" ह्मणून विचारावें. शाळेच्या मास्तरासही मोठें आश्चर्य वाटलें. कारण सुंदरीने हुशारीविषयीं नेहमीं तारीफ होत असे.

त्या दिवशीं शाळा सुटली व मुली घरोघर चालल्या तेव्हां वाटेंत सुंदरीच्या वर्गांतील मैत्रिणी तिला ह्मणतात,

"सुंदरे! आज काय ग तुला झालें? अशी कां ग बावरल्यासारखी करीत होतीस? राजेसाहेबांना कधीं पाहिलें नाहींस वाटतें? काय खुळे? मुंबई कोठें आहे? हें विचारिलें तें देखील तुला सांगतां येऊं नयेना?"

सुंदरी काय उत्तर देते? ती वर्गांत खरोखरच "बावरून" गेली होती. वाचकहो, कां तें तुह्मांला समजलें? आमच्यानें कांहीं खात्रीनें सांगवत नाहीं. एवढें मात्र आह्मांस माहीत आहे कीं, पूर्वरात्रीं सुंदरीचे वडील सेनापतिसाहेब राजवाड्यांतून घरीं येतांच एकदम आपल्या पत्नीच्या महालांत गेले. तेथें सुंदरी व तिची आई अशा बसल्या होत्या. सेनापति आंत येतांच ह्मणाले, "सुंदरे, जा बेटा अम्मळ बाहेर जा." तें ऐकतांच सुंदरी बाहेर गेली. मग सेनापति आपल्या बायकोस ह्मणाले:—

**सेनापति**— प्रिये, आज महाराजांनीं एक मोठी आनंदाची गोष्ट विचारिली.

**पत्नी**— ती कोणती बरें?

**सेना०**— महाराज—पण सुंदरी येथें नाहींना? (अमळ हळू शब्दानें) महाराज ह्मणतात कीं, तुमची सुंदरी बाबासाहेबांस द्यावी. कायग बाबासाहेब केवळ रत्न आहे; नाहीं बरें! आपल्या सुंदरीस योग्य नवरा आहे. सर्व शहर त्यांच्या गुणानें गर्जत आहे. आणि तुला कळलें का? महाराज बाबासाहेबांस पुढें दत्तक घेणार आहेत अशी बारीक बातमी आहे.

**पत्नी**— मग आणखी काय पाहिजे? सुंदरीस देण्याचें एकदम कबूल करावें. परंतु प्रथमतः दत्तविधानाविषयीं खचित झालें पाहिजे. बाबासाहेबांचें जन्मकथन ऐकिलें तें मोठें

चमत्कारिकच आहे. तेव्हां ते महाराजांचे दत्तपुत्र झाल्या-विना आपली सुंदरी त्यांस देणें योग्य नाहीं.

सेना०—होय, तूं म्हणतेस तें खरें. त्याविषयीं बोलेन. पण सुंदरीचें मन कसें आहे तें पहा. कारण ती जाणती आहे.

पत्नी——तें माझ्याकडे लागलें.

हें बोलणें संपतांच सेनापति खोलीचें दार उघडणार तों तेथून कोणी मुलगी हलक्या पावलानें सैंपाकघरांत गेली. ही मुलगी कोण बरें होती? ही सुंदरी होती काय? शंका कशास पाहिजे? होय सुंदरीच होती. वाचकहो, याबद्दल आमच्या सुंदरीस फारसा दोष देऊं नका. आपण काय बोलत आहों तें तिणें ऐकूं नये म्हणून बापानें तिला बाहेर घालविली असा हा सर्व जन्मांत आमच्या सुंदरीवर पहिलाच प्रसंग होता. तशांत तिचें वय लहान. तेव्हां अल्पवयास साहजीक अशा जिज्ञासेनें ती आपल्या बापाचें बोलणें चोरून ऐकत जवळ उभी राहिली. यांत तिचा मोठा दोष आहे असें आम्ही समजत नाहीं, व आपणही कृपाकरून समजूं नये.

# भाग ९.

मुलींच्या शाळेंतून आल्यापासून बाबासाहेबांच्या वृत्तींत थोडा फरक दिसूं लागला. दररोज सायंकाळीं पांच वाजतां घोड्यावरून रपेटीस जाण्याची वहिवाट असे. बरोबर नारायणरावजी जात असत. नारायणरावजी या फिरण्याच्या वेळांत आपल्या शिष्याबरोबर दररोज कांहींतरी विषयावर बोलत असत. या बोलण्याचा सर्व झोंक बाबासाहेबांच्या मनास अनेक विषयांची ओळख करून देण्याचा असे. बाबासाहेबही तें सर्व बोलणें, अगदीं मनापासून ऐकत असत; त्यामुळें नारायणरावांस फारच आनंद होत असे. परंतु आतां बाबासहिबांचें मन अंमळ व्यग्र दिसूं लागलें. दररोज निरनिराळ्या रस्त्यानें शहरा बाहेर जात असत. आतां बाबासहिबांनीं कांहीं तरी युक्ति काढून नेहमीं रविवार पेठेंतूनच शहराबाहेर जाण्याचें धरिलें. बरेच दिवस नारायणरावजींस बाबासाहेबांचें वर्म समजलें नाहीं. राजवाड्यांतून बाहेर पडले ह्मणजे, कांहीं दूर गेल्या नंतर पुढें तिहींकडे रस्ता फुटतो. समोर पेठेंतून गेलें, ह्मणजे तो रामपुरा लागतो; डाव्या बाजूचा रस्ता नारायणपेठेंत गेला होता; व उजव्या बाजूकडील रस्ता रविवार पेठेंत गेलेला असे. हे उभयतां गुरुशिष्य वाड्यांतून निघाले, कीं नारायणरावजींनीं कांहीं तरी विषयावर बोलणें काढावयाचें. तो तिठा येई तोंपर्यंत नारायणरावजी आपले बोलण्याचे नादांत असत; ती संधी पाहून आमचे बाबासाहेब कांहीं तरी युक्तीनें उजवीकडे वळत. नारायणरावजींनीं असें दोन चार वेळां पाहिलें. एके दिवशीं ह्मणालें, "बाबासाहेब! रोज रोज ह्याच रस्त्यानें कोठें जातां?

आज चला रामपुऱ्यांतून जाऊं." तें ऐकतांच बाबासाहेबांचें तोंड खरकन् उतरलें. चेहरा सलज्ज झाला, अशा संधींत नारायणरावजींनीं सहज बाबासाहेबांच्या तोंडाकडे पाहिलें. तों बाबासाहेबांचें तोंड अम्मळ ओशाळल्यासारखें दिसलें. ह्या सर्व चिन्हांचा अर्थ नारायणरावजींनीं लागलाच ताडला. पण आपल्यास कांहीं संशय आला आहे, असें त्या दिवशीं तिळमात्र न दाखवितां निमूटपणें ते रामपुऱ्यांतून चालले. त्या दिवसाचें फिरणें बाबासाहेबांस दररोजचे प्रमाणें सुखकारक झालें किंवा नाहीं याचें अनुमान आमचे तरुण वाचकांस लौकरच करितां येईल.

नारायणरावजींनीं लागलेंच ताडलें कीं, आमच्या बाबासाहेबांचें मन कोठें तरी मोहक वस्तूवर गुंतलें आहे. मग बाबासाहेबांची ती रम्य वस्तु कोणती; व ती त्यांचें स्वरूप व गुण यांस योग्य आहे किंवा कसें, याचा पुरा तपास करण्याचा त्यांणीं निश्चय केला. दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें ते उभयतां फिरण्यास निघाले व त्या तिठ्या जवळ येऊन पोहोंचले; तों बाबासाहेबांनीं आपला घोडा चटकन् उजवीकडे वळविला. तें पाहून नारायणरावजींनींही आपला घोडा कांहीं न बोलतां त्याच रस्त्यानें धरला. आतां नारायणरावजी मोठ्या हुशारीनें चालले. दोहों बाजूंच्या घरांकडे पहात व हळूच बाबासाहेबांकडे चोरून दृष्टि लावीत अशा रीतीनें चालत ते एका दोन मजली घराजवळ आले. त्यावेळीं बाबासाहेब अंमळ ताठ होऊन बसले; हातीं लगाम मोठ्या ऐटीनें त्यांनीं धरली; व एक हात उगाच डोकीच्या मंदिलाकडे नेला; आणि बोलतां बोलतां त्या दुमजली माडीच्या एका खिडकीकडे नजर

फेंकली. नारायणरावजींनीं ती संधि राखिली; आणि त्याचवेळीं खिडकीकडे पाहिलें तों कोणी दृष्टीस पडलें नाहीं. परंतु भरजरी शालू नेसलेलें कोणी लाजून आंत गेलें असावें असें त्यांस वाटलें. हें सर्व एका क्षणांत झालें. मग नित्याप्रमाणें पुढें जाऊन सहा वाजण्याच्या सुमारास ते उभयतां वाड्यांत परत आले.

दुसरे दिवशीं नारायणरावजींस शिकार चांगली साधली. रविवारपेठेंतील तें घर लांब आहे, तेथपासूनच ते पूर्वदिवशीं पाहिलेल्या खिडकीकडे नजर ठेवून चालले. अम्मळ जवळ गेल्यावर त्यांनीं असें पाहिलें कीं, त्या खिडकीच्या तोंडाशीं एक सुंदर मुलगी हातामध्यें पुस्तक घेऊन खुर्चीवर बसली आहे. ती पुस्तक वाचीत आहे असें जरी दाखवीत होती, तरी तिचें तें वाचणें झपाट्यानें चालावें तसें चाललें नसावें असें स्पष्ट दिसत होतें. कारण सरासरी २० पळांत तिणें आपल्या हातांतील पुस्तकावरून पांच सहा वेळ बाबासाहेब व नारायणराव हे जिकडून येत होते तिकडे पाहिलें, असें दिसलें. मग ते अंमळ लांब आहेत तोंच ती उठून आंत गेली.

नारायणरावजींनीं घरीं आल्यावर रविवारांतील त्या हिरव्या रंगाच्या हवेलींत कोण राहत असतें ह्मणून तपास केला; तों तेथें आलीकडेस महाराजांचे सेनापति भगवंतराव राहत असतात असें समजलें. हें ऐकून नारायणरावजींस फार आनंद झाला. बाबासाहेबांचें मन योग्य स्थळीं लुब्ध झालें आहे, अशी त्यांची खात्री झाली. कारण मागें सांगितलेल्या दिवशीं नारायणरावजी महाराजांबरोबर मुलींचे शाळेंत गेले होते.

नारायणरावजींनीं बाबासाहेबांच्या मनाची स्थिति राजेसाहेबांस दुसरे दिवशीं लागलीच कळविली. तें ऐकून राजेसाहेब ह्मणाले, "बाबासाहेबांच्या मनानें पसंत केलेली मुलगी मी त्या दिवशीं पाहिली. त्या दिवशीं तुह्मी बराबर होतांच. त्याच वेळीं मला वाटलें कीं, ही सुंदरी बाबासाहेबांस योग्य आहे. मी दुसरे दिवशींच सेनापतींजवळ पुन्हा गोष्ट काढिली. त्यांनीं एक हरकत घेतली; आणि ती मला वाटतें बराबर आहे. ते ह्मणतात, बाबासाहेब कोण, कोठले, हें ठाऊक नाहीं तेव्हां आह्मांसारख्या कुलीनानें एकदम आपली मुलगी कशी द्यावी? शिवाय बाबासाहेबांबद्दल महाराजांचा काय विचार आहे तें कळत नाहीं. आणखी ते ह्मणाले, सुंदरी जाणती व सज्ञान आहे तेव्हां या कामीं तिचा मानस कसा आहे, हें समजल्याशिवाय रुकार देववत नाहीं. मग मी गेल्या सोमवारीं रेसिडेन्ट साहेबांकडे गेलों; आणि त्यांस माझा मानस बाबासाहेबांस दत्तक घेण्याचा आहे असा दर्शविला. त्यांनीं ती गोष्ट कबूल केली, व आपण सरकारास कळवितों ह्मणून सांगितलें आहे. नारायणरावजी! औरस पुत्र झाला नाहीं तर बाबासाहेबांस दत्तक घ्यावा असें फार दिवस माझ्या मनांत आहे. इंग्रज सरकारचे आमच्या घराण्याशीं तह चांगले आहेत, तेव्हां तिकडून कांहीं हरकत होईल हें मनांत सुद्धां आणावयास नको."

रणधीररावाच्या मागें बाबासाहेब समशेरबहादूर व्हावे; हें नारायणरावांस बाबासाहेबांच्या भावी स्थितीविषयीं जी कल्पना होत होती त्यास अनुसरूनच होतें. ते घरीं येऊन आपल्याशींच ह्मणतात, "बाबासाहेब महाराजांस दत्तक

घेण्यास योग्य आहेत, परंतु मला एका गोष्टीची शंका येते, हें दत्तविधान कबूल कसें होईल?" परंतु त्या शंकेचें त्यांणीं लागलेंच निवारण केलें. भाग १० वा.

महाराज मागें सांगितल्याप्रमाणें नारायणरावांपाशीं बोलले, त्याच्या दुसरे दिवशीं नारायणराव बाबासाहेबांस बरोबर घेऊन नेहमींपेक्षां बरेच लवकर फिरण्यास निघाले. कारण बाबासाहेबांविषयीं राजेसाहेबांचे मनांत जो हेतु होता, तो सर्व त्यादिवशीं बाबासाहेबांस कळवावा असें नारायणरावजींस वाटलें. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें दररोजच्यापेक्षां लवकर म्हणजे सुमारें चार वाजतां ती गुरुशिष्यांची जोडी घोडयांवरून निघाली. वाड्यांतून बाहेर पडून पेठेंतून चालले तों समोरून एक भिकारीण हातांत एक लहानसा विणा घेऊन गाणें म्हणत व दारोदार भिक्षा मागत चालली होती, तिजबरोबर एक लहान दहा बारा वर्षांचें मूल होतें. तेंही त्या स्त्रीबरोबर गात चाललें होतें. ती अम्मळ लांब होती त्यावेळीं तिणें एक दिंडीचा चरण फार उत्तम सुरावर म्हटला.

तुझी बुद्धी काय बा वय सान ॥

त्यावेळीं आमचे गुरुशिष्य कांहीं लांब होते ह्यामुळें तो चरण त्यांनीं ऐकिला नाहीं असें दिसतें. बाबासाहेबानें तर खचितच ऐकिला नाहीं. कारण अम्मळ जवळ जातांच जेव्हां तिणें दुसरा चरण म्हटला—

तुज कैसें होईल दग्शन ॥

तेव्हां बाबासाहेब अंमळ चपापले; आणि सहज त्यांच्या तोंडांतून एकदम उद्गार निघाला. "काय भलतें भलतेंच बोलते सठवीं ही!" हें ऐकून नारा-

यणराव म्हणतात. "बाबासाहेब तें गाणें वाईट आहे काय? तें भलतें कसें?" नारायणरावांस त्यांविषयीं बाबासाहेबांच्या मनांत काय विचार चालले होते हें ठाऊक नव्हतें. नारायणरावजींनीं पूर्व मानसिक विचार, एका महत्त्वाच्या विषयांत गुंतविले होते. "आज बाबासाहेबांस थोडीशी राज्यरीती सांगावयाची" असा त्यांचा मानस होता. बाबासाहेबांचें तर सर्व मन (लिहिण्यास अमळ संकोच वाटतो) त्या रविवार पेठेंतील हिरव्या हवेलीच्या खिडकींत बसून पुस्तक वाचणाऱ्या मोहक मूर्तीनें वेधलें होतें.

नारायणरावजींनीं हें गाणें भलतें कसें? असें म्हणतांच बाबासाहेब शुद्धीवर आले. मग आपल्या मनांतली गोष्ट मनांतच ठेवून.--

बा० सा०—गाणें भलतें नाहीं. परंतु म्हटलें दर्शन कसलें होणार नाहीं ही म्हणते?

नारा०—ती ध्रुवाख्यानांतील एक सुंदर दिंडी आहे. ध्रुवाची गोष्ट तुम्हांस ठाऊक नसेल. ती फारच मौजेची आहे. तो लहान पांच वर्षांचा बाळ असतां कांहीं कारणावरून आईस विचारितो, "आई, ईश्वर कसा आहे? व तो कोठें राहतो? त्याजवळ जाऊन मी आपल्याकरितां एक अविनाशी जागा मागेन." तेव्हां त्याची आई म्हणते, "अरे बाळा! तो तुला कसा भेटेल? अरे महान् महान् साधु वल्कलें धारण करून; व मोठे जटाभार वाढवून अरण्यांमध्यें रात्रंदिवस त्या दीनदयाळू जगदीशाचें ध्यान एकाग्रतेनें करीत बसतात, तरी देखील त्यांस त्याचें दर्शन होत नाहीं; आणि बाळा! तुला कसें होईल?

तुझी बुद्धि किती अल्प, वय किती लहान, त्या तुला कसलें दर्शन होणार?" त्यावर तो बाळ निश्चयानें म्हणतो. ऐका ती भिकारीण म्हणत आहे तिकडे लक्ष द्या.

भिका० ॥ ध्रुव बोले त्यजिन आपुला प्राण ॥
न भेटे तो देणार दरशन ॥

हे दोन चरण तिणें फारच उत्तम रीतीनें म्हटले. ते ऐकून तर बाबासाहेबांचें मन अगदीं विरघळून गेलें. कारण त्यावेळीं. त्यांचें मन स्त्रीप्रेमसूत्रानें अगदीं आकर्षिलें होतें. बाबासाहेबांस त्यावेळीं ध्रुवाची गोष्ट फारशी आवडली नसेल. परंतु तें गाणें त्यांस फारच मौजेचें वाटलें; आणि तें ऐकण्यासाठीं अगदीं तल्लीन मुद्रेनें त्यांनीं त्या भिकारणीकडे दृष्टि लाविली. इतक्यांत त्या भिकारणीच्या मागून आणखी दहावीस भिकाऱ्यांची झुंड भिक्षा मागण्यास निघालेली येऊन भिडली. त्यांस पाहून—

बा० सा०—या आपल्या राज्यांत इतके भिकार कोठलें? काय ही दुःखाची गोष्ट कीं, आपल्यास खाण्यापिण्यास जें पाहिजे तें उत्तम व ताजें असावें; आणि या बिचाऱ्यांस शिळे तुकडे तेही नुसते पोटभर मिळू नयेत. मी तर या राज्यांत एकही भिकार राहूं देणार नाहीं.

नारा०—(ही संधी खाशी आहे असें मनांत आणून) बाबासाहेब, आपण या राज्यांत एकही भिकार राहूं देणार नाहीं ह्मणजे काय करणार? हे भिकार तुह्मी कसें बंद कराल सांगा पाहूं?

बा० सा०—भिकार बंद करण्यास काय कठीण आहे! चोहोंकडे अन्नसत्रें घालून ज्यांस खाण्यास मिळणार नाहीं;

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



त्यांस तेथें आणून यथेच्छ खाऊं घातलें; ह्मणजे असें भिकार रस्त्यांतून कधींच फिरतांना दिसणार नाहीं.

नारा०—बाबासाहेब! तुह्मी पुढें या छोट्या राज्याचे कदाचित् मालक व्हाल. यासाठीं मी सांगतों हें लक्षांत ठेवा कीं, तुह्मी आतां जी भिकार घालविण्याची युक्ति ह्मटली, ती अगदीं चुकीची आहे. बाबासाहेब! आमच्या लोकांमध्यें धर्माचें फारच खूळ होऊन बसलें आहे. या खुळानें सर्व देशाची नासाडी झाली आहे. हें तुह्मीं लक्षांत ठेवा कीं, तुमच्या युक्तीनें देशांतील भिकारी कमी तर होणार नाहींतच; पण उलटे जास्त मात्र होतील. पात्रापात्र विचार न करितां पाहिजे त्यास अन्नदान, अथवा द्रव्यदान, केल्यानें दान करणारा, व दान घेणारा असे दोघेही मोठे दोषी होतात. अशा दानाच्या योगानें लोकांत दारिद्र्य वाढतें. कोणतेंही काम करण्याची त्यांची उमेद नाहींशी होते. त्यांचें स्वातंत्र्य नाहींसें होतें. दुर्बळ व निरुद्योगी—कारण आळशी—अशा लोकांची मात्र संख्या जास्त वाढते. बाबासाहेब! हें आपण पूर्ण लक्षांत ठेवा कीं, जो शरीरानें पंगु, श्रम करण्यास असमर्थ तोच दान देण्यास योग्य होय. आमच्या देशांत हल्लीं दरिद्र फार वाढलें आहे, आणि लोकांत उमेद व स्वतंत्रता नाहींत याचें कांहीं अंशीं तरी आमच्या श्रीमान् व राजेलोकांचा धर्म करण्याचे कामांत अविचारीपणा हें कारण होय. अशी माझी खात्री झाली आहे.

बा० सा०—क्षुधितांस अन्न दिल्यापासून दोष कसा लागतो तो अद्यापि मला समजला नाहीं.

नारा०—सांगतों ऐका. खरोखर क्षुधितांस अन्न देऊं नये असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु अशावेळीं बऱ्याच गो-

ष्टींचा विचार केला पाहिजे. प्रत्येक मनुष्यानें व विशेषेंकरून राजेलोकांनीं आपण करीत आहों त्या गोष्टीचें पर्यवसान कोठें आहे तें पाहिलें पाहिजे. एकादी गोष्ट तात्कालिक सुखाची असेल, पण तीच परिणामीं अनिष्टोत्पादक होईल. धर्माच्या कामांत ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ज्यांला आपली उपजीविका करण्याचें सामर्थ्य आहे, त्यांची उपजीविका तें सामर्थ्य खर्चून झाली पाहिजे. आंगीं सामर्थ्य असतां फुकट उपजीविका होऊं लागली तर तें सामर्थ्य असून व्यर्थ होतें. त्या सामर्थ्याचा देशास कांहीं उपयोग होत नाहीं. बाबासाहेब! मला तर असें वाटतें कीं, आपल्या देशांतील जे शेंकडो ब्राह्मण भिक्षुकीवर आपली उपजीविका करीत आहेत ती जर तशी त्यांना करितां न येतां त्यांस पोटाकरितां श्रम करणें जरूर पडतें, तर तेणेंकरून त्यांचा उद्योग, कल्पना, व साहसीपणा वाढून त्यांचें व आपल्या देशाचें मोठें कल्याण झालें असतें. आपण ह्मणतां कीं जागोजागीं अन्नसत्रें घालावीं. पण या अन्नसत्रांपासून काय तोटे झाले आहेत ते आपणांस ठाऊक नाहींत. ज्या ज्या ठिकाणीं हीं सत्रें आहेत त्या त्या ठिकाणीं निरुद्योगी व आळशी लोकांचा मोठा समुदाय जमलेला आहे.

हें बोलणें होत आहे तों ते उभयतां रविवार पेठेंत त्या हिरव्या रंगाच्या हवेलीजवळ येऊन पोंहचले. त्यावेळीं बाबासाहेबानें दररोजच्या प्रमाणें त्या हवेलीकडे दृष्टि फेंकली, तेव्हां त्यांस आपली इच्छित वस्तु दृष्टीस न पडतां ती नुकतीच पाहिलेली भिकारीण व तिचें तें दहा बारा वर्षांचें मुलगें हीं एका आडगल्लीनें येऊन त्या हवेलीच्या

दारासमोर उभीं राहून गात आहेत असें दृष्टीस पडलें. बाबासाहिबानें तिजला पाहिली त्यावेळीं ती आपल्या मुलास आपली करांगुली धरण्यास देऊन एका हातांत तो विणा घेऊन त्या हवेलींत शिरूं लागली; व तिजबरावर बाबासाहेबांचें मनही त्या हवेलींत शिरलें असें वाटतें. कारण नारायणरावजींनीं पुढें बराच वेळ राज्यव्यवस्थेविषयीं बोलणें चालविलें होतें. परंतु ऐकतो कोण? बाबासाहेबांचें सर्व लक्ष त्या हवेलींतील सुंदरीकडे लागलें होतें. त्यांचा देह मात्र घोड्यावर होता, पण चित्त त्या हवेलींत. असा तो गर्क होऊन पुढें प्राप्त होणाऱ्या काल्पनिक सुखाच्या घमेंडींत निमग्न असतां वारंवार नारायणरावजींस "ऐकलेंतका बाबासाहिब" असें ह्मणावें लागत असे येणेंकरून नारायणरावजींची अम्मळ नाखुशी झाली. मित्रहो! एक विरहानें व्यथित व दुसरा नाखुष अशांच्या बराबर जाण्यांत फायदा तो काय? तर त्यांना सोडून आपण त्या भिकारणीचे मागून त्या हिरव्या रंगाचे हवेलींत जाऊन तेथील चमत्कार अवलोकन करूं चला.

## भाग ११.

ती भिकारीण आपण होऊन आंत गेली नसावी. कारण ती आंत जातांच ओटीवर चार पांच मुली जमल्या होत्या त्या ह्मणाल्या, "ये अशी इकडे, एथें बैस आणि चांगलीं गाणीं ह्मणून दाखीव." ती ओटीवर बसली आणि तिणें गाण्याची सुरुवात केली. एक दोन गाणीं होईपर्यंत मुली तटस्थ बसून ऐकत होत्या. मग त्यांपैकीं—

पहिली मुलगी—अरे सगळें मुसळ केरांत! अरे सुंदरी काठें आहे?

दुसरी मुलगी—अरे हो खरेंच! अरे ती नुकतीच एथें होतीना? जा पाहूं गंगे तिला बोलावून आण. आतांशीं सुंदरी मोठी चमत्कारिक झाली आहे. पहिल्याप्रमाणें मन मोकळें करून बोलत नाहीं, कीं खेळत नाहीं. (गंगाबाई सुंदरीस आणण्यास जाते.) मग आपण कशासाठीं बरें हिच्या घरीं यावें? (इतक्यांत गंगा एका मुलीस हातांत धरून आणिते.)

ती मुलगी सुमारें १४ वर्षांची असून स्वरूपानें फार सुंदर होती. तिच्या आंगावर त्यावेळीं डागडागिने अगदीं नव्हते ह्मटलें तरी चालेल गळ्यांत एक दोन सरांचें मोत्यांचें पेंढे; व हातांत दोन गोट, व दोन बिलोर, हे काय ते तिच्या आंगावर डागिने. नेसलेलें वस्त्रही उंची नव्हतें. साधें गुलाबी रंगाचें पातळ असून आंगांत चोळी हिरव्या साटणीची व जरीच्या कांठाची होती. असा तिणें साधासा व सभ्यरीतीचा पोशाख केला होता. पहाणारांस डागिने दिसत नव्हते; परंतु जे एक दोनच होते तेणेंकरून ती

फारच उत्तम दिसत होती. (गंगा त्या मुलीस घेऊन आल्यावर )—

**दुसरी मुलगी**—कायग सुंदरे, आतांशीं तुला झालें तरी काय? अग जेव्हां पहावी तेव्हां तूं आपल्याशींच कांहीं विचार करीत असतेस; नेहमीं वेड्यासारखी, कोणी कांहीं विचारिलें असतां, झोंपेंतून जागी झाल्याप्रमाणें उच-कून त्यास भलतेंच उत्तर देतेस. अशी तुला मोहनी तरी कोणी घातली?

**पहिली मु०**—(दुसरीस नेत्रसंकेत करून व किंचित् हांसून ) अग मोहनी कसली ह्मणून काय पुसतेस? हिच्या हल्लींच्या एकंदर स्थितीवरून तुला नाहीं का समजत? मोहनी एक—( असें अर्धेच बोलून जीभ चावते.)

**तिसरी मु०**—( हिचें नांव सगुणा असें होतें ) सुंदरा-बाई! तूं आह्मांला खेळायला बोलावितेस; आणि पहिल्या-प्रमाणें आतांशीं धडपणीं बोलत देखील नाहींस मग आह्मीं तुझ्याकडे कशालाग यावें?

**गंगा**—सगुणे! अग ठीकच आहे. ही आतां आम-च्याशीं कसली बोलते, ही बाई आतां राजाची राणी होणार हो, तुह्मांला कळलें का?

हें ऐकतांच सुंदरी आपल्या मनांतील गुप्त हेतु यांनीं सर्व जाणले असें पाहून एकदम लाजून खालीं मान घालू-न उगीच उभी राहून कांहीं उत्तर देणार इतक्यांत—

**सगुणा**— सुंदरे! एकूण तूं दैवशाली खरीच. बाबासाहेब तुला वर योग्य आहेत. मी बाई त्यांस, त्या दिवशीं राजे-साहेबांबरोबर शाळेंत आलेले पाहिले. त्यावेळीं त्यांनीं जो इंग्रजी ( फासन कीं काय आपले मास्तर ह्मणतात तें, मला

बाई त्याचें नांवही पुरें ह्मणतां येत नाहीं. ) पोशाग केला होता. सखे सुंदरे! त्यावेळीं तूं लाजून ह्मण अगर कसेंही ह्मण तें तुझें तुला ठाऊक; तूं अमळ कावरीबावरी होऊन खालीं पाहत होतीस त्यामुळें ते तुला चांगले पाहण्यास मिळाले नसतील.

गंगा— बाबासाहेब स्वरूपाप्रमाणें गुणांनींही आमच्या सुंदरीस योग्य आहेत.

सगुणा— ईश्वर करो आणि आमच्या सखीचे हेतु पूर्ण होवोत.

सुंदरी मध्येंच कांहीं बोलणार होती पण जेव्हां कां सर्व मुलींनीं एकदम तिजवर शब्दवृष्टीचा कहर केला तेव्हां ती मनांत फार लाजली, व मध्यंतरींच उठून जाण्याविषयीं तिणें प्रयत्नही केला, पण सोडतो कोण? दोघींनीं तिचे दोन्ही हात गच्च धरून तिला उभी केली असल्यामुळें निमूटपणें सर्व सोसून स्वस्थ राहणें तिला भाग पडलें. तिला त्यांस उत्तर काय द्यावें हें सुचेना. ती लाजून अगदीं ओशाळी झाली होती. परंतु ती सुशिक्षित व शहाणी होती यामुळें तें सर्व आंवरून त्यांपैकीं एकीस ह्मणते:—

सुंदरी— ( अमळ रागावलेंसें करून ) सगुणे, तूं फार शहाणी आहेस. बोलावें काय आणि न बोलावें काय हें तुला कांहीं समजतें का? मनास वाटेल तसें बडबडतेस. कोणी ऐकिलें ह्मणजे काय बरें ह्मणेल?

गंगु— सुंदराबाई, अशी रागावूं नको. आह्मीं काय बरें केलें? आह्मीं काय खोटें ह्मटलें? तुझ्या मैत्रिणी आम्हीं, नेहमीं जवळ असणाऱ्या; आह्मीं जर तुझें मन जाणलें नाहीं, तर मग आम्हीं मैत्रिणी कसल्या? तूं आपल्याकडून मात्र

गुप्त ठेविण्यास झटतेस पण तें सर्व व्यर्थ आहे बरें!

सुंदरी— बरें बायांनो. तुह्मी थट्टाच करण्याचें मनांत आणिलें आहे. तुह्मीं चतुर असून एकमिलाफी पडलां. मग तुह्मांपुढें माझें काय चालणार? ह्मण आहे ती खरी: "मारत्याचा हात धरवेल, पण बोलत्याचें तोंड धरवणार नाहीं."

सगुणा— अग होय खरेंच तें. तूं उद्यां राणी झाल्यावर का आम्ही तुझी थट्टा करणार आहोंत? बरंग बाई थट्टेवरच घालविलेंस ह्मणून बरें झालें. मला तर कुठें बोललेंसें झालें.

सुंदरी— छि: वेडे! तुझ्या बोलण्यानें मला राग कधीं येईल का? तुझा वियोग मला क्षणभर झाला कीं तो किती दु:सह होतो हें तुला ठाऊक आहेच.

यमुना—होय सुंदराबाई खरी गोष्ट. पण ही आजपर्यंतची कथा; आणि यापुढें वर्षानुवर्षें जरी वियोग झाला तरी आह्मांला भेटण्याची आठवण स्वप्नीं तरी होईल का?

सुंदरी—असें काय बरें उगीच भलभलतें बोलतेस. यमुना, आज काय तुह्मीं सर्वांनीं मला चिडविण्याचा निश्चय केला आहे काय? मग तर खुशाल बोला.

सगुणा—सुंदराबाई असें बरें काय? यमनी काय खोटें बोलली? उगाच विकत राग कशाला आणितेस. मेलें मनीं असतें तेंच कपाळीं येतें. माग तुझी आह्मीं नेहमीं थट्टा करूं पण अशी रागावलेली तुझी मुद्रा आह्मीं कधींच पाहिली नव्हती; आणि आतांशी (तोंडावरून हात फिरवून) माझे सखीची स्थिति अशी कां झाली कळत नाहीं. गडे, खरेंच सांग, तुला आतां अगदीं खराच राग आला होता ना?

सुंदरी—(किंचित् हांसून) राग कसला येतो. पण बाई, निःकारण कांहीं तरी एखाद्यास टोंचून बोलणँ हें मात्र मला अगदीं आवडत नाहीं. आणि तूं काय ह्मणतेस तें माझ्या ध्यानीं मनीं देखील नाहीं.

गंगू—तें असो, पण आह्मीं आपलीं घरँ सोडून तुज-करितां येतों; आणि तूं आपल्याच नादांत असतेस एवढें तरी खरें ना! मग आह्मीं कशालाग यावें?

सुंदरी—हें काय बरँ गंगूताई! कधीं बरँ मी तुम-च्याशीं खेळायला आलें नाहीं? मी सहज घरांत गेलें होतें ती आतांच नाहीं का तूं न मी आलों. तुह्मीं खेळायला न याल तर मला कसँ बरँ करमेल? मी ह्मटलँ चार वाजून चुकले, आतां तुमची घरीं जाण्याची वेळ झाली. तेव्हां तुह्मीं निघालां असाल जायाला; ह्मणून मीही आपलें पु-स्तक घेऊन माडीवर वाचायला निघालें होतें.

गंगा—(किंचित् हंसून) सुंदराबाई, आज माडीवर वाचीत बसण्याचँ कारण राहिलँ नाहीं बरँ. आतां इथँच बसा परती. ही पहा कशीं चांगलीं चांगलीं गाणीं ह्मणते. मी बाहेर पडायला; व ही दारांत यायला एकच गांठ पडली. मी पुढें जाणार तों (सुंदरीकडे पाहून) बा-बासाहेब आपले गुरूजींबराबर घोड्यावरून येत होते. ह्म [illegible]न ते जात तोंपर्यंत तेथेंच दारांत उभी राहिलें तों हिणें एक उत्तम दिंडी ह्मटली ती ऐकून हिला मी येथें आणिली. आतां ऐकशील ती कशीं चांगलीं गाणीं ह्मणते ती. (भिकारणीकडे वळून) या बिचारीस मात्र आमच्या दंग्यांत फार वेळ बसावँ लागलँ. अगए! काय तुझँ नांव? ह्मण बरँ चांगलसँ गाणँ. ह्या आमच्या सुंदराबाई ऐकताहेत.

गंगूनें सुंदरीचा एक हात आपल्या हातांत घेतला, व दुसरा सगुणीनें धरिला अशा रीतीनें त्या तेथील एका कोंचावर बसल्या; व दुसऱ्या मुली जवळच्या दुसऱ्या कोंचावर बसल्या.

भिकारीण गाणें आठवूं लागली. ती मोठी चतुर होती, असें वाटतें. कारण गाणें आठवितेवेळीं खालीं न पाहतां किंवा, विणा नीट लागला न लागला हें न पाहतां ती सुंदरी बसली होती तिकडे पाहूं लागली. सुंदरी त्यावेळीं कांहीं चमत्कारिक दिसत होती; गंगा तिच्या कानांत कांहीं फुसफुस करीत होती तेणेंकरून सुंदरी लाजे व डोळे पाण्यानें भरी; व वरचेवर हात सोडून घरांत जाण्यास पाही. तें पाहून त्या भिकारणीस लागलेंच एक चमत्कारिक गाणें आठवलें.

**भिकारीण–हीं वस्त्रें भूषणें ल्यावींत सखये, सुमनांनीं**
**वेणी भरी ग। सखे तूझें स्वयंवर या मासीं**
**राजा करी ग ॥ १ ॥**

हें कडवें ऐकतांच गंगा व सगुणा एकमेकींकडे पाहून आपल्यांत हांसूं लागल्या; आणि त्या गाणारणीस ह्मणतात, "शाबास शाबास" चालूं दे पुढें. गाणें फारच मौजेचें आहे नाहीं बरँ सुंदराबाई?

सुंदरी कांहींच बोलली नाहीं. ती फार लाजली होती. "हें कसलँग गाणँ गंगू?" असें हळूच मान वर न करितां तिरळ्याच अश्रुभरित डोळ्यांनीं ह्मणाली.

गंगा गडे सुंदरे, पण तूं कां इतकी लाजतेस, (तिचे हनुवटीस हात लावून डोकें वर करूं पाहते) अग हें काय? डोळ्यांत पाणी कशाकरितां? अग हें गाणँ

दमयंतीवरचँ बरँ. ( भिकारणीस ) अग ए काय तुझँ नांव, तुझँ आपलँ पुढँ चालूं दे.

भिकारीण–ही पुष्पशय्या कोमल रचली, शय्या करी
पलंगावरी ग ॥ सखे तूझें० ॥ २ ॥

सर्व मुली–( एकदम ) शाबास शाबास !! सुंदराबाई ऐकलेंत ना ?

भिकारीण–तांबूल भक्षुनि परिमळ घ्यावें, अंजन नयना
भरीग ॥ सखे तूझें०॥ ३ ॥

गंगा–सुंदराबाई, आतांशा तुह्मीं विडा खाण्याचा कां टाकला बरँ ? अहो या पंधरा दिवसांपूर्वी तुह्मीं अगदीं अल्लडपणें वागत होतां; आणि इतक्यांत हो तुह्मीं पोक्तपणा कोठला शिकलां, पण असो, ऐका ती काय ह्मणते.

भिकारीण–ही राजपुत्री होईल सुभगा, " सुंदराबाई "
वीरावरीग ॥ सखे तूझें स्वयंवर०॥ ४ ॥

आमच्या वाचकांस असें कळविलें पाहिजे कीं भिकारणीनें जें गाणें ह्मटलें तें दमयंतीवरचें असून नेहमीं बायकांचे ह्मणण्यांतलें आहे. मात्र त्यांत शेवटीं " दमयंती नळा " या ठिकाणीं भिकारणीनें आपल्या चतुराईनें थोडा फरक केला ह्मणून.–

हें शेवटचें कडवें ऐकतांच एकदम सर्व मुली " खो खो खो " हांसूं लागल्या. सुंदरीची जी अवस्था झाली ती लिहितां येत नाहीं सर्व मुली तिजकडे पाहून हांसूं लागल्यामुळें ती चिडली, व हात हिसकावून घरांत निघून गेली.

## भाग १२.

ओटीवरचा गोंगाट ऐकून तेथें काय चाललें आहे तें पहाण्यासाठीं सुंदरीची आई व दुसऱ्या दोन तीन बायका घरांतून बाहेर येतात. मग सुंदरीची आई गंगूस ह्मणते, " गंगू, काय गोंगाट आहेग हा ? "

मग भिकारणीकडेस पाहून, " ही कोणग ?" मग लागलेंच भिकारणीस ह्मणते, " कोठचीग तूं ? "

भिका०–( दुःखाचा सुसकारा टाकून ) बाईसाहेब, काय सांगूं कोठली ती ? आह्मां भिकाऱ्यांना गांव कसला ? पोट भरेल तेथें आह्मीं राहणाऱ्या.

सुं० आई–अग पण तूं कांहीं जन्मापासून भीक मागणारी दिसत नाहींस.

भि०–बाईसाहेब ! सर्व काय जन्मापासूनच भीक मागणाऱ्या असतात ?

सुं०आ०–मी तसें ह्मणत नाहीं. मी ह्मटलें, तुझी ही गरीबपणाची स्थिति अलिकडची असावी. पहा तुझी भाषा कशी शुद्ध आहे. बोलणें चालणें किती मर्यादशीळ आहे ? तूं कांहीं ह्मण. पण हें सर्व पाहून मी खात्रीनें ह्मणतें कीं तूं खचित पूर्वी कोणा चांगल्या घराण्यांतील असावीस. खरेंच सांग, तूं कोठली, कोणाची कोण ?

भि०–बाईसाहेब, आपण फार चतुर आहां. थोरांच्या स्त्रिया अशाच असतात. आपण ह्मटलें तें खरें. तुमच्या दयेनें मीं पूर्वी चांगली होतें; परंतु आतां ईश्वरास मला या स्थितींत ठेवणें योग्य वाटलें आहे.

सुं० आ०—पण मी विचारलें तें सांगत नाहींस. तूं कोठली, कोणाची कोण?

भि०—बाईसाहेब! तें काय सांगूं? सांगण्यास मला लाज वाटते. आपल्यासारिख्या थोरांस आह्मां गरिबांच्या गोष्टी ऐकून काय आनंद होणार आहे? आमची कथा सांगणें ह्मटलें ह्मणजे दुःख व विपत्ति यांची तसबीर आपल्यापुढें ठेवणें आहे. दुसरें कांहीं नाहीं.

सुं० आ०—अग तूं बोलण्यांत फार चतुर दिसतेस. खचित तूं कोणी थोर घराण्यांत वागलेली आहेस यांत अगदीं संशय नाहीं. खरेंच सांग तूं कोठली?

भि०—बाईसाहेब मी साताराची.

सुं० आ०—अग खरेंच कीं काय? अशी जवळ ये बैस. अग आह्मीं सुद्धां साताराच्याच. सातान्याचें नांव घेतलें कीं मागील सर्व आठवून माझे डोळ्यांला पाणी येतें.

(सुंदरीच्या आईचे डोळे थोडे पाण्यानें भरतात. ते ती आपल्या पदरानें पुसते).

भि०—बाईसाहेब, आपण हल्लीं अशा सुखांत असतांही साताराची आठवण झाली तर आपल्या डोळ्यांस पाणी येतें. मग मी या स्थितींत पडलेली, माझा जीव, बाईसाहेब—

(त्या ठिकाणीं भिकारणीचा कंठ दाटून येतो.)

सुंद० आ०—(भिकारणीनें अपुरतें ठेवलेलें वाक्य पुरें करिते) खरेंच काय बरें बोलत असेल. सातान्यांत तूं कोणापाशीं होतीस?

भि०—(उसासा टाकून) दिनकरराव शिरके यांचे वाड्यांत बाईसाहेबांपाशीं होतें.

मुं० आ०—अग ह्मणतेस काय? मग अशीग कां? पण अगोदर गडे तुझें नांव सांग काय तें?

भि०—माझें नांव गजाऊ. काय सांगूं बाईसाहेब! ह्मणतात न 'दहा मरावेत पण दहांची पालनवाली मरूं नये.'

मुं० आ० कां, तुझ्या बाईसाहेब वारल्या वाटतें? मला तिकडची फार वर्षांची माहिती नाहीं. आह्मांस येथें येऊन बरींच वर्षें झालीं. सातारा शहर तर त्यापूर्वींच सुटलें होतें. ते सर्व उपकार बाई त्या पुणेकर ....चे व सातारच्या त्या ........चे. त्या बापड्यांनीं इंग्रजांस काय कळविलें असेल तें एका परमेश्वरास माहीत. आमच्या महाराजांस त्यांणीं भरल्या लक्ष्मींतून ओढून नेलें. महाराज गेल्यावर मागें सर्व दुर्दशाच झाली. नातू ह्मणतील ती पूर्वदिशा असें होऊन गेलें. आमचे गांव जप्त झाले व आह्मांस सातारा शहर सोडावें लागलें.

भि० बाईसाहेब! तुह्मांस सातारा शहर सुटलें एवढेंच झालें. आमच्या वाड्यांतील तर सर्व देशोधडीस गेले. दिनकरराव साहेबांस महाराजांबराबरच काशीस नेलें. त्यांचे जांवई—

मुं० आ०—हंबीरराव मोहिते. त्यांवर तर इंग्रजांचा सर्व डोळा. त्यांणीं ठरविलें कीं, महाराजांनीं जो बंडाचा घाट घातला तो सर्व एकट्या मोहित्याच्या मसलतीनें घातला. हंबीरराव तरुण, शूर, व हुशार असून महाराजांचे आप्त व महाराजांच्या कृपेंत असल्यामुळें दुष्ट चाहाडखोरांनीं इंग्रजांस जें सांगितलें तें त्यांस सर्व खरें वाटलें.

भि०—ह्मणून त्यांणीं महाराजांबरोबर हंबीररावासही कैद करून काशी दाखविली. हर! हर! तसा प्रसंग सात

जन्मींच्या वैऱ्यावरही येऊं नये! ज्या दिवशीं त्यांस सातान्यांतून नेलें त्या दिवशींचा आकांत काय सांगूं? आमच्या बाईसाहेब तर मृतप्राय पडल्या होत्या. सर्वच आकाश कोसळलें! त्यांणीं दुःख कोणाकरितां ह्मणून करावें! यजमान साहेबांकरितां? कीं जांवयाकरितां, कीं लेंकीकरितां? दुर्गाबाईसाहेब त्यावेळीं आमच्या वाड्यांत होत्या. त्यांस डोहळे लागल्यामुळें त्या थोड्या बेजार होत्या ह्मणून त्या माहेरीं राहण्यास आल्या होत्या."

सुं० आ०-दुर्गाबाई गरोदर होत्या कीं काय? अरे भगवान! मग?

भि०—चार महिने पुरे झाले नव्हते. डोहळेजेवणाचा तो समारंभ काय सांगूं? आमच्या बाईसाहेबांस दुर्गाबाई कायती तेवढी मुलगी. मग त्या आईच्या कौतुकास काय पारावार असणार आहे? तशांत श्रीमंती. तें सर्व मनांत आलें ह्मणजे बाईसाहेब गळा भरून येतो ह्मणून कांहीं सांगत नाहीं. दिनकरराव व हंबीरराव गेल्यानंतर दोन्ही वाडे जप्त झाले. गांव जप्त झाले. नेमणुका बंद झाल्या. मग आमच्या बाईसाहेब दुर्गाबाईस घेऊन सातान्या जवळच—गांवीं राहण्यास गेल्या. मीं, व दुर्गाबाईची लहानपणींची दाई सईबाई, व दोन चाकर येवढीं कायतीं माणसें त्यांजपाशीं राहिलों. माझा बाप हंबीररावसाहेबांच्या बापापासून मोहित्यांचे पदरीं होता त्याणें हंबीररावसाहेबांस तर आपल्या मांडीवर खेळवलें होतें ह्मणून त्यास अत्यंत दुःख झालें. तो हंबीररावसाहेबांच्या मागोमाग निघून गेला. तो पुष्कळ वर्षं वेड्यासारिखा इकडेतिकडे भटकत होता.

मुं० आ०— तो आतां कोठें आहे ?

भिका०— दोन वेळां त्याणें काशीस जाऊन आपल्या यजमानाचा समाचार आणिला. पुढें दादासाहेब भोंसले यांच्या येथें कांहीं दिवस राहिला होता. आज दोन वर्षांत मला त्याची खबर नाहीं. माझी आई तर पूर्वीच मेली होती. माझे घरकरी दिनकररावाबरोबर काशीस गेले ते तिकडेसच आटपले ! अशी सर्व दुर्दशा झाली !

मुं० आ०—पण तुझ्या यजमाननीचें काय झालें ?

भि०—तेंच सांगतें— गांव जप्त झाले. नेमणुका बंद झाल्या. तरी त्यांजपाशीं डागडागिने पुष्कळ होते. खर्चाची अडचण नव्हती. ह्मणून यजमानाची व जांवयाची सुटका व्हावी ह्मणून त्यांस जें जें कोणीं सांगितलें तें तें करण्यास त्या कधीं मागें सरल्या नाहींत. अनुष्ठानें ह्मणूं नका— जप ह्मणूं नका— देवऋषी ह्मणूं नका— कांहीं करायाचें ठेविलें नाहीं. पाण्यासारिखा पैसा खर्च केला. दहा हजारांचा कंठा दोन हजारांस विकायाचा. असा क्रम एकसारिखा चालला होता. श्रीमंतांची विपत्ति झटली ह्मणजे लबाड लोकांची चंगाळी होते. दरबार करणारे तरी किती लोक आले होते ह्मणून सांगूं ! कोणी ह्मणावें, रेसिडेंट साहेब पांच हजार रुपये मागतात. कोणी ह्मणावें, गव्हरनर साहेब पन्नास हजार रुपये मागतात. तितके आमच्या बाईसाहेबांनीं द्यावे.

मुं० आ०— न देईल तर काय करील बापडी. संकट येऊन पडलें ह्मणजे खरेंच सागतें, कांहीं सुचेनासें होऊन जातें. मोठ्या पुरुषाची सुद्धां बुद्धि ठिकाणीं रहात नाहीं. मग ती तर केवळ बायको.

भि०--पण असें करण्यानें झालें काय नाहीं कळलें ? नवळचे सर्व पैसे सरले. सर्व डागिने गेले. ह्मणून कर्ज काढावें लागलें. तेथून मग सर्व विपत्तीच सुरू झाली.

सुं०आई०— हर हर! देवा! केवढा दारुण प्रसंग हा!

भि०— तो कांहीं विचारूं नका. दुर्गाबाईसाहेब नऊ महिने भरतांच बाळंत झाल्या. दुःखांत सुख एवढेंच कीं मुलगा झाला. मुलगा केवळ बापाची प्रतिमा होती. बारावे दिवशीं बारसें केलें नाहीं. आजी ह्मणाल्या, एकविसावे दिवशीं करायाचें. एकविसावे दिवशीं दुर्गाबाईसाहेब कांहीं केल्यानें बारसें करूं देईनांत. त्या ह्मणूं लागल्या कीं, काशीकडील कांहीं खबर समजल्याविना नांव ठेवायाचें नाहीं. पुढें माझा बाप काशीकडील खबर घेऊन आला.

सुं० आई— मग पुढें कधीं बारसें केलें ?

भिकारीण— कशाचें बारसें न कशाचें काय? ईश्वरच कोपला तेथें कोणतें ह्मणून सुरळीत व्हावयाचें आहे? माझ्या बापानें काशीस जाऊन तिकडचा समाचार आणिला. परंतु हंबीररावाचा वाटेतें दुर्गाबाईस गुप्त निरोप आला कीं मुलगा झाला तर मला कळविल्याविना नांव ठेवूं नका. तशांत दुर्गाबाई नवऱ्याच्या शोकानें अगदीं क्षीण होत चालल्या. त्यांना जरा थोडा आनंद झालाच तर मुलाकडे पाहून मात्र होत असे; मग पुनः माझ्या बापास त्यांनीं काशीस पाठविण्याचा बेत केला. तेव्हां मला वाटलें— पण बाईसाहेब, सांगायाला लाज वाटते.

सुं० आई— अग लाज कशास पाहिजे! ममता तेथून सर्वांची सारखीच असते. थोरांत ममता असते आणि गरी-

बीत नसते असें आहे कीं काय! वाटतें तुझे मनांत बापा-
बरोबर जावेंसें आलें?

नि०—होय बाईसाहेब, पण खरेंच सांगतें तुम्ही कांहीं
ह्मणा, मला वाटतें, आह्मी गरिबें जशी ममता करितों तशी
तुह्मी थोर लोक करीत नाहीं. मी बापाबरोबर जायला
निघालें असें पाहून बाईसाहेबांस आणि दुर्गाबाईसाहेबांस
फार आश्चर्य वाटलें. त्या मला ह्मणूं लागल्या, अग तूं
बायको मनुष्य, चाललीस कोठें! काशी काय जवळ लाग-
ली आहे? मी कांहीं उत्तर केलें नाहीं. मनांत ह्मटलें ममता
ह्मणतात ती मग यांचीं अशीं कशींहो मनें! सातांसमुद्रां पलि-
कडे माझें घरकरा असते तरी मी त्यांच्या भेटीला जा-
ण्यास कधीं माघार घेतली नसती. खरेंच सांगतें बाईसाहेब!
परस्वाधीन होऊन ते जर इतके लांब गेले तर मी मोकळी
होतें, मला जाण्यास कसली अडचण होती! माझ्या बाईसाहेब
मला जिवाची भीति घालूं लागल्या. मी ह्मटलें, माझा एक
जीव तर काय, पण मला शंभर जीव असले आणि तितके-
ही जरी एका भेटीकरितां खर्चावे लागले तरी खर्च करीन.

सुं० आ०—धन्य तुझी!

नि०—माझा निश्चय पाहून माझ्या बाईसाहेबांनीं मला
बापाबरोबर जाण्याची परवानगी दिली. आणि मी निघा-
लें. निघाल्या दिवसापासून काशीस जाऊन पोंहोंचेपर्यंत
हृदयांत कायती एक मूर्ती उभी होती. आणि त्या मूर्ती-
कडेस माझें मन लागलें होतें. बाईसाहेब, ते जिवंत होते
तेथपर्यंत मला दुसऱ्या कोणत्या देवाची ओळख नव्हती.
दुसरा कोणताही देव मी पूजिला नव्हता. काशीस जाण्या-
स किती दिवस लागले, वाटेंत हाल कसे झाले हें मला

कांहीं समजलें नाहीं. काशीस गेल्यावर भेटण्यास जाण्याची परवानगी मिळण्यास पंधरा दिवस लागले. ते पंधरा दिवस कसे लोटले असतील तें एका परमेश्वरास माहीत. पंधरा दिवस लोटले. ज्या ठिकाणीं सातारकर ठेविले होते तेथें गेलें—बाप बरावर होता. हंबीरराव भेटले. परंतु मी फुटक्या नशीबाची पडलें. माझा हेतु कसचा तडीस जाणार! आम्ही काशीस जाऊन पोंहचलों त्याच दिवशीं वाटतें दुखणें आलें. दुखणें फार नव्हतें, थोडा ताप होता. तोच पुढें नवज्वरावर गेला आणि त्यांतच माझ्या सर्व आशेची अखेर झाली! जिवास अत्यंत दुःख झालें. माघारें घरीं जावेंसें वाटेना. ह्मणून मी बापास माघारें जाण्यास सांगून तीर्थांच्या जागा हिंडत हिंडत सुमारें साहा महिन्यांनीं गांवीं येऊन पहातें तों, अरे भगवान! सर्व वाताहात झालेली दृष्टीस पडली. दुर्गाबाईसाहेब क्षीण झाल्याच होत्या त्या आह्मीं काशीस जाण्यास निघाल्या नंतर सुमारें महिन्यानें वारल्या. पुढें पंधरा दिवसांनीं माझ्या बाईसाहेबही एकाएकीं वारल्या. मग सईबाई दुर्गाबाईचा मुलगा घेऊन कोठें गेली त्याचा आजपर्यंत ठिकाण नाहीं. पुष्कळ तपास केला. मी पंढरपुरची वारकरीण झालें. आणि देवाचें नांव घेत आजपर्यंत आयुष्याचे दिवस लोटले. बाप नागपुराकडेस आहे असें ऐकिलें आहे.

सुं० आ०—(डोळे पाण्यानें भरून) सर्वच विपत्ति. एथें येऊन किती दिवस झाले?

भि०—आठ दिवस झाले. साहेबाचे— जमादार आहेत त्यांणीं आपल्या पडवींत रहा ह्मणून सांगितल्यावरून तेथें राहिलें आहें. त्यांना अभंग, देवाचीं गाणीं वगैरे

ऐकण्याची फार गोडी आहे. दोन दिवसांनीं जाईन ह्मणते.

इतकें बोलणें झालें तों सेनापति साहेब घरीं आले. तेव्हां सुंदरीच्या आईनें भिकारणीस कांहीं देऊन जाण्याची परवानगी दिली व आपण घरांत उठून गेली.

## भाग १३.

पोलिटिकल एजंट साहेबानें रणधीरराव महाराजांस सांगितल्याप्रमाणें दत्तक प्रकरणीं मुंबई सरकारांत लिहून कळविलें. त्यांत त्याणें महाराजांचे पूर्वजांसीं गादी निरंतर वंशपरंपरा चालावी असा तह झाला आहे, व महाराजांची इंग्रज सरकाराशीं एकनिष्ठपणाची वर्तणूक आहे; व महाराजांनीं उत्तम प्रकारें राज्यव्यवस्था ठेऊन प्रजा संतुष्ट ठेविली आहे; यासाठीं महाराजांस दत्तक घेण्याची सरकारानें परवानगी देणें योग्य आहे, असें कळविलें. मुंबई सरकारांत या प्रकरणाचा विचार रणधीररावास अनुकूळ असा झाला. त्यावेळीं मुंबईस सर—हे गवरनर होते. त्यांनीं रणधीररावांचे आजे संताजीराव यांशीं कंपनी सरकारानें केलेल्या तहनाम्यांतील कलम वाचून लागलेंच कलकत्याच्या गव्हरनर जनरल यांजकडे समशेरबाहद्दर यांस दत्तक घेण्याची परवानगी देण्याविषयीं शिफारस केली.

त्यावेळीं कलकत्त्यास गव्हरनर जनरल लार्ड डालहौसी हे होते. त्या डालहौसी साहेबांच्या कारकीर्दीची आमच्या वाचकांस संपूर्ण माहिती असेल तर त्यांस या दत्तक प्रकरणाचा निकाल कसा व्हावा त्याचें अनुमान लागलेंच करवेल. लार्ड डालहौसीची कारकीर्द हिंदुस्थानच्या सर्व इतिहासांत फारच महत्वाची आहे. याचे कारकीर्दीत बाहेरच्या शत्रूंशी लढाया होऊन कंपनी सरकारचें राज्य वाढलें; इतकेंच नाहीं, तर ज्यांपासून या आपल्या प्रिय देशाचा उत्कर्ष होण्यास प्रारंभ झाला; त्या सर्व गोष्टींचा पाया याच्याच कारकीर्दीत मुख्यत्वेंकरून पडला असें म्हटलें तरी चालेल.

लार्ड डालहौसी हे हार्डिंग यांच्या मागें सन १८४८ सालीं हिंदुस्थानांत गव्हरनर जनरल होऊन आले. हे हिंदुस्थानाचा कारभार आठ वर्षें करून ह्या देशांत आपलें नांव वाईट गोष्टीनें ह्मणा-अगर चांगल्या गोष्टीनें ह्मणा-आह्मांला तर वाटतें दोन्ही गोष्टींनीं-चिरकाळ ठेवून सन १८५६ सालीं मार्च महिन्यांत परत स्वदेशीं निघून गेले. या आठ वर्षांत लार्ड डालहौसीचें सर्व वर्तन, वाचकांस कदाचित् खोटें वाटेल- एकाच विचारास अनुसरून होतें असें इतिहासकार ह्मणतात. तो विचार हा-आपली प्रजा सुखी कशी होईल? आणि आह्मांस वाटतें हें बरेंच खरें असावें कारण हिंदुस्थानचें सुख व भरभराटी हाच इंग्लंड देशाचा उत्कर्ष असें ते समजत होते. पण ही भरभराटी आणण्यासाठीं लार्ड साहेबांनीं जे उपाय योजिले, ते सर्व योग्य होते असें कोण ह्मणेल?

लार्ड साहेबांचें मत असें होतें कीं, हिंदुस्थान सुखी होण्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं इंग्लंडचें राज्य, इंग्लंडचे कायदे, इंग्लंडच्या रीतिभाती, इंग्लंदांतील विद्या व कलाकौशल्य, इंग्लंडाची सुधारणा ह्या सर्व गोष्टी असल्या पाहिजेत; आणि ह्या सर्व गोष्टी होण्यास जे जे उपाय अवश्य होते, ते ते सर्व त्यांनीं अगदीं मनापासून केले यांत संशय नाहीं.

लार्ड डालहौसी हे हिंदुस्थानांत गव्हरनर जनरलच्या कामावर येऊन हजर झाल्यानंतर दुसऱ्या वर्षीं ह्मणजे सन १८४९ सालीं इंग्रजांचें शीक लोकांशीं दुसरें व शेवटचें युद्ध सुरू झालें. हें युद्ध जुंपण्याचें कारण, व त्या सतलज नदीच्या कांठीं रामनगर व चिलियनवाला या

दोन ठिकाणीं झालेल्या त्या भयंकर लढाया यांची सर्व हकीकत हिंदुस्थानचा इतिहास जाणणारांस माहीत असेलच. शीक लोकांचे फौजेनें मोठ्या निकरानें व शौर्यानें युद्ध केलें, त्यांत इंग्रजांच्या फौजेचा पुष्कळ नाश करून आपण शूरांचे बच्चे आहांत असें इंग्रजांस पूर्णपणें दाखविलें. परंतु अखेरीस नेहमींप्रमाणें, इंग्रजांचें युद्धकौशल्य व शौर्य विशेष असल्यामुळें, त्यांचाच जय झाला. युद्ध सुरू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आंतच (मार्च सन १८४९ इसवी) पंजाबप्रांत हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा एक भाग होऊन राहिला; आणि तेथल्या सिंहाचा बच्चा– रणजितसिंगाचा मुलगा धुलिपसिंग– आपल्या वाडवडिलांचा धर्म व वाडवडिलांचा देश सोडून इंग्लंडांतील एक मोठा जमीनदार व रहिवासी सरदार होऊन बसला.

या प्रकारें लार्ड डालहौसीच्या कारकीर्दींत वायव्येकडील इंग्लिश राज्याची सीमा वाढली. इतकेंच नाहीं तर, ईशान्येसही नवीन मुलूख इंग्लिशांस मिळाला. ज्या सालीं पंजाब प्रांत जिंकून घेतला, त्याच सालीं ब्रह्मी लोकांशीं दुसरें युद्ध होऊन त्यांचा पेगू हा प्रांत इंग्लिशांस मिळाला.

आमच्या वाचकांस माहीत असेलच कीं, ब्रह्मदेशाच्या मार्गानें कधींही कोणी परशत्रु हिंदुस्थानावर आलेला नाहीं. नेहमीं आपले शत्रु वायव्य दिशेकडून आले. आपण आर्यलोकांनीं सुद्धां हिंदुकुश पर्वताच्या पलीकडून मध्य एशियांतून एथें येऊन, व एतद्देशीय लोकांस जिंकून या देशीं वस्ती केली; आणि या हिंदुस्थान देशास आर्यभूमी हें नांव दिलें. शिकंदर बादशहा (म्यासिडोनियाचा आलेक्-

झांडर धि ग्रेट ) ही याच मार्गानें येऊन पोरस राजाबरा-बर लढला. मुसलमानांनींही याच मार्गानें हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. तेव्हां आपणावर शत्रु कदाचित् आलाच तर याच मार्गानें येणार, असें इंग्लिशांस वाटूं लागलें. सर्व एशियाखंडांत इंग्लिशांस पुरा पडणारा शत्रु कोणी नव्हता हें तर खरेंच, परंतु आलीकडेस त्यांना पुरा पडणारा असा नवीन शत्रु या खंडांत निर्माण झाला. रशिया हा देश चमत्कारिक आहे. तो अर्धा युरोपांतील; अर्धा एशियांतील असा आहे. त्या देशच्या राजाचें लक्ष्य फार दिवसांपासून एशिया खंडांत आपल्या राज्याचा पसारा व्हावा इकडेस लागलें होतें. या रशियन लोकांचीच फक्त इंग्रजांस कायती भीति होती. हे लोक हिंदुस्थानावर आलेच तर अफगाणिस्थानांतून बोलन व खैबरपास यांमधून येणार. दुसरा त्यांस येण्यास मार्गच नाहीं. ह्मणून ज्या वेळीं शीक लोक जिंकले जाऊन सर्व पंजाब प्रांत हस्तगत झाला व पेशावर ही इंग्लिशराज्याची सरहद्द झाली त्यावेळीं त्यांची बाहेरच्या हद्दीच्या संबंधानें बरीच तृप्ति झाली. त्यांस असें वाटलें कीं, आपल्या भयंकर शत्रूपासून आतां आपणास काडीमात्र सुद्धां भीति नाहीं. कारण हिंदुस्थानावर येण्यास रशियन लोकांस प्रथम आफगाणी लोकांना आपलेसे केले पाहिजेत. मग बोलनपासमधून त्यांस वर यावें लागणार—मुसलमान व रशियन लोकांचें तर जन्मापासुन हाडवैर आहे— तेव्हां मध्यंतरीं काबूलचें राज्य आपल्या व रशियनांच्या आड आहे; हें एक बरेंच झालें आहे. बोलनपासावर बंदोबस्त केला तर, त्यामधून रशियनांसारख्या प्रबळ शत्रूसही येणें अशक्य आहे.

रशियन लोकांची भीति समूळ नाहींशी करण्यास इंग्रजसरकारास आणखी एक युक्ति सुचली. हिंदुस्थानाचा नकाशा हातांत घेऊन लार्ड डालहौसी पाहूं लागले, तों सभोंवारचे सीमेची तांबडी रेघ ढळढळीतपणें पेशावरापासून खालीं पश्चिम किनाऱ्यावरून थेट रामेश्वरापर्यंत; व तेथून कारोमांडलचे किनाऱ्यानें ब्रह्मराज्यांतील पेगू प्रांतापर्यंत लागून गेलेली पाहून त्यांस संतोष झाला. तरी या सीमेंतील सर्व विस्तीर्ण प्रदेशांत जिकडे तिकडे एकच तांबडा रंग नव्हता. लहान लहान ठिकाणीं कोठें हिरवा, कोठें पिंवळा, कोठें निळा असे निरनिराळे रंग त्यांनीं पाहिले. तांबड्या रंगाच्या व्यतिरिक्त अन्य रंगानें मंडित जे प्रांत ते जुलूम व राज्यसंबंधी अव्यवस्था यांचें माहेरघरच आहेत, असें डालहौसी साहेबांना वाटत असे.

हीं निराळ्या रंगांचीं एतद्देशीय राज्यें आपल्या राज्यांत राहूं दिलीं, तर समयवशात् तीं आपल्या नुकसानीस कारण होतील.—परशत्रूस हीं राज्यें प्रसंगीं फितविण्यास सांपडतील; आणि आपण बाहेर शत्रूशीं लढत असतां, या राज्यांपासून आपल्यास तिळमात्रही मदत न होतां उलटा आपल्या घरांत बंडावा होण्यास तीं कारणीभूत होतील. दुसरें—हीं राज्यें एतद्देशीय लोकांच्या अमलाखालीं असल्यानें त्यांतील प्रजेस नेहमीं दुःख भोगावें लागत असतें. आपल्या अमलाखालीं हिंदुस्थानचे लोक सर्व प्रकारच्या सुखांचा अनुभव घेतात; तें सुख एतद्देशीय राजांच्या प्रजेस मिळत नाहीं; असें लार्ड डालहौसीनें मनांत आणून निराळे रंग जितके धुऊन टाकितां येतील तितके धुऊन टाकून त्या ठिकाणीं तांबड्या रंगाची शोभा, आणि इंग्रजी

कायद्यांचा अंमल हीं आणण्याचा निश्चय केला; आणि तो निश्चय लार्ड साहेबांनीं बऱ्याच प्रकारें तडीस नेला. पण आमच्या सुदैवानें एतद्देशीय राजे हे इंग्रजी राज्यांच्या बळकटीस कारण आहेत, किंवा धोक्यास कारण आहेत याजबद्दल थोडक्याच दिवसांत चांगला निर्णय झाला ह्मणून बरें झालें.

डालहौसी साहेबांच्या मनानें जें एकदां घेतलें तें घेतलेंच. मग त्याप्रमाणें करण्यास त्यांनीं कंबर बांधली.—कंबर बांधली पण तरवार उपसली नाहीं.—कारण त्या कामांत तरवारीचें कांहीं कारण नव्हतें. डालहौसीसाहेब हिंदुस्थानांत आले त्यावेळीं इंग्लिशांची शक्ति एवढी होती कीं, कोणतेंही एतद्देशीय राज्य त्यांच्याशीं सामना करण्यास समर्थ नव्हतें. इंग्लिशांच्या शस्त्रांप्रमाणें त्यांजपाशीं शस्त्रें नव्हतीं. इंग्लिशांशीं अनेक वेळां संग्राम करून इंग्लिशांचा प्रताप त्यांनीं पूर्णपणें पूर्वींच जाणला होता; व पूर्वींच त्यांनीं लढाईचा राजीनामा देऊन आपल्या तरवारी म्यानांत घट्ट घालून ठेविल्या होत्या. लार्ड डालहौसीसाहेबांनीं लढाई करून एतद्देशीय राज्यें कमी करण्याचें मनांत आणिलें असतें, तर तीं सर्व घेण्यास त्यांस फार वेळ लागला नसता पण लार्ड डालहौसीस असें करितां येईना. कारण जेव्हां आमचे एतद्देशीय राजे इंग्रजांच्या प्रतापामुळें हतवीर्य होऊन ईस्टइंडिया कंपनी हिंदुस्थानचें सार्वभौमत्व पावती झाली; त्यावेळीं त्या राजांस त्यांच्या प्रतापी व सार्वभौम प्रभूकडून एक अभयवचन मिळालें. "तुह्मी जावत्काल इंग्रजबहादूर यांचे कह्यांत व मदतींत निरंतर संतोषानें रहाल तावत्कालपर्यंत इंग्रजबहादूर असा

करार करीत आहेत कीं,–तुमच्या मुलखास कोणी मुल-खांतील व बाहेरील उपद्रव किंवा आगळीक करून इजा देऊं लागल्यास इंग्रजसरकारांतून मुलखाचा बचाव होईल.– व तावत्काल तुह्मीं आपल्या मुलुखाचें राज्य तुह्मी व तुमचे फरजंद, व वारीस व कायम मुक्काम यांणीं सदोदित करीत असावें " एवढें अभय मिळाल्यानंतर आमचे राजे निर्धास्त झाले. कारण त्यांना ठाऊक होतें कीं, वचन देणारे हे इंग्रज आहेत. त्यांचें वचन कल्पांतींही ढळणार नाहीं.

लार्ड डालहैसी आल्यानंतर एक वर्षाच्या आंतच त्यांहीं दोन मोठे प्रांत घेऊन आपल्या मुलुखास जोडले. ह्मणून आमचे राजे भ्याले नाहींत, किंवा असंतुष्ट झाले नाहींत. पंजाब घेतला तें ठीकच केलें. सर्व शीक लोक तहाच्या विरुद्ध इंग्रजांशीं युद्धास उठले. इंग्रजांनीं त्यांच्याशीं युद्ध केलें, त्यांस जिंकिलें, त्यांचा प्रांत घेतला, यांत कांहीं गैर झालें नाहीं. ज्या ज्या वेळीं इंग्लिशांनीं या देशांतील राज्यें तरवारीनें घेतलीं त्या त्या वेळीं लोकांस किंवा, इतर राजांस त्याबद्दल फारसें वाईट वाटलें नसावें. कारण समरांगणांत जिंकलें जाऊन राज्यपदास मुकणें हें आमच्या देशांतील राजांचे अगदीं अंगवळणी पडलें होतें.

---

## भाग १४.

परंतु लार्ड डालहौसी साहेबानें हिंदुस्थानांत गव्हरनर जनरलच्या जागीं येऊन दाखल होतांच सातारच्या राज्याच्या दत्तक प्रकरणाचा जो निकाल केला, तो पाहून मात्र एतद्देशीय सर्व राजेरजवाडे बऱ्याच अंशीं गलबलून गेले. राजेरजवाड्यांनीं दत्तक घेण्याच्या कामांत कंपनी सरकारानें मोठा घोंटाळा करून टाकिला होता. सर्व ठिकाणीं एकच नियम करून ठेविला नव्हता. इसवी सन १८२७ सालांत दौलतराव शिंदे मरण पावले, त्यावेळीं त्यांस पुत्रसंतान नव्हतें. त्यांनीं जिवंत असतां दत्तक घेतला नव्हता, किंवा आपल्या मार्गे दत्तक घेण्याविषयीं आज्ञाही लिहून ठेविली नव्हती, तरी कंपनी सरकारानें त्यांची पत्नी श्रीमंत बायजाबाईसाहेब यांजला दत्तक घेण्याची परवानगी दिली; आणि दौलतरावाच्या मार्गे ग्वाल्हेरीस जनकोजीराव शिंदे हे राजे झाले. त्याचप्रमाणें होळकरांच्या घराण्यांत इंग्रजसरकारच्या अनुमतानें दत्तक झालें. कदाचित् कोणी ह्मणतील कीं, "शिंदे व होळकर यांचीं राज्यें बऱ्याच अंशीं स्वतंत्र होतीं, हे इंग्रजांशीं स्वतंत्र लढत होते, हे मूळचे पेशव्यांचे सरदार, तरी ते पेशवाई असतांच पेशव्यापासून स्वतंत्र झाले होते. इंग्रजांचे त्यांच्यांशीं स्वतंत्र तह होते. ह्मणून इंग्लिशांनीं रणांत पेशवाई जिंकून घेतली त्यावेळीं शिंदे व होळकर हे सांगलीकर, मिरजकर, तासगांवकर, जमखेंडीकर यांप्रमाणें इंग्लिशांचे ताबेदार सरदार होऊन राहिले नाहींत. ते इंग्लिशांचे बरोबरीचे दोस्त होते ह्मणून त्यांस दत्तक घेण्याची परवानगी देणें इंग्लिशांस जरूर होतें."

परंतु मुंबई इलाख्यांतच कंपनी सरकारानें पेशवाई मोडल्यानंतर पेशव्यांच्या सरदारांस वेळोवेळीं दत्तक घेऊं दिल्याचें दिसून येतें. पंतसचीव, पंतप्रतिनिधि, फलटणचे निंबाळकर, जतचे डफळे या सर्व घराण्यांत दत्तक झाले आहेत. कुलाब्याच्या आंग्र्यास मात्र दत्तक घेऊं दिला नाहीं. याचें कारण असें दिसून येतें कीं, ज्यावेळीं त्या गादीचे मालक मरण पावले, त्या वेळीं त्यास औरसपुत्र होता तो पुढें लवकरच मरण पावला. मग त्या मुलाच्या आईस दत्तक घेण्याची परवानगी घेऊं न देतां कुलाबा हें सन १८४१ सालीं खालसा केलें. अशा प्रकारें या दत्तकाच्या कामांत मोठा घोंटाळा करून टाकला होता. कोणास दत्तक घेऊं द्यावें, आणि कोणास दत्तक घेऊं देऊं नये, कोणत्या कारणावरून घेऊं द्यावें व कोणत्या कारणावरून घेऊं देऊं नये यांविषयीं कांहींच नियम नव्हता. कुलाब्याच्या आंग्र्याच्या प्रकरणांत लार्ड ऑक्लंड हे गव्हरनर जनरल होते. त्यांनीं एक साधारण नियम लिहून ठेविला होता. "न्यायास व लौकिकास अनुसरून जर एकादा प्रांत किंवा, उत्पन्न मिळत असेल तर कंपनीनें तें घेण्यास कधीं मागें पुढें पाहूं नये. परंतु कायम असलेले हक्क कोणत्याही प्रकारें बुडवून असा आपला फायदा करून घेऊं नये." साताऱ्याच्या प्रकरणांत लार्ड डालहौसीनें या मतावर कडी चढविली.

शहाजी महाराज भोंसले हे प्रतापसिंह महाराज यांस फितुरीच्या आरोपावरून गादीवरून काढून टाकिल्यानंतर साताऱ्याच्या गादीवर आरूढले. ते इसवी सन १८०८ च्या एप्रील महिन्याच्या ५ व्या तारखेस कैलासवासी झाले.

मरणाच्या पूर्वी तीन दिवस महाराजांनीं दत्तक घेण्याबद्दलें परवानगी मिळण्याविषयीं सरकारांत रेसिडेन्ट साहेबांच्या मार्फत यादी पाठविली होती.—परंतु महाराजांची प्रकृति अत्यावस्थ झाल्यामुळें सरकारांतून जबाब येण्यापूर्वींच महाराजांनीं तारीख ५ एप्रील रोजीं सकाळीं दहा वाजतां एका सरकारी कामगाराच्या समक्ष यथाविधि दत्तक समारंभ करून आपल्या कुळांतील एक मुलगा दत्तक घेतला. पुढें सुमारें दोन तीन तासांनीं महाराजांचें प्राणोत्क्रमण झालें. या समयीं रेसिडेन्टसाहेब साताऱ्यांत नव्हते, ते आल्यावर महाराज [illegible] त्यांनीं मरणाचे पूर्वी दत्तक घेतल्याबद्दल सर्व हकीकत मुंबई सरकारांत कळविली. त्यावेळीं मुंबईचे गव्हर्नर सर जार्ज क्लार्क हे होते. त्यांनीं साताऱ्यांच्या घराण्याशीं इंग्रज सरकारचे सन १८१९ व सन १८३९ [illegible] झालेले तहनामे वाचून पाहून दत्तक कबूल करावा असें आपलें मत लिहून पाठविलें. पण त्यांचे दोन कौंसलदार यांनीं आपलें मत त्यांचे विरुद्ध दिलें. सर जार्ज क्लार्क पुढें लागलेच बदलून त्यांच्या जागीं लार्ड फाक्लंद हे मुंबईस गव्हरनर आले. त्यांचें सुद्धां मत दोघां कौंसलदारांप्रमाणें साताराचें राज्य खालसा करावें असेंच पडलें. मग हे सर्व कागद सन १८४८ च्या आगष्ट महिन्यांत कलकत्त्यास डालहौसी साहेबांकडे गेले. लार्ड डालहौसीस हिंदुस्थानांत येऊन त्या वेळीं पुरें वर्ष सुद्धां लोटलें नव्हतें. तोंच एतद्देशीय राज्यांवर कंपनी सरकारानें कोणत्या प्रकारची दृष्टी ठेवण्याची याजबद्दल त्यांचा निश्चय झाला होता. लार्ड ऑक्लंड यांनीं कुलाब्याचे प्रकरणीं जें आपलें मत लिहून ठेविलें होतें तें तरत्यास

सोळा आणे कबूल होतेंच. पण लार्ड डालहौसीनीं आण-खी दुसरें एक आपलें मत लिहून ठेविलें. या सातारच्या प्रकरणांत बोर्ड आफ डायरेक्टरास जो त्यांनीं रिपोर्ट केला त्यांत ते असें लिहितात:—"दत्तक प्रकरणीं आह्मीं एक अमुकच नियम असावा असें जरी ह्मणत नाहीं, तरी आमचा अभिप्राय असा आहे कीं, ज्या ज्या प्रसंगीं औरस वारीस नसतील, त्या त्या प्रसंगीं सरकारानें दत्तक घेण्यास परवानगी कधीं न देतां तें राज्य किंवा संस्थान एकदम खालसा करावें. एखादेसमयीं कांहीं विशेष राजकीय कारणानें कोणा राजास दत्तक घेऊं देणें योग्य दिसल्यास त्याजबद्दल स्वतंत्र विचार करितां येईल. परंतु साधारण नियम असा आसावा कीं, कोणांसही दत्तक घेण्याची परवानगी देऊं नये"—बोर्ड आफ डायरेक्टरांपैकीं बरेच लोकांस लार्ड डालहौसीचें मत योग्य दिसलें, व त्यांनीं सातान्याचें राज्य खालसा समजावें असा हुकूम पाठविला. हा अन्यायाचा व जुलुमाचा प्रकार बोर्ड आफ डायरेक्टरांपैकीं कांहीं सभासदांस व पार्लमेन्ट सभेच्या कित्येक सभासदांस न आवडून त्यांनीं हा हुकूम रद्द करावा, ह्मणून पुष्कळ यत्न केला, परंतु तें सर्व व्यर्थ झालें. बहुमतें जो ठराव झाला तोच कायम राहिला. तहामध्यें "वंशपरंपरा चिरकाल राज्य चालवूं" असें जरी लिहिलें होतें, तरी तें आमचे हतभाग्य राजेरजवाड्यांच्या कांहीं उपयोगास आलें नाहीं. 'वंशपरंपरा' याचा लार्ड डालहौसीनें "सरळ औरस संतती" असा अर्थ केला. असा अर्थ मुसलमानीत कधीं झालेला नव्हता. ह्मणून सर्व राजेरजवाडे हवालदील व चकित होऊन गेले. बादशाही अमलांत एतद्दे-

शीय राजांस दत्तक घेणें झाल्यास दिल्लीस परवानगी मागावी लागत असे, खरी, पण ती दिली नाहीं असें कधींच झालें नव्हतें. या परवानगीबद्दल त्यांस मोठा नजराणा द्यावा लागत असे. परंतु नजराणा द्यावा लागला तरी परवानगी मिळत असे. त्या काळीं राज्य " खालसा " हा शब्द कोणासच माहीत नव्हता. हा इंग्रजी राज्यांत आमच्या लोकांस प्रथमतांच ठाऊक झाला.

या सातान्याच्या ठरावांत लार्ड डालहौसीनें " खालसा करण्याचें " जें भयंकर मत लिहून ठेविलें त्याचा अनुभव लवकरच आला. इसवी सन १८५३ सालीं दिसेंबर महिन्याच्या सुमारास नागपुरचे राजे रघोजीराव भोंसले हे मरण पावले. त्यांस औरस संतती नव्हती, व जिवंत असतां त्यांणीं कोणी दत्तकही घेतला नव्हता. आपलें एवढें राज्य सरकार एकदम खालसा करील असें रघोजीस कधीं वाटलें नसावें. शिंदे, होळकर यांस जसे त्यांच्या मागें दत्तक घेऊं दिले, व त्यांचीं राज्यें कायम राहिलीं; तसेंच हें आपलें राज्यही कायम राहील असें त्या बिचान्यास वाटलें असावें. रघोजी भोंसले वारल्यानंतर गादीस कोणी वारस उभा राहिला नाहीं. राणींनीं मागें कोणी दत्तकही घेतला नाहीं. इतक्या गोष्टी अनुकूळ होत्या. मग काय पाहिजे ! लार्ड डालहौसी साहेबानें नागपुरचें राज्य खालसा आहे ह्मणून एकदम ठराव केला.

हा ठराव ऐकतांच रघोजीच्या बायका घाबरून गेल्या. त्या बिचान्यांस " खालसा " ह्मणजे काय हें देखील कळेना. पण जेव्हां कां सरकारचे कामगार येऊन वाड्यांतील हत्ती, घोडे, भांडींकुंडीं, दागदागिने, जडजवाहीर

वगैरे झाडून सर्व चीजवस्त उचलून घेऊन गेले, तेव्हां त्यांचे डोळे उघडले. त्यांस इंग्रज सरकारानें पेनशन करून दिलें. परंतु काय उपयोग ! त्यांच्या मागें नागपूरकर भोंसले या प्रसिद्ध घराण्यांची नक्कल होणार. ह्मणून त्यांनीं दत्तक घेण्याची परवानगी मिळण्याविषयीं कलकत्यास अर्ज केले. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. रघोजींची सर्व जिनगी प्रसिद्धपणें लिलावानें विकून टाकली. झांशीचीही अवस्था याचप्रमाणें झाली.

याप्रमाणें लार्ड डालहौसीनें " खालसा " हा पाढा पाठ करून त्या अन्वयेंच ठराव अमलांत आणिला. " खालसा " हा ठराव केवळ राज्यांसच लागू न होतां कोणतीही जहागीरी किंवा, नक्त नेमणूक असली तरी त्यासही खालसाचा ठराव लागू होऊं लागला. इसवी सन १८५१ सालांत प्रसिद्ध बाजीराव पेशवे हे ब्रह्मवर्ती मृत्यु पावले. त्यांस नानासाहेब हे दत्तक पुत्र होते. परंतु बाजीरावाच्या मागें त्याची वर्षाची आठ लाखांची नेमणूक नानासाहेबांस सरकारानें न चालवितां एकदम ती खालसा केली. त्याचप्रमाणें कर्नाटकचा नवाब व तंजावरचा राजा हे निपुत्र मरण पावले. या घराण्यांचीं राज्यें पूर्वींच सरकारानें घेतलीं होतीं. परंतु त्यांचें " खानदान " बहुत दिवसांपासून असल्यामुळें सरकारानें " शानशौकती करितां " त्यांस कांहीं नेमणूक करून देऊन ह्या घराण्यांचीं नांवें कायम ठेविलीं होतीं. ती नेमणूक आतां (१८५४–५५ सालीं) लार्ड डालहौसीनें बंद केली.

याप्रमाणें लार्ड डालहौसीनें आपला आवडता ठराव सर्व प्रसंगीं अमलांत आणिला. नवीन राज्य मिळण्याचे

किंवा, आपल्या राज्यांतील एतद्देशीय राज्यें खालसा करण्याचे किंवा, इनाम, नेमणुका बंद करण्याचे जे जे सर्व प्रसंग आले ते ते आमच्या लार्ड डालहौसी साहेबांनीं अगदीं व्यर्थ घालविले नाहींत. शेवटीं अयोध्येच्या राजाचें प्रकरण उद्भवलें. याविषयीं सर्व माहिती हिंदुस्थानाच्या इतिहासांत आहे. ती एथें सांगणें हें आमचें काम नाहीं लार्ड डालहौसीस एतद्देशीय राज्यें मोडून त्या ठिकाणीं इंग्रजी राज्य व्हावें अशी मोठी इच्छा असे. त्या इच्छेअन्वयें अयोध्येच्या राजास पेनशन देऊन त्याच्या मुलखाचा बंदोबस्त आपल्या हातीं इसवी सन १८५६ सालीं घेतला एथें तर दत्तकाचा संबंध देखील नव्हता. अयोध्येच्या राजाकडून आपल्या राज्याची व्यवस्था नीट होईना; ह्मणून त्याचा मुलूख सरकारानें घेतला. लार्ड साहेबांनीं तर निश्चयच केला होता कीं, कोणत्याही निमित्तानें जर राज्य अगर नेमणूक खालसा करितां आली तर ती करावयाची. त्यांत मागें पुढें, न्याय, अन्याय बिलकूल पाहवयाचें नाहीं. एतद्देशीय राजांनीं आपल्या राज्याचा कारभार कितीही उत्तम रीतीनें चालविलेला असो, तें कांहीं एक मनांत आणावयाचें नाहीं. साताऱ्यास प्रतापसिंह महाराज व त्यानंतर शहाजी महाराज यांनीं आपल्या राज्यांचें काम इतकें उत्कृष्टरीतीनें चालविलें होतें कीं, त्यांचा कित्ता इतर राजेलोकांस घेण्यास योग्य आहे असें मुंबईचे गव्हरनर ह्मणत होते. प्रजा फार संतुष्ट होती. याचप्रमाणें नागपूरच्या राजाचें काम असेंच उत्तम होतें. रयतेस कोणत्याही प्रकारचें दुःख नव्हतें. आपणावर इंग्लिशांचें राज्य असावें असें तेथील लोकांनीं स्वप्नांत सुद्धां

इच्छिलें नसेल. परंतु तें सर्व व्यर्थ गेलें. लार्ड डालहौसीच्या मनानें घेतलें होतें कीं, एतद्देशीय राजे कितीही चांगले असले तरी तेवढ्यावरूनच त्यांचीं राज्यें कायम ठेविणें हें बरोबर नाहीं. ते एक चांगले असले तरी, त्यांच्या मागून त्यांचीं मुलें किंवा, दुसरे गादीचे वारीस चांगले कशावरून निपजतील? त्यांच्या राज्यांत आमच्यासारखे उत्तम कायदे आहेत काय? त्यांची व्यवस्था आह्मांसारखी शिस्तवार आहे काय? असें लार्ड डालहौसी ह्मणत असत.

अशा लार्ड डालहौसी साहेबांपुढें मुंबई सरकाराकडून आमचे रणधीरराव समशेर बहाद्दर यांच्या दत्तकाचे संबंधीं प्रकरण अभिप्रायासह आलें. वाचकहो, ह्या प्रकरणाचा निकाल कसा बरें व्हावा?

# भाग १५.

मुंबई सरकारानें आपल्यास दत्तक घेण्याची परवानगी द्यावी, ह्मणून वरिष्ठाकडे शिफारस केल्याचें वर्तमान रणधीररावास समजलें. त्यावेळीं त्यांस विशेष आनंद झाला नाहीं. कारण आपल्यास दत्तक घेण्यास परवानगी खचितच मिळेल असें त्यांस वाटत असे. परवानगी मिळेल यांत नवल तें काय? ते मनांत ह्मणाले,—" शिंदे, होळकर यांस सरकारानें परवानगी दिलेली नाहीं काय? आणि आमचें घराणें तर इंग्रज सरकाराशीं एकनिष्ठेनें वागत आलें; तेव्हां मला परवानगी मिळणार नाहीं असें कधींही होणार नाहीं—" ह्मणून परवानगी देण्याविषयीं मुंबई सरकारांतून पुढें लिहून गेल्याचें समजलें त्यावेळीं तें व्हावयाचें तसेंच झालें असें मानून त्यांस विशेष आनंद झाला नाहीं. विशेष आनंद न होण्यास आणखी एखादें कांहीं कारण असावें काय? आमच्या मतें एक असावें. परंतु त्याविषयीं आमची खात्री नाहीं. आह्मांस वाटतें, दत्तक घेण्याविषयीं परवानगी महाराजांनीं मोठ्या आनंदानें मागितलेली नसावी. रणधीरराव महाराज यावेळीं जरी पन्नासीजवळ आले होते, तरी त्यांची पुत्र होण्याची आशा अगदीं नाहींशी झाली नसावी. त्यांस वाटलें असावें कीं, अद्यापही जर ईश्वर कृपा करील, तर पुत्र होण्यास काय अडचण आहे! —आणि हें मनुष्यजीवास अगदीं साहजीक आहे—पुत्रप्राप्तीची आशा सहसा नाहींशी होत नाहीं; आणि यामुळेंच आह्मांस वाटतें या आपल्या देशांत नवरा मेल्यानंतर बायकोस" दत्तक घेण्याचे प्रसंग आल्याचीं शेंकडों उदाहरणें आढळतात. दत्तक घेणें ह्मणजे औरस संतती होण्याचा

मार्ग अगदीं खुंटला असें कबूल करण्याप्रमाणें होय, किंवा औरस संतती होण्याची आशा समूळ नाहींशी झाली असें मानल्याप्रमाणें होय. आशेनें मनुष्यास कधीं सोडिलें आहे काय? फांसाच्या स्तंभावर उभा केलेला गुन्हेगारही मनांत ह्मणत असेल कीं,-नजाणों, अद्यापही माझ्या सुटके-चा हुकूम येऊन मी [illegible]रणधीरसवाची बाबासाहेबांवर पूर्ण मर्जी होती खरी, तरी इतके दिवस त्यांहीं त्यास दत्तक घेण्याचें मनांत आणलें नाहीं. [illegible] कारण काय बरें?—वर सांगितलें हेंच असावें-नजाणों, जगदीश कृपा करील आणि अद्यापही मला पुत्र होईल. सेनापति [illegible] आड घेतली नसती तर आह्मांस वाटतें हें दत्तक प्रकरण इतक्या लौकर सरकारांत मुळींच गेलें नसतें. तशांत राजेसाहेब अद्याप-पर्यंत प्रकृतीनें निकोप होते. इतक्यांतच दत्तक घेण्याची खटपट केलीच पाहिजे असें त्यांस वाटत नसे. ह्मणून अशा समयीं दत्तकाविषयीं परवानगी मागणें ही महाराजांस मोठी आनंदाची गोष्ट नव्हती असें वाटतें. तेव्हां मागितलेली परवानगी सरकारांतून मिळणार असें समजल्यानें त्यांस मोठा आनंद कां व्हावा?

शहरांत मात्र सर्वांस मोठा आनंद झाला; त्यांत सेनाप-तीच्या घरांत जो आनंद झाला त्यास पारावार नव्हता. त्यांत विशेषेंकरून एका जीवास जो आनंद झाला तो तर खरोखरीच अगदीं अवर्णनीय होय. लग्नाची गोष्ट निघाल्या दिवसापासून त्या कोंवळ्या मनाची काय स्थिति झाली होती, त्याचें वाचकांनीं थोडेंसें अनुमान केलेंच अ-सेल बाबासाहेबांसही वर सांगितलेली बातमी ऐकून अ-निर्वाच्य आनंद झाला. आपल्यास राज्यप्राप्ति होणार

यामुळें नव्हे. त्याचा आनंद आणि सुंदरीचा (सेनापतीच्या मुलीचा) आनंद एकाच वर्गांतील होता. हीं भावी वधूवरें पुढील अत्युत्तम सुखाचा एव्हांपासूनच आपापल्या मनांत अनुभव घेऊं लागलीं.--तरूणच तीं!--त्यांना या जगांत पदोपदीं दुःख, व पदोपदीं निराशा प्राप्त होत असतात हें कळल्यानें [illegible] मुंबईच्या गव्हरनर साहेबांकडून पुढें लिहून गेल्याचें वर्तमान, गांवांत पसरतांच सर्वांच्या मुखीं बाबासाहेब हे आपले महाराज असें झालें. सुंदराबाईस तिच्या मैत्रिणी राणीसाहेब ह्मणून ह्मणूं लागल्या. ह्मणू[illegible]साहेब व सुंदराबाई हीं दोघेंही आपल्या मनांत आपणास खरोखर ती अपेक्षित स्थिति प्राप्त झालीच असें समजूं लागलीं. या समयींचें त्या उभयतांच्या परस्पर मनाच्या स्थितीचें काय वर्णन करावें! वाचकहो, अशाप्रकारचा समय खरोखर नेहमीं अत्युत्तम सुखाचा असतो. जावत्कालपर्यंत कोणतीही अपेक्षित वस्तु अप्राप्त असते तावत्कालपर्यंत ती परम सुखाची असें वाटत असतें, तीच वस्तु एकदां प्राप्त झाली ह्मणजे मग ती तितकी सुखदायक होत नाहीं. आणि हा मनुष्यांच्या मनाचा धर्मच आहे. जोंपर्यंत आपली अपेक्षित वस्तु आपल्यापासून दूर असते तोंपर्यंत तींतील सुख आपल्या कल्पनेच्या स्वाधीन असतें. मग त्या स्थितींतील सुखाची मनानें पाहिजे ती कल्पना करीत असावें. पण जेव्हां कां ती वस्तु आपल्यास प्राप्त होते, तेव्हां मग तींतील खरें सुख काय आहे तें प्रत्यक्ष अनुभवास येतें. तें प्रत्यक्ष अनुभविक सुख पहिल्या कल्पिलेल्या सुखापेक्षां अगदीं निराळें असून परस्परांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर असतें, हें सांगण्यास नकोच.

आतां बाबासाहेबांचें सेनापतीकडे जाणें वारंवार होऊं लागलें. मेजवानी ह्मणा, गाणें ह्मणा, नाच ह्मणा, कांहीं तरी निमित्तानें बाबासाहेबांस सेनापतीच्या घरीं नेहमीं जाण्याचे प्रसंग येत. यावेळीं त्यांची व सुंदराबाईची चांगली दृष्टादृष्ट झाली नाहीं, असें कधीं झालेंच नाहीं. तिचें तें चोरदृष्टीनें हळूच पाहून चिंचित् गालांतल्यागालांत हसणें व लाजून मर्यादेनें घरांत झटकन् जाणें इत्यादि नूतन प्रफुल्लित कमलिनीचा देखावा पाहून आमच्या बाबासाहेबांस विलक्षण आनंद होई. त्याचें वर्णन करणें फार कठीण आहे. या दोघांस उघडपणें जरी एकमेकांशीं बोलण्याचा प्रसंग आला नाहीं, तरी त्यांणीं नेत्रपल्लवीनें आपापले हृद्गत विचार परस्परांस कळवीत असावें. ही विरहव्यथित जोडप्यांची नेत्रपल्लवी अजाणत्यांस मुळींच समजत नाहीं. परंतु तरुण स्त्रीपुरुषांचें प्रेम प्रथमतः या नेत्रपल्लवीनेंच जडत असतें. याप्रमाणेंच आमचे बाबासाहेब व सुंदराबाई यांचें एकमेकांवर अतिशय प्रेम जडत चाललें. सेनापतीनें तर लग्नाची सुद्धां तयारी चालविली. दररोज घरीं सुंदराच्या लग्नाच्या गोष्टी चालत असत. ह्या गोष्टी चालल्या असतांना सुंदरा उठून बाहेर जाई; परंतु फार लांब जात नसे तेथें जवळच कोठें तरी पुस्तक घेऊन वाचीत बसत असे. आतां यावेळीं तिचें खरोखरी वाचन होत असे; किंवा शेजारच्या खोलींत बाबासाहेब व आईसाहेब हीं बेत काय करीत आहेत तिकडेस लक्ष्य असे हें मात्र सांगतां येत नाहीं.

सुंदराची वर्तणूक तर आतांकडेस अगदीं पालटून गेली होती. एकाएकीं तिच्या आंगीं विलक्षण प्रौढपणा

आला. तिची बाल्यदशा जाऊन तिचेठायीं एकदम यौवन दिसूं लागलें. हा काळ स्त्रीजातीस मोठा महत्वाचा असतो. या काळांत त्या प्राण्यांचे विचार अगदीं चमत्कारिक होऊन जात असतात. त्याचें वर्णन करणें मोठें कठीण आहे. सुंदराच्या वृत्तीचा पालट तिच्या मैत्रिणींस लागलाच कळून आला, हें मागें सांगितलेंच आहे. सुंदरानें आतां बाळपणींचे खेळ खेळणें सोडिलें, कां तें सांगतां येत नाहीं. त्या खेळाची तिची तिलाच लाज वाटूं लागली. तिचा बहुतेक वेळ एकांतांत बसण्यांतच जाऊं लागला ती कधीं कोणाशीं विशेष न बोलतां व आपल्या प्रिय मैत्रिणींसभागमें पूर्वीप्रमाणें न खेळतां नेहमीं माडीवर आपल्या खोलींत एकटीच बसत असे. अशाविळीं तिच्या आईनें किंवा कोणी कांहीं प्रश्न केला असतां तिणें एकदम दचकून लाजल्यासारिखें करावें आणि विचारल्या प्रश्नाचें उत्तर भलतेंच द्यावें. अशी तिची चमत्कारिक अवस्था झाली. अबलाच ती ! दिवसेंदिवस तिच्या कल्पनासमुद्रांस अधिकाधिक भरती येऊन ती आनंदलहरींत निमग्न होऊन तिची मुद्रा नेहमीं भांबावल्यासारिखी दिसूं लागली.

इकडे बाबासाहेबांचीही अशीच स्थिति झाली. त्यांस तर आतां कांहींच सुचेनासें झालें. सर्व वेळ पुढें प्राप्त होणारें सुख त्याचे मनांत घोळत असे. पुढें असें करायाचें, तसें करायाचें, हें सर्व त्यांच्या मनांत चालतें असे

## भाग १६.

वाचकहो ! ह्या वेळपर्यंत आमच्या कथेंतील निरनिराळ्या पात्रांच्या सुखाच्या स्थितीचा चित्रपट होईल तितका निटनेटका बनवून आपल्या रंजनार्थ आपल्यापुढें ठेविला. तो उचलून आतां दुसरा पट आपल्या समोर ठेवावयाचा आहे. आमचा धंदा, खांद्यावर भगव्या कापडांत गुंडाळलेली तांबडी पेटी घेऊन त्या पेटींतील चित्रपट दारोंदार दाखवीत फिरणाऱ्या काशीकडील त्या चित्रकथ्याप्रमाणें कांहींसा आहे. त्या चित्रकथ्यास आपल्या इकडे काशी कापडी ह्मणत असतात. आह्मांस त्या कापड्याप्रमाणेंच आमच्या कथारूपी पेटींतील चित्रांचीं पानें एका पाठीमागून एक अशीं दाखविणें आहे. त्या कापड्याच्या पेटींतील चित्रें निरनिराळ्या तऱ्हेचीं असतात. त्याचप्रमाणें आमच्या या कथेंतील चित्रें तऱ्हेतऱ्हेचीं आहेत. हल्लीं आपल्यासमोर ठेविलेल्या पटांतील चित्रें आपल्यास बरीं आहेत असें वाटत असल्यास, तीं मर्जी असल्यास जरा सावकाश पाहून घ्या. अशी आपल्यास विनंती आहे.

त्या कापड्याचीं चित्रें लहानपणीं कधीं पाहिल्याचें आपल्यास स्मरतें काय? आह्मांस पाहिल्याचें चांगलें स्मरतें. त्याच्या त्या घांटेचा खण खण आवाज कानीं पडला कीं पुड्यांतील भरलें पान तसेंच टाकून, आचवलें न आचवलें तोंच—कधीं खरकट्या हातानेंच—त्याच्या समोर उभें राहून त्याचीं तीं चित्रें पाहत असूं. एखादें चांगलेंसें चित्राचें पान दिसलें कीं तें फार आनंदानें पहावें; तो कापड्या पुढलें पान उलटूं लागला तर त्याला ह्मणावें, "अरे, ए, बाबा, थांब जरा. हें चित्र फक्कड आहे. तें

जरा पाहूंदे." "बावास" असणार दुसऱ्या घरीं जाण्याची घाई, ती कसचा थांबतो. आमच्या घरांतून त्याला फारतर एक पैसा मिळणार. तो जर प्रत्येक टवाळ मुलाच्या मर्जीप्रमाणें एक पैशांत आपले चित्रपट सावकाश दाखवूं लागला तर त्यास सकाळपासून बारा वाजेपर्यंत दोन आण्याचे सुद्धां पैसे मिळणार नाहींत, आह्मीं मुलांनीं कांहीं ह्मटलें तरी त्याची तोंडानें बडबड चालून हातांतील तो मोराच्या पिसांचा लहान कुंचा चित्रांवरून फिरत असावयाचा. समर्थी तोंडानें "हे पांच पांडव पाहा, हे पांच पांडव पाहा," असें चाललें असून कुंचा असावयाचा द्रौपदीचे चित्रावर. सारांश, त्याची सर्वच घाई. वाचकहो! तशी आमची नाहीं. त्या कापड्याचें ठीकच. त्याचा सर्व उद्योग दोनप्रहराकरितां शेर मिळविण्यासाठीं असतो. त्याच्या पेटींतील चित्रें त्याच्या हातचीं नसतात. तीं कोणी चांगलीं ह्मटलीं काय, वाईट ह्मटलीं काय, त्यास सारखेंच. त्यास एक दमडी अथवा पैसा मिळाला ह्मणजे झालें. आह्मीं वर ह्मटलें कीं त्याचा व आमचा धंदा सारखा आहे. परंतु ती साम्यता त्या चित्रकथ्याप्रमाणें आमच्या कथेंतील चित्रपट एका पाठीमागून एक आमच्या वाचकांपुढें ठेवण्यापुरती मात्र आहे. जास्त नाहीं. ह्मणूनच आह्मीं आपला धंदा "थोडासा सारिखा" असें ह्मटलें. कारण एक तर आमचीं चित्रें आह्मीं स्वतः रेखलेलीं व रंगविलेलीं आहेत. तीं आमच्या प्रेक्षकांनीं चांगलीं ह्मटलीं कीं आह्मांवर वोटभर मांस लागलें आलेंच. दुसरें असें-आमचा उद्योग माध्यान्हकालाचे सोईसाठीं नाहीं. तिसरें-आह्मीं आपलीं चित्रें लहान, टवाळ, नागवीं फिर-

णारीं, विचारशून्य मुलांसमोर मांडलेलीं नाहींत. यास्तव आह्मीं येथें घाई कां करावी? आह्मीं होऊन आपल्यास सांगतों कीं ह्या वेळपर्यंत जो पट आपल्या समोर उघडा आहे, त्यांतील चित्रें आमच्या मतें जरा मनाला रंजविणारीं आहेत, तशीं पुढल्या पटांतील चित्रें नाहींत. ह्या वेळपर्यंत आमच्या कथेंतील वर्णन सुखाचें व आनंदाचें झालें. पुढील कथाभागांत दुःखाचें वर्णन करण्याचा प्रसंग येणार आहे असें बहुधा आपण अनुमान केलेंच असेल. सुखाचें व आनंदाचें वर्णन सर्वांस प्रिय होतें तसें दुःखाचें होत नाहीं. बहुतेकजणांस हरिकथा जशी आवडते तशी रामकथा आवडत नाहीं. ती खोल विचारी मनुष्यांस मात्र प्रिय होते. याचें कारण काय? रामकथा शोकरसप्रधान पडली हेंच नव्हे काय? भागवत ऐकण्यास जसा श्रोत्यांचा समाज जमतो व तो समाज जसा तें आल्हादित अंतःकरणानें श्रवण करीत असतो तसा वाल्मीकिरामायण ऐकण्यास बहुधा जमत नाहीं, व जमला तर तसें अल्हादित अंतःकरणानें तें श्रवण करीत नाहीं. आमच्या घरांतील एक वृद्ध बाई नेहमीं नेमानें सर्वांचे पूर्वी देवळांत पुराणश्रवणास जात असे. एका वर्षीं ती कांहीं दिवस नेहमीं उशिरानें पुराणश्रवणास जाऊं लागली. तेव्हां आह्मांस किंचित् अचंबा वाटून एके दिवशीं आह्मीं विचारिलें, "काकी! अलिकडे तुह्मी पुराणास उशिरां कां जातां?" ती ह्मणाली, "बाळा! हल्लीं पुराणिक वाल्मीकिरामायण सांगत आहेत. तें ऐकण्याचें काम फार कठीण. सर्व वेळ डोळ्यांतून पाणी पडत असतें; ह्मणून तें ऐकण्यास लौकर जावेंसें वाटत नाहीं."

असो. हें उगाच विषयांतर झालें. भागवत व रामायण यांची गोष्ट बायकांस लागू. आमच्या वाचकांत बायकांपेक्षां पुरुषच फार असतील. यास्तव आह्मीं आपली गोष्ट पुढें सांगतों.

---

## भाग १७.

मुंबईच्या गव्हरनर साहेबांनीं आपल्यास अनुकूळ असा "रिपोर्ट" गव्हरनर जनरल साहेबांकडे केल्याचें ऐकून महाराजांस विशेष आनंद झाला नाहीं असें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यांचे सर्व व्यापार नेहमींप्रमाणें चालले होते. त्यांत किंचितही फेरफार दिसून आला नाहीं. दत्तक प्रकरणाबद्दल ते कधीं कोणाजवळ बोलत नसत. बोललेच तर कधीं नारायणरावांपाशीं मात्र बोलत असत.

सुमारें एक महिना लोटला. एके दिवशीं रात्रौ महाराज आपले खोलींत पलंगावर पडलेले आहेत. राणी नित्याप्रमाणें जवळ बसली आहे. इतक्यांत "रेसिडेंट साहेबांकडील स्वारानें लखोटा आणिला आहे" असें खोलीच्या बाहेरील पाहऱ्यावरचा शिपाई पुकारतो. तें ऐकतांच महाराज स्वारानें आणिलेला लखोटा आणवितात आणि तो फोडून वाचूं लागतात.

राणी—मी खचित सांगतें कीं कलकत्त्याकडील हुकूम आला.

महाराज—फसलीस बरें. हा हुकूम नव्हे. साहेबानें उद्यां बंगल्यांवर भेटीस बोलाविलें आहे.

राणी—त्याचाच अर्थ तो. माझें अनुमान खोटें होणार नाहीं. खचित हुकूम आला. म्हणून हें बोलावणें आहे.

राजा—मलाही असेंच वाटतें. परमेश्वरानें एकदांची कृपा केली असें दिसतें. असो. उद्यां हुकूम हातीं पडल्यावर पहिलें काम दत्तविधानाचा मुहूर्त पाहण्याचें. सुंदरीनें बाबासाहेबांस एकदां माळ घातलेली पाहिली म्हणजे झालें. मग मला दुसरी कशाची इच्छा नाहीं.

राणी—माझीही तीच इच्छा आहे. आतां आपल्या पोटीं पुत्र होईल ही आशा नाहीं बाबासाहेबास आपण लहानपणापासून पुत्राप्रमाणें वाढविला आहे तेव्हां तो आपला मनोभावानें पुत्र तर आहेच. परंतु सरकारी कायद्याप्रमाणें एकदांचा ठरला ह्मणजे झालें.

राजा—सेनापति ह्मणतात ह्मणून सरकारच्या परवानगीची गरज, नाहीं तर लग्नासाठीं दत्तविधानाची जरूरच होती असें नाहीं. असो. आतां ती परवानगीही आली असें दिसतें. खरें ह्मटलें तर ती परवानगी मिळण्यास काय अशक्य आहे? इंग्रज सरकार मला कोणत्या कारणानें बरें दत्तक घेण्यास परवानगी देण्याचें नाकारतील? 'वंशपरंपरा' तुमची गादी चालवूं असें त्यांचें वचन आहे. तें वचन ते कदापि मोडणार नाहींत मजकडून त्यांचे आज्ञेबाहेर कोणतीही गोष्ट झालेली नाहीं. अग, मी त्यांच्याबरोबर किती एकनिष्ठेनें व प्रीतीनें वागतों ह्मणून सांगूं! माझे राज्यांतील प्रजा मी किती संतुष्ट ठेविली आहे? माझी राज्यरीति अगदीं त्यांच्या धर्तीवर आहे. नारायणरावजी काल थोडे संशयीत बोलत होते. पण मला तर कांहीं संशय वाटत नाहीं. माझी राजरीति इतर राजेरजवाड्यांनीं कित्ता घेण्यायोग्य आहे, असें आपले गव्हरनर साहेब वारंवार ह्मणत असतात.

राणी—पण आतां हुकूम आला ह्मणजे लग्नाचें लागलेंच उरकून टाकायचें ना? तीं दोघेंही पहा अगदीं उतावळीं झालीं आहेत. त्यांची एक एक मौज सांगितली तर खरेंच सांगतें हंसूंच येईल.

राजा—लग्नाचें लागलेंच उरकून टाकायचें ना ह्मणून काय विचारतेस? पण खरें ह्मणशील तर त्यांचें लग्न लव-

कर होत नाहीं यांतच मौज आहे. तीं दोघेंही वयानें प्रौढ आहेत. यामुळें त्यांचा हा काळ अत्युत्तम सुखाचा आहे. ज्यांचीं लहानपणीं लग्नें होतात त्यांस हें सुख प्राप्त होत नसतें. मला तर वाटतें कीं त्यांचें लग्न अधिक लांबेल तर बरेंच.

राणी—छे गडे! त्यांत त्यांना कशाचें जास्त सुख? उलटी निराशा व अस्वस्थता मात्र वाटेल. त्यांना तर असें झालें आहे कीं केव्हां एकदांचें सर्व ह्मणतात तसें होईल कोण जाणें.

राजा—अग पण तसें झालें नाहीं तोंपर्यंतच कायतें सुख. कोणतीही गोष्ट एकदां झाली ह्मणजे मग त्याविषयीं कांहीं वाटत नाहीं. असो. उदईक कायतो सर्व बेत करूं.

*　　　*　　　*

रात्र निघून गेली. त्यावेळांत महाराजांस व राणीस बहुधा चांगली झोंप आली असेल असें आह्मांस वाटत नाहीं. प्रातःकाळीं महाराज नित्यापेक्षां फार लौकर उठले. वर वर पाहाणारास महाराजांच्या नित्याच्या वर्तनांत व ह्या दिवसाच्या वर्तनांत विशेष फरक दिसून आला नसता. पण बारीक पहाणारास तो लागलाच दिसून आला. महाराजांची आज अशी घाई व अस्वस्थता कशानें झाली आहे हें कोणास कळून आलें नाहीं. स्नान नित्यापेक्षां एक तास पूर्वी झालें. सर्व नेमधर्म आटोपून स्वारी बाहेर दिवाणखान्यांत जाऊन बसावयाची तशी न बसतां आपल्या खासगी खोलींत गेली व तेथें मोतीसिंगास बोलावून आणविलें.

महा०—मोतीसिंग! जामदारखाना उघड बरें. मला कपडे पहायाचे आहेत.

महाराज खुर्चीवर बसले आहेत. मोतीसिंग कपड्यांचीं बासनें सोडून दाखवीत आहे. दोन, तीन, चार, बासनें सोडून झालीं. तरी महाराजांस जे कपडे पाहिजे होते ते सांपडले नाहींत.

"ते कोणत्या बासनांत ठेविलेसरे?"

मोती०—महाराज, मला—

इतक्यांत तेथें राणी येते.

राणी—कोणते कपडे पहाणें चाललें आहे?

महा०—अग ते लार्ड-साहेब आले होते आणि आपल्या वाड्यांत दरबार झाला आणि लार्डसाहेबांनीं मला ती जडावी तरवार दिली त्यादिवशी जो मी आंगरखा घातला होता व मंदील बांधला होता तो पहात आहें. तो कोठें आहे बरें? आज तो पोशाख करून बंगल्यावर जायाचें आहे.

राणी—तो कशाला पोशाख घालावा. मी तर बुढ्या जामदाराकडून तो एके आंगास ठेविला होता. तो पोशाग चढवितेवेळीं आंगरख्याचा पदर लागून टेबलावरील शामदान नाहीं बरें त्यादिवशीं खालीं पडलें?

महा० तूं अगदीं वेडी आहेस. शामदान पडलें म्हणून काय झालें! आणि बरें तें पडलें म्हणून दीपशांति व ब्राह्मणभोजन वगैरे मिळोन तुझ्या आग्रहासाठीं एक हजार रुपये नाहीं का खर्च केला. अद्याप त्या बापड्या शामदानावर अपेश आहेच का? कोठें आहेत ते कपडे?

हें ऐकून राणी ते कपडे आणवून महाराजांपुढें ठेवविते. ते पाहून आज बंगल्यावर जातेवेळीं हे कपडे घालावयाचे असें महाराज मोतीसिंगास सांगतात.

मोतीसिंग—"हुकूम", म्हणून तें कपडे घेऊन जातो.

*　　　　*　　　　*

सायंकाळचे चार वाजतात. तोंच महाराज रेसिडेन्ट-साहेबांच्या बंगल्यास जाण्यासाठीं गाडींत बसतात. रेसिडेन्टसाहेब व महाराज यांचा परस्परांवर पराकाष्ठेचा लोभ असे. महाराज बंगल्याजवळ आले म्हणजे साहेब नेहमीं मोठ्या आनंदी मुद्रेनें महाराजांस सामोरे येऊन त्यांचा हात धरून त्यांस आपल्या दिवाणखान्यांत नेत असत. या खेपेस महाराजांची गाडी बंगल्याच्या दरवाज्या समोर जरी जाऊन उभी राहिली तरी साहेब सामोरे आले नाहींत. महाराज गाडींतून उतरल्यानंतर साहेब आले. परंतु त्यावेळीं साहेबांचा चेहरा आनंदी दिसला नाहीं. तें पाहून महाराज मनांत चपापले. मग दोघेही खुर्चीवर बसल्यानंतर सुमारें १० मिनिटांनीं महाराजच साहेबांस प्रथम म्हणतात.—

महा०—आज साहेबांची प्रकृति नीट दिसत नाहीं?

साहेब—जरा नाहीं खरी महाराज, आज मनास किंचित् असमाधान वाटत आहे.

महा०—तें कां बरें?

साहे०—काय सांगूं महाराज! मला सांगण्यास मोठी दिलगिरी वाटते. महाराज, आपण मनाचे मोठे खंबीर आहांत; आणि मला वाटतें कीं हीच वृत्ति आपण नेहमीं ठेवाल. मोठ्या प्रसंगीं मनाची वृत्ति बदलूं न देणें हेंच मोठ्या शूराचें काम आहे. या जगांत अकस्मात् मनुष्यांवर अकल्पित संकटें येऊन पडत असतात. अशा प्रसंगीं मनाचें स्थैर्य सोडतां कामा नये. ( साहेब, महाराजांचा हात

आपले हातांत घेऊन ) मी ह्मणतों हें खरें कीं नव्हे बरें ? अशा प्रसंगींच मनुष्याच्या सद्गुणाची खरी परीक्षा होत असते..

महा०—होय साहेब! असें मी आपल्ये मनास वारंवार शिकवीत असतों. अत्यंतविपत्तिकाळीं धैर्य न सुटणें हें कठीण तर खरेंच. परंतु ज्याचें धैर्य सुटत नाहीं तोच खरा शूर.

साहे०—ह्या शौर्याची [illegible] मिळवावी असें आपल्या मनाला वाटतें कीं नाहीं ?

महा०—साहेब ! दुःखाची कोणास आवड असणार ! दुःख कोणासही नको. परंतु तें ईश्वरेच्छेनें प्राप्त झालेंच तर तें धैर्यानें सहन करणें हें मनुष्याचें काम तर खचीतच.

सा०– तर मग, महाराज ! ईश्वरानें आपल्या शौर्याची पारख करण्याचा आज समय आणिला आहे. ( असें ह्मणून एक कागद महाराजांच्या हातीं देतात. )

महाराज तो कागद वाचूं लागतात. दोन चार ओळी वाचल्यानंतर महाराजांचा चेहरा खरकन् उतरून काळा पडतो. तो कागद समग्र वाचून होत आहे तोंच तो हातांतून खालीं पडतो. आणि महाराजांस मूर्च्छा आल्यासारिखी होऊन ते पुढील " टेबलावर " डोकें टेंकतात.

साहेब–( फार दुःखित होऊन ) महाराज ! महाराज ! हें काय ! धैर्य तें हेंच काय? महाराज ! सावध व्हा.

महाराज कांहीं वेळानें डोकें वर करून खुर्चीवर मान टाकतात. आणि टेबलावरील कागद आपल्या खिशांत घालून आपले दोन हातांनीं तोंड झांकतात आणि हळू शब्दांनीं ह्मणतात.

'कंपनी सरकाराशीं प्रीतीनें व एकनिष्ठेनें वागलों त्याचें हें फळ काय ?"

साहेब–महाराज ! यावेळीं मला कांहीं बोलतां येत नाहीं. सरकारची तुमच्यावर पूर्ण कृपा आहे. स्वतः तुम्हांस सरकाराकडून काडीमात्रही धक्का पोंहोंचणार नाहीं.

महा०–मग हा धक्का मला नव्हे तर कोणास ? आम्हां हिंदूंस आपल्या मागें आपलें नांव घेण्यास कोणी नसलें म्हणजे अत्यंत दुःख होत असतें.

साहे०–तें मी जाणतों. परंतु महाराज ! या कामीं सरकारचें पहाणें आपल्या प्रजेच्या सुखाकडेस आहे. सरकारास हल्लीं असें वाटत आहे कीं, एतद्देशीय राजेरजवाडे यांच्या अमलाखालील प्रजेस सुख व्हावें तसें होत नाहीं.

महा०–साहेब ! आपल्यास असें वाटतें का ? आपणच सांगा कीं, माझ्या या राज्यांतील प्रजा, सुखी आहे किंवा दुःखी आहे ?

सा०–महाराज ! गव्हरनर जनरल साहेबांचें असें मत आहे. ते आहेत तोंपर्यंत हें मत असेंच चालायाचें.

महा०–पण मी काय करूं ? मी गव्हरनर साहेबांच्या भेटीसाठीं मुंबईस जातों.

सा०–या वेळीं जाण्यांत कांहीं फायदा नाहीं आतां गव्हरनर साहेबांच्या हातीं कांहीं राहिलें नाहीं. त्यांणीं आपल्यास अनुकूळ अशी शिफारस कलकत्त्यास केली. आतां त्यांच्या हातून जास्त काय होणार आहे?

महा० मग कोणी कलकत्त्यास पाठवूं कीं काय ? साहेब ! मला कांहीं तरी या वेळीं सल्ला द्यावी.

सा०–( फार वाईट वाटन ) महाराज ! मला फार वा-

ईट वाटतें. परंतु खरोखरींच सांगतों कीं, आतां कलकत्यास कोणी गेला तरी हुकूम फिरणार नाहीं.

महा०—कंपनी सरकार परवानगी बद्दल कांहीं नजराणा मागत असतील तर तो मी देण्यास तयार आहें. साहेब! बादशाहींत असे नजराणे घेऊन परवानगी देत असत त्यांच्यापेक्षां कंपनी सरकार नीतिमान नाहींत काय? मी कोणी वकील विलायतेस पाठवूं किं काय?

साहे०—विलायतेस पाठवून काय उपयोग होणार आहे? सातारकरांनीं रंगो बापूजीस पाठविला त्याचा उपयोग काय झाला बरें? आज दहा वर्षें उगाच विलायतेस जाऊन बसला आहे.

म०—(अगदीं निराश होऊन) मग तर मी आतां काय करूं? साहेब! यावेळीं आपण मला साह्य करावें. माझें दील अगदीं फाटून गेलें आहे.

साहे०—मला तर आतां कांहीं उपाय दिसत नाहीं. आलेला प्रसंग धैर्यानें महाराजांनीं सहन केला पाहिजे. कारण हा हुकूम शेवटचा आहे.

हे शब्द ऐकतांच महाराजांच्या डोळ्यांतून टपटप अश्रुपात होतात—तसे अश्रुपात त्यांस कळूं लागल्यापासून ह्या वेळपर्यंत कधींच झाले नसतील असें वाटतें. ते पाहून—

सा०—महाराज! हें काय! हें विचारी पुरुषाचें काम काय? महाराज! आपण या वेळीं विचार करून मनाचें शांतवन केलें पाहिजे. (असें ह्मणून महाराजांचा हात अतिप्रेमानें आपले हातांत धरतात.)

महाराज कांहीं न बोलतां राजवाड्यांत परत येण्यासाठीं उठतात. परंतु त्यांस चांगलें चालतां येईना. त्यांचे

सर्व आंगास कंप सुटला. अंतर्यामी दुःखाग्नी भडकला. साहेबांनीं त्यांचा हात धरून त्यांस गाडींत बसविलें आणि आपण जवळ बसले. आणि गाडी परत राजवाड्याकडे हांकिली.

---

# भाग १८.

महाराज बंगल्यांतून वाड्यांत परत आले. त्यावेळीं नारायणरावजी व बाबासाहेब सहल करण्यास गेलेले घरा-कडे घोडे वळवून येत असून एका महत्त्वाच्या विषयावर बोलण्यांत गढले होते.

नारा०—बाबासाहेब ! राजा आणि प्रजा यांमध्यें संबंध कसा बरें असला पाहिजे ?

बाबा०— राजा आणि प्रजा यांमध्यें संबंध बाप आणि त्याचे मुलगे अथवा कुटुंबाचा मुख्य व त्यां कुटुंबाचीं माणसें यांत जो संबंध असतो तसा असला पाहिजे. असें आपण एकवेळ सांगितलें होतें.

नारा०—होय. तसें सांगितलें होतें खरें परंतु त्यांत एक शब्द सांगण्याचा राहिला होता. बाप आणि सज्ञान मु-लगे. अथवा कुटुंबाचा मुख्य व त्या कुटुंबाचीं सज्ञान माणसें असें ह्मटलें पाहिजे होतें. "सज्ञान" हा शब्द ह्मटल्यानें त्या संबंधाचें खरें स्वरूप तुह्मांस चांगलें दिसून येईल.

बाबा०—तें कसें ?

नारा०—सांगतों ऐका. आमच्या देशांत पूर्वींपासून राजा आणि प्रजा यांमध्यें असणारा संबंध बाप व त्याचे मुलगे यांच्या मध्यें असणाऱ्या संबंधाप्रमाणें आहे असें मानीत आले हें खरें आहे. परंतु तो संबंध बाप व त्याचे वडील अथवा सज्ञान मुलगे यांमध्यें असणाऱ्या संबंधाप्रमाणें आहे. असें कधीं आमच्या लोकांच्या मनांत आलें नाहीं. आपल्यास मीं मागें सांगितलेंच आहे कीं, मुलगा सज्ञान झाला ह्मणजे

त्याचा आपले बापाशीं संबंध मित्रपणाचा होऊन राहतो. कोणतेंही कार्य करणें झालें तर तें करण्याच्या पूर्वी बापास आपल्या सज्ञान मुलाची मसलत घेणें जरूर आहे. बापास मुलाच्या संमतीशिवाय कांहीं करितां येत नाहीं. बाप व सज्ञान मुलगे हा दृष्टांत सोडून कुटुंबाचा धनी व एक मोठें कुटुंब हा घेऊन बोलूं. कारण कुटुंब हें लहानसें राज्यच होय किंवा राज्य हें एक मोठें कुटुंब आहे असें ह्मटलें तरी चालेल.

बाबा०—ठीक आहे. पुढें.

नारा०—जर कुटुंबाच्या मुख्यास एखादेसमयीं असें वाटलें कीं, आपण एखादें नवीन शेत घ्यावें. अथवा एका शेतांत नवीन विहीर पाडावी तर ती गोष्ट त्यानें कुटुंबांतील जाणत्या माणसांस विचारिल्याविना करूं नये. कारण महत्त्वाच्या कामांत जर तो सर्वांची मसलत न घेतआपल्या जबाबदारीवरच तें करूं लागेल तर कुटुंबांतील परस्पर प्रीति व एकी लौकरच कमी होऊन कुटुंबाचा सर्व जमाव अगदीं बिघडून जाईल. धनी जर शाहणा असला तर एकाएकीं फारसा घोंटाळा होणार नाहीं. तरी त्याच्या मागें कुटुंबांचे धनी नेहमीं याप्रमाणें वागूं लागले तर हळू हळू असा परिणाम होईल कीं, त्या कुटुंबांत लौकरच सर्व माणसें मनानें दुर्बल होऊन जातील व कांहीं काळानें त्या माणसांस आपल्या शिरावरील वडील करतील तेंच योग्य त्यांत आपल्यास कांहीं बोलण्यास अगर नांव ठेवण्यास अधिकार नाहीं असें वाटूं लागेल.

बाबा०—असें वाटूं लागलें ह्मणजे त्या कुटुंबास उतरतीचें पाया लागला असें समजलें पाहिजे.

नारा०— होय खरेंच. अशा कुटुंबांतील माणसें मग अगदीं दुर्बळ व अगदीं क्षुल्लक कामांतही दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहणारीं होतात. त्यांची महत्त्वाकांक्षा अगदीं नष्ट होते. आणि असें होतांहोतां शेवटीं त्या कुटुंबांतील मनुष्याची स्थिति अगदीं लहान मुलांप्रमाणें होऊन जाते. हाच दृष्टांत आपल्या देशांतील पूर्वीच्या राजांस लावून पहा. पूर्वीपासून आपल्या कोणत्याही राजानें आपली प्रजा ह्मणजे आपल्यास सल्ला देणारी व मदत देणारी मंडळी आहे, असें मानिलें नाहीं. शेवटीं फार दिवसांच्या संवईनें राजाविषयीं आपले प्रजेचे विचार, आपले धन्याविषयीं असलेल्या गुलामांच्या विचाराप्रमाणें झाले. "नाविष्णुःपृथ्वीपतिः" असें मोठ्यांचे तोंडीं होऊन गेलें. मोठ्यांचें अनुकरण लहान लागलेंच करूं लागतात. तेही ह्मणूं लागले कीं, "राजानें दंडिलें आणि पावसानें भिजविलें याला काय उपाय," अशा विचाराचा परिणाम काय व्हावा, त्याचें अनुमान करितां येतें. आपल्या देशांतील राजांस वाटूं लागलें कीं, आपण विष्णूचे अंश आहोंत. प्रजेसही वाटूं लागलें कीं, आपण केवळ क्षुद्र प्राणी असून आपले राजे हे परमेश्वर होत. या समजुतीचा परिणाम फारच वाईट झाला देशांतील उमेद अगदीं लोपून जाऊन प्रजा मनानें अगदीं दीन झाली आहे. यासाठीं बाबासाहेब, आमच्या देशींतील राज्यकर्त्यांनीं ही गोष्ट मनांत वागविली पाहिजे कीं, आपली प्रजा व आपण यांत फारसें अंतर नाहीं.

बाबा०— गुरुजी आजचा विषय ऐकून मला फार आनंद वाटला.

नारा०—विषय अद्याप पुरा झाला नाहीं. आणखी एक

सांगावयाचें राहिलें तें सांगतों ऐका. पूर्वीचा कुटुंबांचाच दृष्टांत घेऊन बोलतों. कुटुंबांतील माणसांनीं मिळविलेल्या पैशाचा जसा सर्व कुटुंबाच्या कार्याकरितां व्यय व्हावयाचा, त्याजवर एकल्या कुटुंब चालविणाऱ्या मुख्याचाच हक्क नाहीं; त्याप्रमाणें प्रजेकडून घेतलेल्या पैशावर एकल्या राजाचा हक्क नाहीं.

बाबा०—तें कसें ? येथें कुटुंबाचा दृष्टांत सर्वांशीं कसा लागेल ? कुटुंबांतील माणसें जेवढें मिळवितात तेवढें सर्व कुटुंब चालविणाऱ्या वडिलापाशीं आणून देत असतात ह्मणून त्या ठिकाणीं पैशावर त्या वडिलाचा एकल्याचा हक्क नाहीं. कुटुंबांतील सर्व माणसांचा हक्क आहे हें ह्मणणें बरावर आहे. परंतु ज्या ठिकाणीं प्रजा आपण संपादन केलेल्यापैकीं कांहीं अंश मात्र राजास देते आणि बाकीचा पैसा आपल्या निर्वाहासाठीं आपल्यापाशीं ठेविते, त्या ठिकाणीं राजास दिलेला पैसा तो सर्व राजाचा नव्हे काय ? त्या पैशावर मग प्रजेचा काय हक्क राहतो ?

नारा०—बाबासाहेब ! फार उत्तम गोष्ट विचारिली. आपण प्रत्येक गोष्टीचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करूं लागलां हें पाहून मला फार आनंद वाटतो. आपल्या शंकेचें समाधान ऐका. जर कुटुंबाचीं माणसें एकाच ठिकाणीं व एकाच गांवीं असतील तर आपण ह्मणतां तसें होईल. परंतु कुटुंब फारच मोठें आहे अशी कल्पना करा. त्याचीं माणसें दाहावीस गांवीं राहात आहेत. हीं माणसें जें कांहीं मिळवितात त्यांतून त्यांना आपल्या निर्वाहास जें लागेल तेवढें ठेविलें पाहिजे, बाकी राहील तें जर त्यांनीं आपल्या वडिलांकडे पाठविलें तर तें सर्व त्या वडिलांचेंच

होतें काय ? नाहीं. वडिलांस फक्त आपल्या डामडौलाप्रमाणें राहण्यास जेवढा खर्च करणें योग्य होईल तेवढाच मात्र करण्याचा हक्क आहे. बाकी सर्व पैशाचा कवडीन-कवडीपर्यंत सुद्धां हिशेब लिहून ठेवणें या वडिलास जरूर आहे. या पैशाचा व्यय करणें झाल्यास तो कुटुंबाच्या हिताच्या गोष्टींतच झाला पाहिजे.

बाबा०– मीं समजलों.

नारा०– आपल्या देशांतील राजेरजवाड्यांनीं व संस्थानिकांनीं ही गोष्ट चांगली लक्षांत वागविली पाहिजे. बाबासाहेब ! आपणही लक्षांत ठेवा राजाच्या खजिन्यांत आलेला सर्व पैसा राजाचा अशी आपल्या देशांतील सर्व राजांची समजूत होऊन गेली आहे. त्या समजुतीमुळेंच आमच्या देशांतील एखाद्या राजास मुलगा झाला तर ब्राह्मणांचीं लक्षभोजनें अथवा सहस्रावधी रुपयांचीं अनुष्ठानें करणें, राजाच्या एखाद्या आवडत्या घोड्याचा पाय बरा करणारास शेंकडो रुपयांचें वंशपरंपरा इनाम देणें, किंवा राजाच्या शागीर्दानें पर्जन्याच्या दिवसांत राजास आंब्याचा रस तयार करून दिला तर त्यास हजारो रुपयांच्या उत्पन्नाचे "यावत् चंद्र दिवाकरौ" चालणारे गांव बक्षीस देणें, अशा अनेक हानिमूलक गोष्टी घडून येतात. आमच्या राजांस वाटतें कीं सर्व खजिन्यांतील भांडार माझें; सर्व प्रजा माझी. ही समजूत अगदीं समूळ नाहींशी झाली पाहिजे.

इंग्रज सरकारची या कामीं कशी समजूत आहे व रीति आहे ती पहा. आपल्या देशाच्या महत् पुण्याईनें असे शहाणे राज्यकर्ते आपल्या देशांत आले आहेत त्यांचें वळण

आमचे राजे ज्या दिवशीं घेतील त्या दिवशीं आपल्या या हतभाग्य देशाचा भाग्योदय होईल.

इतकें बोलणें होत आहे तों, ही गुरुशिष्यांची. राजवाड्याकडे परत येणारी जोडी त्या रविवार पेठेंतील सेनापतींच्या वाड्यासमोर आली. वाड्यांत सेनापति असले ह्मणजे नारायणराव व बाबासाहेब वाड्यांत जाऊन सेनापतीपाशीं कांहीं तरी बोलल्याशिवाय कधीं जात नसत. त्याप्रमाणें नारायणराव व बाबासाहेब वाड्याच्या चौकांत गेले. त्यावेळीं सेनापति हे सुंदरांपाशीं बुद्धिबळें खेळत. होते. दोन्ही घोडे चौकांत आलेले पाहतांच सुंदरा खेळ तसाच टाकून उठून घरांत गेली; परंतु जातेसमयीं बाबासाहेबाकडेस दृष्टी केल्याशिवाय गेली नाहीं. त्या दृष्टीचें वर्णन काय करावें? त्या दृष्टीच्या द्वारें जणुं काय आपल्या अंतरींच्या प्रेमाचा खजिना बाबासाहेबापुढें त्या तरुणीनें उघडलाच कीं काय; असें भासलें. त्या वेळीं बाबासाहेबांच्या डोळ्यांतून त्यांच्या घोड्याच्या आंगावर प्रेमाश्रूंची वृष्टि झाली. त्या बरोबर घोड्यानें किंचित् आपलें आंग कांपविलें आणि तो मोठ्यानें खिंकाळूं लागला.

घोडा असें कां करितो तें पाहण्यास सेनापति घोड्याजवळ आले व त्याच्या तोंडावरून हात फिरवीत आहेत तों तो घोडा चौकाच्या दाराकडे पाहून अधिकच खिंकाळूं लागला. इतक्यांत राजवाड्यांतील एक स्वार भरधांव घोडा टाकीत चौकांत आला आणि सर्वांस मुजरे करून मोठ्या लगबगीनें ह्मणाला कीं वाड्यांत लौकर चला. महाराजांची प्रकृति बिघडली आहे असें वाटतें.

तें ऐकतांच नारायणराव मनांत किंचित् चपापले.

सेनापतींनीं आपला घोडा तयार करण्यास मोतद्दारास सांगितलें. परंतु स्वार ह्मणाला कीं, " साहेब! इतका अवकाश नाहीं. आपल्यास तावडतोब घेऊन येण्यास राणीसाहेबांनीं सांगितलें आहे. दुसरा स्वार बाबासाहेबांस आणण्यासाठीं गेला आहे. परंतु बाबासाहेब येथेंच आहेत, तेव्हां सर्वांनीं लौकर निघावें. हुकूम होईल तर मी चालत धांवत येतों.

सेनापति लागलेच स्वाराच्या घोड्यावर बसले आणि ते तिघेजण भरधांव घोडे फेंकीत राजवाड्यांत आले.

## भाग १९.

सेनापति, नारायणराव व बाबासाहेब वाड्यांत येऊन पाहतात तों, वाड्यांतील सर्व नौकर व कामदार लोक जागच्या जागीं चित्रांसारिखे उभे आहेत. कोणी बोलत न्हते कीं चालत नव्हते. मग ते हळूच माडीवर दिवाणखान्यांत गेले. तेथेंही त्या छोटेखानी राज्यांतील नगरांत असणारे मुख्य मुख्य कामदार म्लानमुखें करून उगाच बसले होते.

सेना०—(हलक्या स्वरानें) काय कोतवालजी! आहे काय हें? महाराज कोठें आहेत?

कोत०—कांहीं समजत नाहीं, सेनापति साहेब! मी आतांच किंचित् आपल्यापुढें आलों. खालीं पाहऱ्यावर विचारतां इतकें मात्र समजलें कीं, महाराज साहेबांच्या बंगल्यावर गेले तेव्हां महाराजांची प्रकृति नेहमींप्रमाणें हुशार होती. परत आले, तेव्हां साहेब महाराजांबरोबर गाडींतून वाड्यांत आले. गाडींतून साहेब प्रथम उतरले आणि महाजांस उतरण्यास आपला हात देऊन नंतर महाराजांचा तसाच हातांत हात धरून माडीवर गेले.

सेना०—महाराज गाडींतून उतरले त्यावेळीं त्यांची प्रकृति कशी दिसली. त्याबद्दल पाहरेकरी काय ह्मणातात?

कोत०—ते ह्मणतात कीं, महाराजांचें तोंड अगदीं उतरलेलें दिसत होतें.

नारा०—महाराज व साहेब दिवाणखान्यांत आल्यावर काय झालें?

कोत०—तें मी आतांच दिवाणखान्यावरील पहारेक-

त्यास विचारिलें, ते म्हणतो कीं, महाराज व साहेब दिवाणखान्यांत आल्यावर साहेबानें मोठ्या ममतेनें महाराजांचा हात हालविला, महाराज कांहीं बोलले नाहींत आणि तसेच आंत गेले आणि साहेब खालीं उतरून बंगल्याकडे गेले.

सेना०—आतां महाराज कोठें आहेत?

कोत०—[illegible] खान्यांतून थेट आपल्या खासगी खोलींत गेले [illegible] ते अद्याप बाहेर आले नाहींत. आंत जाऊन दार लावून घेतलें. तें अद्याप उघडलें नाहीं. राणीसाहेब आंत गेल्या आहेत त्यांणीं सांगून ठेविलें आहे कीं, मी बोलावीपर्यंत कोणी खोलींत येऊं नये.

सेना०—मला वाटतें, सोंवळेकऱ्यास विचारिलें असतां कांहीं समजेल. त्यास इकडे आणवा बरें.

कोत०—हुकूम—कोण आहेरे बाहेर—महाराजांच्या सोंवळेकऱ्यास घेऊन ये जा.

हुजऱ्या—"आज्ञा" म्हणून लागलाच जातो आणि सोंवळेकऱ्यास घेऊन येतो.

सेना०—रामजी, असा इकडे ये बरें आणि विचारितों तें नीट सरळ सांग. पण हळू बोल. दररोजचा घसा काढूं नको. महाराजांस काय होत आहे?

राम०—साहेब, मी काय बरमदेव हाय. तें सांगू?

सेना०—अरे पण एवढें तरी सांगशील कीं नाहीं, महाराज आज दररोजच्या सारिखे जेवले होते काय?

राम०—हें काय विचारता साहेब? माझा सैंपाक कधीं तरीं बिघडला आहे? कोणी सांगाव बरें अमके दिवशीं अमुक बिघडलें. कोणाची माय व्याली पाहूं बरें असें म्हणायला!

सेना०—रामजी, तुझा देहस्वभाव वेड्या कधीं जायाचा नाहींना ? अरे ! आम्ही सर्व महाराजांच्या काळजींत असतां तूं आपली सैंपाकाची फुशारकी मारतोस हें चांगलें काय ?

राम०—छे ! छे ! सरकार, फुशारकी कशाची? महाराजांची प्रकृति बिघडलेली मला माहीत नाहीं. रात्रीच्या फराळासाठीं महाराजांनीं मला मसाल्याचा भात करण्यास सांगितलें होतें त्या गडबडींत मी होतों. खरेंच महाराजांची प्रकृति बिघडली आहे कीं काय? अरे भगवान् ! जळो ती माझी जीभ !

सेना०—तर मग आतां सांग, सकाळीं महाराज नेहमींप्रमाणें जेवले होते कीं नव्हते ?

राम०—(अमळ विचार करून) खरंच पुसाल तर आज महाराज नेहमींपेक्षां चांगले जेवले होते.

सेना०-नारायणरावजी, या रामजीशीं बोलून कांहीं उपयोगी नाहीं.

इतक्यांत एक हुजऱ्या येऊन महाराजांच्या खोलीचें दार अमळ उघडलें आहे असें सांगूं लागतो. तें ऐकतांच सेनापति व नारायणरावजी व बाबासाहेब महाराजांच्या खोलीकडेस हलक्या पावलानें जातात. दार किंचित् उघडलें होतें; तें वाऱ्यानें उघडलेलें असावें असें वाटतें. कारण ते तिघे हळूच आंत जाऊन पाहतात तों महाराज पलंगावर पडलेले आहेत व डोक्यावरून शालेचा फर्द घेतलेला आहे. पायाजवळ राणी दुढ्यावर डावा गाल टेंकून खालीं पहात बसली आहे.

तिघेही अगदीं हलक्या पावलांनीं महाराजांच्या पलंगा-

पाशीं गेले. त्या वेळीं महाराजांनीं मोठ्यानें सुसकारा टाकिला.

वाचकहो ! महाराजांनीं शालेचा फर्द पांघरून आपलें अंतरींचें दुःख जणूं काय जगापासून झांकलें होतें. तो फर्द एका आंगास सारून त्या वेळची महाराजांची स्थिति कशी होती ती तुह्मांस आह्मी दाखवूं इच्छित नाहीं.

---

## भाग २०.

रात्रीचे नऊ वाजतात, इतक्यांत महाराजांच्या खोलींतून "कोण बाहेर आहे?" असे हळूच शब्द होतात. ते ऐकतांच "मी आहें महाराज," "मी आहें महाराज," "मी आहें महाराज," अशीं बाहेरून दहाबारा उत्तरें होतात. नंतर नारायणरावजी व सेनापति लागलेच खोलींत जाऊन महाराजांस, "आतां कसें वाटतें?" ह्मणून विचारितात.

"आतां जरा बरें वाटतें." असें महाराज ह्मणतात.

महाराजांच्या चर्येंत व प्रकृतींत एकाएकीं इतका बदल कशानें झाला तें कोणासही त्यावेळीं समजलें नाहीं.

त्या रात्रीं महाराजांस जेवण अगदीं गेलें नाहीं. महाराज पुढें निजावयास गेले.

प्रातःकाळ झाला. महाराज नित्यप्रमाणें उठले नाहींत. नारायणरावजी महाराजांच्या प्रकृतीविषयीं राणीसाहेबांस विचारण्यास गेले, तेव्हां राणीसाहेबांची चर्या अगदीं उतरलेली व सुकलेली दृष्टीस पडली. त्यावरून महाराजांस व व राणीसाहेबांस रात्रीं झोंप आली नसावी असें त्यांणीं अनुमान केलें. महाराजांची प्रकृति कशी आहे असें विचारितां रात्रीं झोंप आली नसोन आतां फार ताप झाला आहे असें राणीसाहेब ह्मणाल्या.

पुढील वृत्तांत आमच्यानें सांग्रत लिहवत नाहीं, कारण तो वाचल्यापासून आमच्या वाचकांस अत्यंत दुःख मात्र होणार. आह्मांस वाटतें, अशा अत्यंत दुःखाचें वर्णन करण्यापेक्षां अशा दुःखकारक प्रसंगाचें अनुमान वाचकांच्या कल्पनेकडे सोंपवावें तें चांगलें. कारण अत्यंत दुःखाच्या

किंवा अत्यंत आनंदाच्या स्थितीचें खरोखर वर्णन करणें दुरापस्त आहे.

दुखण्यांत महाराज मोठे शांत व गंभीर होते. कधीं कोणावर रागावले नाहींत. व आपल्या दुखण्याचें खरें कारणही कोणापाशीं बोलले नाहींत. आह्मांस वाटतें, राणीपाशींही महाराज त्याबद्दल कांहीं बोलले नाहींत. बोलले असते तर राणीकडून नारायणरावजींस अगर बाबासाहेबांस कांहीं तरी समजतें. दुखणाईत पडल्यापासून पंधराव्याच दिवशीं महाराजांचा काळ झाला. महाराजांच्या दुखण्यांतच राणीसाहेबांची प्रकृति बिघडली होती. महाराजांच्या मागें राणीसाहेब आठ दिवस सुद्धां वांचल्या नाहींत. अशा अकस्मात् अनर्थामुळें सर्वांस जें दुःख झालें त्याचें वर्णन काय करावें?

ज्या पोशाखानें आपण साहेबाच्या बंगल्यांत गेलों होतों त्याच पोशाखानें आपल्यास स्मशानांत न्यावें असें महाराजांनीं पूर्व दिवशीं नारायणरावजी व सेनापति यांस सांगितलें होतें, ह्मणून सर्व तयारी झाल्यावर साहेबांच्या भेटीच्या दिवशीं घातलेला अंगरखा महाराजांच्या अंगांत घालण्यासाठीं आणिला. त्या अंगरख्याच्या खिशांत कांहीं असावें असें वाटल्यावरून नारायणरावजीनें हात घालून पाहिलें तों आंत एक कागद सांपडला. तो नारायणरावजीनें बाहेर काढून घेऊन एकीकडे जाऊन वाचून पाहिला. वाचून झाल्यावर नारायणरावजीनें डोळ्यांतून टप् टप् अश्रु गाळून मोठ्यानें सुसकारा टाकून ह्मटलें, "हर! हर! हे मृत्यो! असल्या थोर व खंबीर पुरुषाच्या हृदयाचें विदारण करण्याकरितां मनोभंगाखेरीज तुजजवळ दुसरें शस्त्र नव्हतें काय?"

महाराजांच्या अंगरख्याच्या खिशांत सांपडलेला कागद दत्तकप्रकरणीं लॉर्ड डालहौसी यांच्या सूचनेवरून बोर्ड आफ् डायरेक्टर्स यांणीं केलेला निकाल महाराजांस कळविण्यासाठीं मुंबई सरकारांतून रेसिडेन्ट साहेबांकडेस आला होता. त्यांतील मतलब मराठींत जमेस धरून लिहिलेला खलिता असून त्यांत हिंदुशास्त्रावरून बाबासाहेब दत्तक घेण्यास योग्य नसोन, ते योग्य असते तरी, औरस संतती खुंटली असतां दत्तक घेण्याची परवानगी देऊन राज्य चिरकाल चालवूं असा तहनाम्यांतील कलमाचा अर्थ होत नाहीं. सबब महाराजांस दत्तक घेण्याची परवानगी देण्यास मार्ग नाहीं असें लिहिलें होतें.

## भाग २ १

राजवाड्यांतील सूर्य अस्तास गेला. आतां आमचें राजवाड्यांत जाण्याचें कारण राहिलें नाहीं. आणि यदाकदाचित् जाण्याचें मनांत आणिलें तरी आतां वाड्यांत शिरकाव होणें फार दुरापस्त आहे. कारण तेथें आतां आमचे पूर्वीचे ओळखीचे, मराठेशाई पगडीचे, हातांत तरवार घेतलेले कोणी शिपाई नाहींत. त्यांच्या जागीं तेथें आतां तांबड्या डगल्याचे, काळ्या टोप्या घातलेले व निळ्या रंगाच्या पाटलुनी पेनलेले व बागनिटें चढविलेल्या बंदुका खांद्यावर टाकून फिरणारे खडे पाहऱ्याचे शिपाई आहेत. वाड्यांत कमिशनर साहेबाची कचेरी आहे. आंत परवानगीशिवाय दिवसास जाण्याचा हुकूम नाहीं. आतां तर रात्र झाली आहे. नऊ वाजून दहांचा सुमार आहे. आतां वाड्याच्या जवळ जरी गेलें, तरी तो पाहऱ्यावरील शिपाई "हुकम्डर" असें लागलेंच ओरडेल. व तेंही चमत्कारिक सुरावर. कोणी ह्मणतात कीं, असें ह्मटल्या बरोबर त्या मनुष्यानें "फिरंग" किंवा "गांववाला" असा उलट जबाब दिला तर बरें. नाहीं तर तो पाहरेवाला एकदम गोळी घालतो. ह्मणून अशा संकटाच्या जागीं आह्मीं आपल्या प्रिय वाचकांस नेऊं इच्छित नाहीं. बाबासाहेबांचा समाचार काय आहे तें जाणण्यास आमचे वाचक अतुर झाले असतील. तो समाचार आपल्यास बहुधा नारायणरावजीच्या बिराडीं गेलें असतां कळेल असें वाटतें. त्यास्तव आह्मीं आपल्या वाचकांस आमच्या बरोबर नारायणरावजीच्या बिऱ्हाडीं येण्याची विनंती करितों.

नारायणराव आपल्या खोलींत खुर्चीवर बसलेले आहेत. त्यांच्या पुढें एक सुंदर शिसवी लांकडाचें वाटोळें टेबल आहे. टेबलावर दोन तीन, पुस्तकें व एक विलोरी दऊत अशा जिनसा आहेत, नारायणरावजी या खोलींत एकटेच बसलेले नाहींत, त्यांच्या समोर दुसऱ्या खुर्चीवर सुमारें वीस वर्षांच्या उमरीचा एक तरुण गृहस्थ बसलेला आहे. त्याजजवळ नारायणरावजी बोलत आहेत. तें आपण ऐकूं या.

नारा०—बाबासाहेब, आपण असे दररोज दहा दहा, अकरा अकरा, बारा बारा वाजेपर्यंत विचार करीत जागत बसूं लागलां, तर आपली प्रकृति चांगली राहील असें आपल्यास वाटतें? आधींच आपली अवस्था कशी झाली आहे याचा विचार करा. मुखावरील पूर्वीचें सर्व तेज अगदीं लोपून गेलें आहे शरीर अगदीं कृश झालें आहे. इतकें कीं आतां आपण चांगलें ओळखायाला सुद्धां येत नाहीं.

बाबा०—गुरुजी! पण अगोदर मला सांगा, मी आपल्यास आतां गुरुजी ह्मणूं किंवा नको? आपल्यास "गुरुजी" ह्मणण्याचा मला आतां हक्क राहिला नाहीं असें वाटतें. कारण लहानपणींचे माझे सर्व हक्क आतां मला नाहींत असें मी पहातों. वस्त्रपात्र, चाकर माणसें, जीं मी आपलीं असें समजत होतों, तीं आतां माझीं नाहींत असें मला समजतें. पागेंतील पाहिजे त्या घोड्यावर मी बसत होतों. आतां मोतद्दार ह्मणतो, "आपल्यास घोडा देण्यास हुकूम नाहीं." ज्या वाड्यांत मी लहानपणापासून वाढलों—ज्यांत पाहिजे तेथें, चाहिल त्या वेळीं हिंडत होतों—फिरत होतों, पाहिजे तेथें बसत होतों—उठत होतों—त्या वाड्यांत आतां मला जाण्याची बंदी झाली आहे. माझी आवडती खोली,

जी मीं मोठ्या हौसेनें नानातऱ्हेच्या सुंदर व अमोलिक पदार्थांनीं सुशोभित केली होती, त्या खोलीस आतां कुलूप असून ती खोली आतां तुमची नाहीं असें मला ह्मणतात— इतकेंच नव्हे—तर मला समजूं लागल्यापासून ज्यांस मी "आईबाप" असें मानिलें व ज्यांनीं मला पुत्राप्रमाणें लेखिलें, त्यांस मी आतां आईबाप ह्मणूं नये असें झालें आहे—फार काय सांगूं एजंट साहेबांचा पन्नास रुपयाचा—तो शिरस्तेदार—रामभाऊ; जो मी वाड्यांत आला तर, माझ्या—माझ्या नाहीं, मी असत असें त्या-दिवाणखान्यांत येऊन मला भेटल्याविना जात नसे, व आला तर दूर बसून मोठ्या अदबीनें हात जोडून "काय सरकार, काय हुकूम आहे?" असें ह्मणत असे—तोच रामभाऊ त्यादिवशीं साहेबांकडून वाडा ताब्यांत घेण्यासाठीं आला तेव्हां पाहिला. तेव्हांचा त्याचा दरारा काय सांगूं? सर्व वाडा त्याणें हालवून दिला.—मी बसलों होतों त्या दिवाणखान्यांत तो आला तेव्हां त्याच्या पाठीमागून दहा पांच शिपाई धांवत होते. रामभाऊ तर, धांवत, हातांतील काठीनें "हें काय? पेटी. करा मोहर कुलुपावर. हें काय? टेबल. मारा चिठी त्यावर." असें जवळच्या कारकुनास ह्मणत, इकडे तिकडे हिंडत होता. परंतु माझ्या जवळ आला नाहीं किंवा मजकडेस त्याणें पाहिलें नाहीं. जणूं काय मी कोण ना कोठला? मग मींच होऊन त्यास हांक मारून ह्मटलें, "रामभाऊ, हें आहे काय?" तेव्हां त्याजबरोबरचा एक शिपाई, ज्यास पूर्वी मी कधीं उगाच कोठें नजरेच्या खुणेनें आपला जोडा आणण्यास सांगितलें तर मोठ्या आनंदानें तो आपल्या आंगावरच्या धोतरानें जोडा चांगला पुसून

माझ्या पायाजवळ आणून ठेवी, आणि मी पायांत घालण्यास सांगतों कीं काय याची मोठ्या उत्कंठेनें वाट पाहत जवळ उभा राही—जणूं काय माझ्या पादस्पर्शानें त्याचे पूर्वज उद्धरणारच कीं काय! तोच शिपुरडा आतां धट्टाईनें माझ्याजवळ येऊन माझ्या कानाशीं लागतो आणि ह्मणतो, "बाबासाहेब, त्यांस 'रामभाऊ' ह्मणण्याचे दिवस आतां गेले—त्यांस आतां 'भाऊसाहेब' ह्मणून हांक मारिली पाहिजे." ह्मणून विचारितों तें खरेंच सांगा, मी आपल्यास आतां गुरुजी ह्मणूं किंवा नको?

बाबासाहेबांचें असें आवेशाचें व अतिउद्विग्नतेचें भाषण ऐकून नारायणरावजीस फार वाईट वाटलें. आपल्या प्रिय शिष्यास मनोभंगजनित दुःख पराकाष्ठेचें झालें आहे त्याचें समाधान कसें करावें या विचारांत कांहीं वेळ ते कांहीं न बोलतां खालीं पहात राहिले. बाबासाहेबांस त्या आवेशाच्या भाषणानें बरेच श्रम झाले असें वाटतें. कारण बोलल्यानंतर ते खुर्चीवर मान टेंकून पडले.

कांहीं वेळ गेल्यानंतर—

नारा०—बाबासाहेब! ईश्वरानें आपल्यावर महत् संकट आणिलें आहे, हें मी कबूल करितों. परंतु बाबासाहेब! या जगाची रहाटी आपण पाहिली नाहीं का? कीं कसाही निबिड अंधःकार पडला तरी कांहीं वेळानें खचित सर्व पृथ्वी सूर्याच्या तेजानें पूर्ववत् सुप्रकाशित होत असते. मला वाटतें, या जगांत असें जबर दुःखच नाहीं कीं ज्याचा परिहार विचार केला असतां मनुष्याच्यानें होणार नाहीं.

बाबा०—गुरुजी! माझ्या या स्थितींत विचार करून माझ्या दुःखाचा परिहार होईल असें मला वाटत नाहीं.

ना०—बाबासाहेब, असें आपण समजूं नये. प्रत्येक विपत्तींत आपण आपल्यास दुःख काय झालें आहे, याचा विचार न करितां आपल्यापाशीं सुख किती राहिलें आहे त्याचा विचार केला पाहिजे. आणि आपल्यापाशीं राहिलेलें सुख तेंही जर ईश्वरानें नेलें असतें तर आपण आहों त्यापेक्षां किती अधिक विपत्तींत असतों हें मनांत आणून प्राप्त झालेल्या विपत्तीचें कांहीं दुःख न मानितां जवळ राहिलेल्या सुखाबद्दल ईश्वराचे आभार मानावे. सारांश, बाबासाहेब! आपलें गेलें काय हें मनांत न आणितां आपल्यापाशीं राहिलें काय तें पहावें.

बाबा०— तें मी पाहिलें परंतु त्यापासून, गुरुजी! माझें फारसें समाधान होत नाहीं.—(खुर्चीवरून उठून टेबलाखालीं एक लहानशी लांकडाची पेटी होती ती वर घेऊन टेबलावर ठेवितात) गुरुजी! माझें सर्व गेलें—संपत्ति गेली, आईबाप गेले, सर्व मनोरथ गेले, सर्व आशा नाहींशी झाली,—माझें काय बरें नाहीं गेलें? माझी ह्मणून ह्मणण्यास एक काय ती ही पेटी मात्र राहिली आहे. वाड्याची जप्ती होऊन सर्व जिनसांची एजंट साहेबामार्फत झडती झाली, त्यावेळीं माडीवर एका खोलींत ही सांपडली. तिजवर माझ्या नांवाची चिठी होती ह्मणून ती मजसमक्ष उघडून तपासून त्या दिवशीं मला दिली. हींत पहा, (पेटी उघडून आंतील सर्व जिनसा बाहेर काढितात) हें एक जुनें फाटकें लुगडें, जें कोणी दोन आण्यांसही घेणार नाहीं. हीं दोन मळकट आंगडीं व ह्या दोन टोप्या व ह्या कागदाच्या पुडींत ही एक तांब्याची ताईत. ह्या जिनसा मजपाशीं राहिल्या ह्मणून मी आनंदी असावें असें

तुमच्यानें ह्मणवेल काय? मी तर ह्या फटकुरांची किंमत (लुगडें व तीं आंगडीं व टोप्या हातांत घेऊन मोठ्या त्वेषानें फाडून त्यांच्या चिंध्या करीत ) किती समजतों पहा. झालें आतां? आतां मजजवळ काय राहिलें ? हीं आंगावरचीं वस्त्रें एवढींच ना? या राहिल्या सुखाबद्दल मी ईश्वराचे आभार मानूं काय? सांगा.

नारा०—बाबासाहेब! हें काय? अहो दुःखास आरंभ होऊन एक महिना सुद्धां पुरा झाला नाहीं इतक्यांत अठरा वर्षांचें अत्युत्तम सुख अगदीं विसरून गेलां काय? मनुष्याचा मोठा चमत्कार आहे, कीं कितीही वर्षे सुखाचीं गेलीं तरी त्याचा विशेष आनंद त्याच्या मनांत न राहतां, त्या सुखांत जर कां एकादा दिवस दुःखाचा आला तर तें दुःख त्यास अगदीं दुःसह होतें. आणि तो संतप्त होऊन जातो; मागील सुखाबद्दल कृतज्ञबुद्धि असावी ती किंचित् मात्रही त्यास राहत नाहीं; कदाचित् क्षणिक दुःखामुळें कृतघ्न होऊन ईश्वरास तो दोषही देऊं लागतो. हें एक मोठें नवल होय कीं, तो त्या एका दिवसाच्या दुःखावरून पुढें जन्मपर्यंतही असेंच दुःख होणार अशी अज्ञानमूलक खोटी कल्पना करून खरोखरी जें दुःख असतें त्याचे शतपट तो तें विनाकारण वाढवितो; परंतु पुढें येणारे क्षणांत आपल्यास सुख होईल किंवा दुःखच राहील हें कोण बरें सांगूं शकेल? ह्मणून मी ह्मणतों कीं, बाबासाहेब, येणाऱ्या वेळांत दुःखच राहील किंवा सुख होईल याचा कांहींच विचार न करितां चालू क्षणांतीलच दुःखाचा जर विचार केला तर तें कितीसें असतें बरें?

बाबा०—गुरुजी! मी कृतघ्न होत नाहीं. परंतु दुःख

सहन होत नाहीं त्याला काय करूं? आपण ह्मणतां कीं अठरा वर्षें सुखाचीं गेलीं असून एक महिना हीं दुःखाचा सहन होत नाहीं काय? पण गुरुजी! अठरा वर्षें अन्न मिळालें ह्मणून एक महिना उपास निवेल काय? आपण सांगा बरें.

नारा०—बाबासाहेब! अन्नाची गोष्ट सुखास मुळींच लागत नाहीं. कारण अन्न ही एक नियमित उपभोग्य वस्तु आहे. जसें अन्न शरीराच्या पोषणास अवश्य आहे हें आपल्यास समजतें व तें कसें असावें हें आपल्यास ठरवितां येतें तशी सुखाची गोष्ट नाहीं. सुख ह्मणजे काय पदार्थ आहे हें कोणाच्यानें सांगवत नाहीं. अमुक गोष्टी जवळ असल्या ह्मणजे सुख होईलच असें कोणाच्यानें ह्मणवणार नाहीं. जी गोष्ट एकास सुखकारकशी वाटते तीच दुसऱ्यास तशी सुख देणारी होईल असें खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. सुख किंवा दुःख हा मनाचा धर्म आहे. ह्मणून सुख होणें अथवा दुःख होणें हें मनाच्या स्थितीवर अवलंबून आहे. मनानें मानिलें तें सुख—मानिलें तें दुःख असें आहे. बाबासाहेब! या मनासारिखा, या सर्व जगतांत दुसरा पदार्थ नाहीं. मन हें अतिनाजूक घड्याळापेक्षांही पराकाष्ठेचें नाजूक आहे. तें कशानें बिघडेल व बिघडलें असतां काय केल्यानें तें दुरुस्त होईल तें त्या मनाच्या कारागिरालाच माहीत. मनुष्यानें तेथें हातच टेंकले पाहिजेत. बाबासाहेब! या मनाचा असा चमत्कार आहे कीं, जी गोष्ट एकाच्या मनास सुख देणारी अशी वाटते तीच दुसऱ्यास दुःख देणारी भासते. सारांश, सुखदुःख हें सर्व आपल्या मनावर आहे. अन्न मिळालें नसतां अन्न

मिळालें असी कल्पना करून कधीं पोट भरणार नाहीं. परंतु सुखाची कल्पना करून मनास आनंद करून घेतां येईल. ह्मणून, बाबासाहेब! अन्नाचा दृष्टांत सुखास लागत नाहीं.

बाबा०—गुरुजी! सुख देणाऱ्या सर्व पदार्थांस जर मी मुकलों आहें तर मी आतां सुखाची कल्पना करून मनास आनंद कोणत्या प्रकारें बरें करून घेऊं?

नारा०—बाबासाहेब! असें उदास होऊन काय फळ आहे? तुह्मांपाशीं सुख मानण्यास आज कांहींच नाहीं काय?

बाबा०—नाहीं कां, गुरुजी? पुष्कळ आहे. ही तांब्याची ताईत—बिकली असतां एक पैसा खचित येईल. ही पेटी—हे कपडे—शिवाय एजंटसाहेब दरमहा पन्नास रुपायांची नेमणूक करून देत आहेत. आणखी काय पाहिजे!

नारा०—बाबासाहेब! तुह्मीं कोणत्या अर्थानें बोलतां तें मी समजतों. या शिवाय अतिसुखकारक, अमोल्य असें तुह्मांपाशीं कांहीं नाहीं ना?

बाबा०—आपण सांगा बरें काय आहे तें? मला तर कांहीं दिसत नाहीं.

नारा०—तुमचें सुशिक्षीत मन—तुह्मीं संपादन केलेली विद्या. ही विद्या तुमच्या गेलेल्या सर्वधना पेक्षांही अधिक मौल्यवान—गेलेल्या सर्व सुखांपेक्षां ही अधिक सुखकारक आहे.

बाबा०—( डोळे पाण्यानें भरून ) गुरुजी! मला आतां विद्या काय करायाची आहे! मला तर वाटतें कीं, माझी विद्या झालेली नसती तर मी आज सुखी असतों. विद्याहीन

मनुष्याची ज्ञानदृष्टि आकुंचित असते. त्याची दृष्टी फार दूरवर जात नाहीं. ह्मणून तो थोड्या गोष्टींत संतुष्ट असतो. मला विद्या असल्यामुळें माझी महत्वाकांक्षा वाढली आहे. आणि ती तर आतां पूर्ण होण्यास मार्ग नाहीं. माझ्या विद्येप्रमाणें माझी स्थिति नाहीं तर ती विद्या उलटी माझ्या दुःखास आतां कारण होणार नाहीं काय?

नारा०—बाबासाहेब! विद्या नसती तर आज तुह्मीं सुखी असतां ना? ह्मणजे आपलें ह्मणणें कीं गरीब स्थितींत विद्या नको. विद्या असली तर मनुष्यास मोठी स्थिति पाहिजे. बाबासाहेब! आपण असें ह्मणतां यावरून विद्येचें खरें महत्व आपल्यास अद्याप कळून आलें नाहीं असें मला ह्मटलें पाहिजे. मनुष्य कोणत्याही स्थितींत असो. त्यास विद्या ह्मणजे ज्ञान अवश्य पाहिजे. तें त्यास नसेल तर त्याच्यांत आणि पशूंत विशेष अंतर रहाणार नाहीं. मीं आपल्यास अनेक वेळा पूर्वीं सांगितलें आहेच—आणखी आतां एक वेळा पुन्हा सांगतों—कीं, नानाप्रकारचे हिंस्रपशू ज्यांत जागजागीं आहेत अशा आरण्यांतून एकटें चाललें असतां जशी आपल्या रक्षणार्थ उत्तम पाणीदार तरवार जवळ असण्याची अवश्यकता आहे, ती नसेल तर वारंवार प्राणसंकटाची भीति,—किंवा निबिड अंधकार असून जागजागीं मोठमोठाले खांचखळगे आहेत अशा जागेंतून चाललें असतां जशी उजेडाची अवश्यकता—तो नसेल तर ठेंच लागून पडण्याची धास्ती—त्याचप्रमाणें, बाबासाहेब! या जगांतील प्रवास करितेसमयीं आपल्यापाशीं ज्ञान असण्याची अवश्यकता आहे. जशी ती तरवार किंवा तो उजेड सर्वांस पाहिजे—मग तो पायीं चा-

लणारा असो, किंवा घोड्यावर बसलेला असो, किंवा पालखींत असो, त्याचप्रमाणें मनुष्य कोणत्याही स्थितींत असो, त्यास ज्ञान पाहिजे. शरीरास जशी आरोग्याची जरूरी—तें नसेल तर जसा मनुष्य अगदीं निरूपयोगी, तद्वतच मनास ज्ञानाची जरूरी आहे. मनास ज्ञान नसेल तर तें मन व्यर्थ होय. मनुष्यास सदसत्‌विचार करणारें मन नसतें तर तो दोन पायांचा अति दुबळ असा पशूच असता. ह्मणूनच विद्याविरहित मनुष्याची गणना पशूंत करीत असतात.

हें ऐकून बाबासाहेबांच्या मनाचें थोडेंसें समाधान झालें असें दिसतें. कारण ते आतां पूर्वीच्या उदासीन व बेपर्वाईच्या बुद्धीनें बोलण्याची तऱ्हा सोडून ज्ञानेच्छु अंतःकरणानें बोलूं लागतात.

बाबा०—गुरुजी! विद्येचें महत्व मी समजतों. परंतु तिजपासून मी हल्लींच्या दुःखाचा परिहार कसा करावा? तें सांगा. मी तर या दुःखानें अगदीं वेडा होऊन गेलों आहें. एकटा विचार करीत बसलों ह्मणजे तर मन एखादे समयीं इतकें भडकून जातें कीं समयीं देहाचा नाश करावा असें वाटतें. गुरुजी! माझी स्थिति आपण पूर्णपणें जाणत आहां.

नारा०—बाबासाहेब! आपण समाधान करुन घेण्याची इच्छा दर्शविली आतां मी आपलें समाधान करितों. मी आपल्यास प्रसंगानुसार सांगितलें आहे कीं, या जगांत सतत राहणारें सुख मुळींच नाहीं. मनुष्यावर नेहमीं कांहीं तरी दुःख, कांहीं तरी संकट, अरिष्ट, अथवा कांहीं तरी अडचण येतेच. ही या जगाची बाबासाहेब! रहाटीच आहे.

बाबासा०—अशा प्रसंगीं मनुष्यांनीं काय करावें व कसें वागावें?

नारा०—तेंच सांगतों ऐका. या जगांत अनेक प्रकारचीं दुःखें व संकटें आहेत तीं जगांतील आपली वस्ती क्षणिक आहे असें आपल्या मनांत रहाण्यासाठीं ईश्वरानें बहुधा ठेविलीं आहेत. अशा या जगांत आपण असतेवेळीं, आपल्यापाशीं विद्या असणें हें फारच अवश्य आहे. कारण कीं, विद्येच्या योगानें आपल्यास कोणत्याही स्थितींत रहाण्यास सामर्थ्य येतें. विद्या आंगांत असली तर, आपल्यास कोणतीही स्थिति प्राप्त होवो—आपल्यावर कोणतेंही संकट येवो—आपण त्या स्थितीस अथवा त्या संकटास योग्य तीच वर्तणूक करूं. हाच कायमचा विद्येचा मोठा उपयोग होय. विद्येच्या योगानें आपल्यास समजतें कीं, ईश्वरानें ज्या स्थितींत आपल्यास ठेविलें आहे त्या स्थितींत आपण संतोषानें राहून योग्य रीतीनें वागलें पाहिजे. आणि तसें वागलें ह्मणजे जगाच्या कर्त्यानें आपल्याकडे सोंपविलेली कामगिरी योग्य रीतीनें बजाविल्यासारिखें आहे. आपल्यास दुःख प्राप्त झालें ह्मणजे प्रथम हें पहावें कीं, तें दुःख परिहार्य किंवा अपरिहार्य आहे. परिहार्य असेल तर होईल तितका यत्न करून तें दूर करण्यास झटणें हें आपलें कर्तव्य आहे. परंतु तें दुःख अपरिहार्य असेल तर त्याबद्दल मनाचें विचारानें शांतवन केलें पाहिजे. आणि प्राप्त झालेलें दुःख हें आपल्याकडून झालेल्या कांहीं अपराधाच्या शासनाबद्दल अथवा अखेरीस आपल्या हिताबद्दल आहे असें मानावें. आपल्याकडून कोणता अपराध झाला आहे अ-

था॥ आपलें हित कशांत आहे हें आपल्या अल्पमतीस कळत नसतें. परंतु जगदीश परम न्यायी, परम दयाळु व सर्वोत्तम आहे असें मनांत पूर्णपणें वागवून त्या जगदीशासमोर लीन होऊन त्याणें इतःपेक्षां जास्त दुःखांत लोटलें नाहीं ह्मणून त्याचे आभार मानावे. कारण जास्त दुःखांत लोटण्याचें त्याणें मनांत आणिलें असतें तर त्यास काय कठीण होतें? बाबासाहेब! तो प्रभु सर्वशक्तिमान आहे. तो देऊं लागला तर काय देणार नाहीं? आपल्यावर त्याची दृष्टी होती तेव्हां पृथ्वीपतीस सुद्धां देतां आलें नसतें तें त्याणें आपल्यास दिलें. आपल्यास ऐश्वर्य दिलें—विद्या दिली—एका उत्तम सुंदरीचें प्रेम दिलें.—आईबाप दिले. अशा प्रकारें तो प्रभु आपल्या अनंत हस्तांनीं एक दिवस नव्हे—दोन दिवस नव्हे—सतत अठरा वर्षें एकसारखी आल्यावर सुखाची पाखर झाडीत असतां आपण कधीं त्याचे आभार मानिले काय? कधीं आनंद दाखविला काय? कदाचित् आपल्यास त्याचें स्मरणही झालें नसेल. कारण सुखांत ईश्वराचा बहुधा विसर पडत असतो.

(बाबासाहेबांच्या डोळ्यांतून या वेळीं टप् टप् अश्रु पडतात.)

**नारा०**—बाबासाहेब! खरेंच सांगा एक दिवस तरी त्या प्रभूचें अंतःकरणपूर्वक आपल्यास स्मरण झालें होतें? तो प्रभु कोपला तर त्यास आवरण्यास कोण समर्थ आहे! जितक्या हातांनीं तो देत होता तितक्या हातांनीं तो नेऊं लागला तर तो काय बरें नेणार नाहीं? अशा वेळीं त्याणें आपल्यापाशीं जें ठेविलें ती त्याची मोठी कृपाच आहे असें समजून त्यास अनन्यभावें लीन अंतःकरणानें

शरण जावें याखेरीज दुसरा उपाय नाहीं. कारण या जगांतील त्रिविधताप हरण करण्यास त्याशिवाय अन्य कोणी समर्थ नाहीं.

हें बोलणें संपत आहे तों बाबासाहेब उठून खिडकीकडेस जातात. आणि आकाशाकडे डोळे करून दोन्ही हात जोडून उभे राहतात.

बाबासाहेब, एकदम उठून काय करीत आहेत तें पाहण्यासाठीं नारायणराव बाबासाहेबांकडेस पहातात, तों बाबासाहेबानीं खिडकीकडेस तोंड केलें आहे असें त्यांस दिसलें. खिडकी समोर चंद्र आला होता. त्याचे स्वच्छ किरण बाबासाहेबांच्या तोंडावर पडलें होतें. त्या किरणांनीं बाबासाहेबांचे डोळे मिटलेले असून त्यांच्या गालावरून अश्रुधारा चालल्या आहेत असें दिसलें. तें पाहतांच नारायणरावजी एकदम आपली दृष्टी माघारें घेऊन खालीं पहात राहिले.

वाचकहो, या संसारांतील नानाविध दुःखांनीं पीडित झालेला मनुष्य जेव्हां आपल्या प्रभूस शरण जाऊन आपल्या दुःखांचीं गाऱ्हाणीं करण्यासाठीं त्या समोर उभा रहातो आणि त्याची करुणा भाकितो तेव्हां त्याच्या तोंडाकडेस कोण पाहील?

बाबासाहेब खिडकींत उभे राहून आपल्या प्रभूस काय बोलले तें आम्हांस माहीत नाहीं. सुमारें अर्धघटका स्तब्ध उभे होते. मग खुर्चीवर येऊन बसले. नंतर—

बाबा०—गुरुजी, मी तुमचे उपकार किती म्हणून स्मरूं? असो. आतां निजायास जाऊं चला. आज मला झोंप येईल असें वाटतें.

---

## भाग २२.

नारायणरावजी सकाळीं उठून खोलीबाहेर पाय ठेवितांच पहिली हाक गोविंदभटजीस मारतातः—"गोविंदा!"

गोविंदभट—( स्वैंपाकघरांतूनच ) रावसाहेब!

नारायणराव— बाबासाहेब निजून उठले?

गोविंद०—( स्वैंपाकघरांतूनच ) पोतेरें घांसतों आहें रावसाहेब.

नारा०—( आपल्याशीं ) मोठा बेटा चाहाटळ. ( मोठ्यानें ) अरे, पण बाबासाहेब उठले काय?

गोविंद०— हात धुऊन आलों रावसाहेब.

नारा०—( आपल्याशींच ) हा बेटा मजजवळ ह्मणूनच इतके दिवस टिकला आहे. मीच ह्मणून हें सर्व सहन करितों. दुसरासा असता तर बेल्यास कधींच घालवून देता. पहिल्या विचारण्याबरोबर कधीं नीट जबाब देईल, असें कालत्रयीं घडावयाचें नाहीं. आपण कितीही जरी घाईंत असलों तरी या बेल्याच्या तब्बेतीस येईल तेव्हांच तो बोलणार.

इतक्यांत गोविंदभटजी लहानशा फडक्यानें हात पुशीत पुशीत स्वैंपाकघरांतून हळु हळु बाहेर येतात. ही हळु पावलानें येणारी मूर्ति आपले जुने मित्र गोविंद भटजी यांची आहे असें ओळखण्यास आमच्या प्रिय वाचकांस, नारायणरावजींनीं त्यास त्याच्या नांवानें हांक मारिली नसती तर, किंचित् अवघड पडलें असतें. कारण बारा वर्षांपूर्वी घांट चढतांना पाहिलेले गोविंदभटजी आणि आतां हळु हळु पावलानें चालत येणारे गोविंदभटजी यांत बरेंच अंतर पडलें आहे. पूर्वी पाहिले होते त्यापेक्षां आतां गोविंदभटजीचें शरीर—विशेषेंकरून पोट बरेंच मोठें झालें आहे. तें,

नेसलेला पंचा बेंबीखालीं चार बोटें असल्यामुळें, अगदीं स्पष्ट दिसत आहे. पोट मोठें झालें आहे तरी शरीरांत वाताचा लवलेशही शिरलेला दिसत नाहीं. कारण पोटाला कोठेंहीं "वळकट्या" पडलेल्या नसून दंड-ऐटदार व भरलेले दिसत आहेत. पोटाला मोठेपणा बहुधा तूप व साखर या मिश्रित पदार्थांच्या अतिसेवनानें आला असावा असें आमचें अनुमान आहे. हळु चालणें ही गोविंदरावजींची नेहमींचीच सवई होती.

गोविंदभटजी नारायणरावजीसमोर येऊन व हातांतील मळकट फडका खांद्यावर टाकून

"काय विचारलें रावसाहेब?"

ना०—गोविंदा, एका शब्दाचें काम तेथें एक घटका पाहिजे काय? केव्हां केव्हांचा मी बाबासाहेब उठले किंवा नाहींत तें विचारीत असतां त्याचा जबाब लागलाच द्यावयाचा टाकून हजार बयादी सांगत आहेस. गोविंदा, तुला खचीत सांगतों मजजवळ म्हणूनच तूं इतके दिवस टिकलास बरें!

गोविं०—तुमची, रावसाहेब; मोठी शर्थ आहे. मनुष्याला बोलायाला चालायाला कांहीं अवकाश सुद्धां नसावा ना?

नारा०—(रागानें) चूप रहा-बोलूं नको फार. (कांहीं वेळानें) जा आणि बाबासाहेब उठले किंवा नाहींत तें पाहून ये.

गोविंदभट घरांत जाऊन परत येतो. नारायणरावजी त्याच्या तोंडाकडे पाहतात. गोविंदभटजी कांहीं न बोलतां खांद्यावरील फडका हातांत घेऊन तो उगाच झटकीत उभा राहतो.

नारा०—गोंद्या! बोलायास तोंड आहे कीं नाहीं?

गोविं०—आहे, रावसाहेब.

नारा०— मग?

गोविं०—मग काय?

नारा०—अरे लवंडिच्या, बाबासाहेब निजून उठले किं काय तें बोलशील किं नाहीं? खचित सांगतों गोविंदा, तूं महान् साधूसही राग आणशील. खरोखरीच.

गोविं०—रावसाहेब, आतां माझा नाइलाज आहे. तुम्हीच ह्मणतां चूप राहा. बोलूं नको. आणि आतां मी बोलत नाहीं ह्मणून रागावता, याचा अर्थ काय? असली तब्येत आपल्याच्यानें निघणें कठीण. खरेंच सांगतों.

नारा०—( रागामुळें क्षणभर स्वस्थ राहून ) गोंद्या, हा फाजीलपणा बरें. लक्षांत ठेव हा फार फाजीलपणा आहे. खचीत तूं अगदीं शिरजोर झालास. पण त्यांत तुझा अपराध नाहीं. तो माझाच अपराध. प्रथमपासूनच मी कडकपणा ठेविला असता आणि तुझ्या पाठीस चाबकाची ओळख करून दिली असती तर इतकी बयाद तूं आज खचितच न लावितास. तुझ्याकडेस याचा कांहीं बोल नाहीं. मीच वेडा. तुझ्याशीं इतक्या सौम्य रीतीनें व सलगीनें कां बरें वागावें? त्याबद्दल मला आतां योग्य बक्षिस मिळत आहे.

गोविं०—( किंचित् वाईट वाटलेंसें दाखऊन ) रावसाहेब, अपराध क्षमा करा. ( आपल्याशीं हळूच ) कोणाची होऊं नये बायको किं कोणाचा होऊं नये चाकर. ( मोठ्यानें ) बाबासाहेब आज मोठ्या सकाळीं उठून कपडे करून बाहेर गेले.

नारा०—( अमळ चकित होऊन ) अरे, खरेंच किं काय? अरे प्रथमच असें ह्मणायास तुला तोंड नव्हतें?

गोविं०—बाबासाहेब, पांच वाजण्याच्या पूर्वींच खोलींतून बाहेर आले. आणि लगबगीनें तोंड धुऊन कपडे करून बाहेर गेले.

नारा०—कोठेंजाणार. केव्हां परत येणार. हें कांहीं बोलले?

गोविं०—कांहीं बोलले नाहींत. तुह्मी उठला नाहीं असें सांगितल्यावरून त्यांनीं एक चिटी लिहून ती तुह्मी उठल्याबरोबर तुह्मांस द्यावी ह्मणून मजजवळ दिली आणि ते निघून गेले.

नारा०—( राग सांवरून ) ती चिठी कोठें आहे

गोविं०—आणितों.

गोविंद भट चिटी आणण्यास घरांत जातो. नारायणरावजी, गोविंदभट हळु पावलानें जात आहे त्याकडेस पाहत ( आपल्याशीं ) " असा मूर्खाचा शिरोमणी कधीं कोणी पाहिला नसेल. बेल्याला 'त्वरा' हा शब्द माहीतच नाहीं. त्याच्या शब्दकोशांत तो शब्दच नाहीं असें दिसतें. त्याला पाहिजे तितकें बोला, चाला, विनवा, त्याजकडून त्वरा ह्मणून कशी ती व्हावयाची नाहीं. केवळ बेटा अजगरवृत्ति आहे. पहा, त्याला इतकें बोललों तरी त्याच्या कांहीं गांवीं आहे ? आंगांत लबाडी नाहीं एवढा मात्र काय तो वाखाणण्यासारिखा गुण आहे. ह्मणून काय त्यानें पाहिजे तो फाजीलपणा करावा काय? अद्याप लवंडीचा काय पाहत आहे कोण जाणे. (मोठ्यानें) गोंद्या—

गोविं०—( घरांतून ) ओ. रावसाहेब चिठी शोधतों आहें. ( आपल्याशीं ) मोठी बा रावसाहेबांची घाई ! चिठी ती काय आणि तिचेबद्दल घाई ती किती. रावसाहेबांची घाई कांहीं वेडी न वांकडीच पाहिलीती. करावयाची तेथें

करावयाची नाहीं. आणि नाहीं करावयाची तेथें करावयाची. टपालांतील कागद आले किं ठेवा पुढ्यांतील फराळांचें एके अंगास. वाचा प्रथम कागद. टपाल येण्यास जरा वेळ लागला किं पाठवा मनुष्य टपाल हपिसांत. असली कसली बेटी कागदाकारितां घाई ? कागद कां खाण्याचे पदार्थ आहेत असें रावसाहेबांस वाटतें ? भगवान जाणें काय असेल तें. ( मोठ्यानें ) रावसाहेब, चिठी सांपडली. ही पाहा आणली. ( चिठी घेऊन येतो ) ही घ्यावी.

रावसाहेब चिठी घेऊन वाचतात. आणि वाचीत असतां आपल्याशींच बोलतात:—

" ' गुरुजी ' खासें. रात्रीं गुरुजी ह्मणण्यापूर्वीं काय आवेश आला होता. ' रात्रीं झोंप बरी आली '. यावयाचीच. जगदीशास दुःखांत शरण गेलें किं दुःखाचें परिमार्जन झालेंच असें समजावें. " जरूरीच्या कामाकरितां कमिशनर साहेबांच्या बंगल्यांत जात आहें ' इतकें जरूरीचें काम? मला कांहींच न सांगतां? काय असेल तें असो. ' नऊ वाजण्याच्या आंत परत येईन. नऊ वाजेपर्यंत बाहेर कोठें जाऊन येणें असेल तर जाऊन यावें '. ठीक आहे. मी आतां तोंड धुऊन सेनापतीकडून जाऊन येतों ". ( मोठ्यानें ) गोविंदा ! पाणी घेऊन ये पाहूं. मी तोंड धुतों, इतक्यांत चहा होऊं दे. पण गोंदा, अगोदर सांगतों तें ऐक. तूं पहा आज मोठा बेवकुबपणा केला बरें.

गोविं०—तो कसा, रावसाहेब.

नारा०—अरे कोणीं कांहीं कागद किंवा पत्र देऊन ठेविलें तर तें लागलेंच आणून दिलें पाहिजे.

गोविं०—पण रावसाहेब, बाबासाहेबांनीं देऊन ठेवलेली लहान चिठी होती.

नारा०—अरे मूर्खा, लहान चिठी असली ह्मणून काय झालें? चिठी काय सामान्य वस्तु आहे असें तूं समजतोस? अरे, वीटभर चिठींत दोनच ओळी अमूल्य गोष्टी संबंधीं त्या एखाद्या मोठ्या महत्वाच्या कामांबद्दल असतील. ती चिठी वेळच्या काळ वाचून पाहिली नाहीं तर वेळेस अशी एकादी अनिर्वाच्य नुकसानी होईल कीं ती पुढें कशानेंही भरून येऊं शकणार नाहीं.

गोविं०—रावसाहेब! अशा जरूरीच्या कधीं चिठ्या आल्या तर मी त्या वेळींच आपल्यापाशीं लागल्याच देत असतों. कधीं बरें चुकलों आहें? आणि कधीं बरें चिठी दिलेली नाहीं? नाहीं ह्मणायाला त्यादिवशीं मात्र जरा गोष्ट घसरणार होती; पण थोडक्यांत सांवरली. त्या दिवशीं ती सेनापति साहेबांकडील जेवणाची चिठी आली होती, ती आपण बाहेरून येतांच द्यावयाची ती कशी विसरून राहिली कोण जाणे. आपण पानावर बसणार इतक्यांत मला त्या चिठीची आठवण झाली ह्मणून बरें झालें. नाहीं तर त्या दिवशीं मोठी नुकसानी झाली असती ती पुढें कशानेंही भरून येऊं शकली नसती. पण ही बाबासाहेबांची चिठी मीं वाचली होती; रावसाहेब.

नारा०—(हंसूं आंवरून) गोंद्या, तूं अगदीं पशू आहेस वेड्या. तुझी सुखदुःखाची, नफानुकसानाची कल्पना जेवणाच्या गोष्टींच्या पलिकडे जातच नाहीं ना? अरे, माझ्या अंतःकरणांत लहानशा चिठीचें महत्व जणूं मोठ्या खिळ्यानेंच खोदलेलें काय असें ठसलें आहे. मी मुंबईंत असतां तेथें माझा एक अल्पवयी परम मित्र होता. त्यावर

कांहीं अतर्क्य ईश्वरी क्षोभानें थोड्या काळांत एकदम अनेक दु:सह संकटें येऊन पडलीं. त्यामुळें तो अगदीं गांगरून गेला. संकटसमयीं धैर्य धरावें हें त्या अल्पवयास कोठून समजणार? एके दिवशीं त्याच्या मनास इतका संताप झाला कीं त्यास आपल्या प्रिय देहाचा कंटाळा येऊन त्याणें दु:खाच्या आवेशांत त्या देहाचा नाश करण्याचें मनांत आणिलें. आणि मला एक चिठी लिहून ती आपल्या लहानग्या भावापाशीं दिली; आणि आपण रागाच्या सपाट्यांत मनांत आणलेलें कार्य उरकण्यास घरांतून निघून गेला. तो लहान मुलगा ती चिठी मजकडेस घेऊन आला आणि सांगूं लागला कीं "ही दादानें दिली आहे." मी त्यावेळीं कांहीं कामांत होतों. मी त्यास विचारिलें, "तुझे दादा कोठें आहेत?" तें मनोहर बाळ ह्मणालें, "दादा बाहेर गेला." मीं ह्मटलें, "बरें आहे, चिठी टेबलावर ठेव." आणि मी आपलें काम करूं लागलों. मनांत ह्मटलें, 'चिठींत काय असावयाचें आहे? वाचूं सावकाश.' कांहीं वेळानें टेबलाजवळ जाऊन चिठी घेऊन वाचून पाहतों तों, अरे भगवान्! पोटांत धस्स झालें. माझ्या मित्रानें त्या वीटभर चिठीवर दोनच ओळी लिहिल्या होत्या:—

'मित्रा, मी आपल्या देहाचा नाश करण्यास गेलों, माझ्या मागें माझ्या कुटुंबाचा सांभाळ कर.'

गोंद्या! त्यावेळीं माझें मन मला काय बोललें असेल, त्याची तुला कल्पना करवेल रे? आणखी एकच पळ जर ती चिठी मीं पाहिली नसती तर त्या दिवशीं मी आपल्या प्रिय मित्रास मुकलों असतों. चिठी पाहतांच आंगरखा एकीकडे न घालतां, वेड्याप्रमाणें, मागील दाराकडील आंबरा-

ईत एक जुनाट विहीर होती तिकडे धांवत गेलों. या विहिरींत मी एकादे दिवशीं आपला जीव देईन, असें माझा मित्र वारंवार ह्मणत असे. गोंद्या, त्यावेळीं मी शुद्धीवर नव्हतों असें वाटतें. आडमार्गानें गेलों त्यामुळें धांवतांना दोन वेळां तर गडग्यावरून पडलों. विहिरीजवळ जातांच तींत धाडदिशीं उडी घातली. माझी विहिरींत उडी आणि माझ्या मित्राचें विहिरीचे तळापासून वर येणें, याचा एकच संधी झाला. त्याचें डोकें वर येतांच मीं त्याची शेंडी धरिली आणि त्यास पोंहत पोंहत पायरीजवळ आणिलें. त्यास शुद्धीवर येण्यास चांगल्या दोन घटका लागल्या. चांगला शुद्धीवर आल्यावर त्याणें माझ्या गळ्यास आपल्या गार व म्लान हातांनीं मिठी मारली आणि तोंडांतून पहिले शब्द हे काढले. 'हे प्रिय मित्रा, मीं सुखाची वाट धरली असतां, त्या वाटेच्या आड येऊन तूं मला पुनः दुःखांत आणिलें हा तुझा चांगुलपणा काय?'

तुला वेड्या असल्या गोष्टी सांगणें आणि बहिऱ्यापुढें गाणें, अगदीं सारिखें आहे. (क्षणभर वेळ गेल्या नंतर) जा आणि पाणी लौकर घेऊन ये.

गोविं०—होय आणतों.

गोविंदभट पाणी आणण्याकरितां घरांत गेल्यावर आपल्याशीं ह्मणतो—"रावसाहेबांची मोठी मौज आहे गोष्ट सांगण्याची—कोठचा शहाणा कोठे! एकादसमयीं तशी कोणी चिठी लिहिली ह्मणून काय सर्वच चिठ्यांत जीव देण्याचा मजकूर असतो? एक एक चमत्कार आहे बोलण्याचा, बुवा."

गोविंदभटजीनें पाणी आणून दिल्यानंतर नारायणरावजी तोंड धुतात आणि नंतर चहा घेऊन बाहेर जातात.

---

# भाग २३.

नारायणरावजी सेनापतीचे घरीं जाऊन चौकशी करितात तों सेनापति आपल्या सर्व माणसांसुद्धां दोन दिवस पूर्वींच साताऱ्या नजीक आपल्या वतनगांवीं निघून गेले असें त्यांस समजलें.

सेनापति आपल्यास अगर बाबासाहेबांस न कळवितां एकदम इतके जलदीनें निघून गेल्याचें ऐकून नारायणरावजीस मोठा अचंबा वाटला, परंतु सेनापतीस जलदीनें निघून जाण्यास तसेंच कांहीं कारण झालें होतें.

महाराजांच्या दुखण्याचा असा अकल्पित व दुःखकारक परिणाम झाल्यामुळें शहरांत सर्वांस तर दुःख झालेंच; परंतु त्या गोष्टीनें सेनापतीच्या घरीं सर्व प्रकारें अत्यंत दुःख झालें. महाराज बाबासाहेबांस दत्तक घेणार व बाबासाहेब महाराजांच्या मागें गादीचे मालक होणार हें मनांत आणून सेनापतींनीं आपली आवडती व एकुलती सुंदरा बाबासाहेबांस देण्याचें कबूल केलें होतें. सुंदरा राजसुखांत पडणार या विचारानें सेनापति व त्यांची बायको हीं परम आनंदांत होतीं; परंतु तो सर्व आनंद एकाएकीं नाहींसा झाला. महाराज आजारी असतां सेनापतीसुद्धां राज्यांतील यच्चयावत् मनुष्यांचीं मनें महाराजांच्या दुखण्याकडे लागलीं होतीं. त्यावेळीं कोणाच्याही मनांत स्वतःविषयीं कांहीं विचार आला नाहीं. त्यावेळीं महाराज हे आपले अन्नदाते आहेत, अथवा त्यांच्या जिवावर आपली उपजीविका आहे ह्मणून महाराजांविषयीं कोणी काळजी केली नाहीं. लोकांस जी त्यावेळीं अत्यंत काळजी लागली होती ती केवळ

महाराजांकरितांच होती; परंतु महाराज वारल्यानंतर लागलेंच प्रत्येक जण त्या दुःखकारक गोष्टीचा आपल्या स्वतांच्या स्थितीवर काय परिणाम झाला याचा विचार करूं लागला. कोणी ह्मणतो, " हर हर, देवा! ती दोन बिघे जमीन इनाम देण्याची संनद लिहून तयार झाली होती त्या सनदेवर महाराजांनीं तेवढी सही केली असती. " कोणी ह्मणतो " परमेश्वरा ! बाबासाहेबांचें लग्नाचें शेला पागोटें देण्यास महाराज जिवंत रहाते ! " इत्यादि, इत्यादि.

महाराज निवर्तल्यानंतर दुसऱ्या दिवशीं रात्रीं सेनापतीची बायको सेनापतीजवळ जाऊन बसली असतां ह्मणते.—

" दत्तविधान होईपर्यंत महाराजांस देवानें वांचविलें असतें ! "

ह्या वेळपर्यंत तिला महाराजांच्या मरणाचें खरें कारण समजलें नव्हतें. तें आतां तिला सेनापतींनीं सर्व सांगितलें. तें ऐकून तिला अत्यंत दुःख झालें; तें सुंदराकरितां झालें. पुढें राणीही कैलासवासी झाली; तेव्हां तर सर्वच आशा खुंटली. मग सुंदराची आई अत्यंत दुःखी होऊन आपल्या नवऱ्यास अश्रुभरित डोळ्यांनीं विचारितेः—

" आतां सुंदराचें कसें होईल? "

खरोखरीच, आपल्या सुंदराबाईचें आतां कसें होईल ? सुंदरीच्या मनाची मोठी निराशा झाली. तिला लागलेंच वाटलें कीं, जो सुखाचा काळ अगदीं समीप आला होता तो आतां दुरावला; परंतु तिच्या मनाची समूळ निराशा झाली नाहीं. तिला वाटलें कीं, " जें एकदां ठरलें तें आतां कसें फिरेल ? व कोण फिरवील ? आतां नाहीं तरी पुढें सर्व व्हावयाचें तें होईल. "

परंतु सेनापतींनीं व त्यांच्या बायकोनें, बाबासाहेबांबद्दल लागलाच निकाल करून टाकिला. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, बाबासाहेब महाराजांचे दत्तपुत्र होणार या खचित-पणावरच सुंदराविषयीं बेत केला होता. येरव्हीं सेनापतींनीं आपली मुलगी बाबासाहेबांस देण्याचें कधींच कबूल केलें नसतें. कारण सेनापति उत्तम कुळांतील होते. सातारच्या महाराजांशीं सेनापतीचा सोयरेसंबंध होता. ह्मणोन ज्या मुलाच्या आईबापाचा शोध नाहीं—ज्याचें नांव माहीत नाहीं—ठिकाण माहीत नाहीं— अशा मुलास ते आ-पली कन्या कशी देतील? बाबासाहेबांबद्दल तर आतां विचारच राहिला नाहीं. दुसऱ्या कोणास आतां आपलें सुंदर रत्न द्यावें याचा सर्व वेळ तीं नवरा बायको विचार करूं लागलीं. नगरांत आतां राहून कांहीं उपयोग नाहीं असें त्यांस वाटूं लागलें.

एके दिवशीं कमिशनर साहेबांकडून सेनापतीस बोला-वणें आलें. कचेरींत कमिशनर साहेबांनीं सेनापतीस कळ-विलें कीं, आपण या राज्यांतील थोडे दिवसांचे नोकर आहांत. आतां आपल्या चाकरीची जरूरी नाहीं. यासाठीं आपल्यास आणखी दोन वर्षेपर्यंत मात्र इंग्रज सरकारांतून प-गार मिळेल. मर्जी असल्यास दोन वर्षें येथें राहावें अथवा दोन वर्षांचें वेतन घेऊन दुसरा रोजगार पाहण्यास जावें. सेनापतींनीं लागलेंच आगाऊ वेतन घेण्याची इच्छा दाख-विली. त्याप्रमाणें त्यांस लागलीच खजिन्यावर वरात मिळाली.

सेनापति कमिशनर साहेबांच्या कचेरींतून घरीं परत आल्यानंतर आपल्या गांवीं जाण्याचा विचार करूं लागले. तथापि ते एकदम कोणासही न कळवितां कधीं गेले नसते.

नारायणरावजींस तरी त्यांणीं खचित कळविलें असतें. परंतु त्या रात्रीं कांहीं प्रकार घडून आला त्यामुळें त्यांणीं निघून जाण्याची फारच त्वरा केली.

बाबासाहेबांस आतां सुंदरा देतां येत नाहीं असें झाल्या नंतर सेनापतीवर सुंदराविषयीं मोठी काळजी येऊन पडली. मुलगी मोठी झाली असून जें उत्तम स्थळ ह्मणून योजिलें होतें व ज्यावर ते स्वस्थ राहिले होते तें गेलें, आतां दुसरें स्थळ कोठें पहावें, याचा सेनापतीस रात्रंदिवस निजध्यास लागला. मुलगी मोठी झाली ह्मणजे बापास जी अत्यंत काळजी उत्पन्न होत असते ती ज्यांणीं मुलींचीं लग्नें केलीं आहेत त्यांसच ठाऊक. इतरांस त्या काळजीची कल्पना करितां येणार नाहीं. जेवतां, खातां, बसतां, उठतां, निजतां—फार काय सांगावें—झोंपेंतून जागें होतांही ती काळजी त्या बापाच्या समोर मूर्तिमंत उभी असते. त्यास ती दुसऱ्या गोष्टीकडे लक्षच लावूं देत नाहीं.

सेनापति कमिशनर साहेबांच्या कचेरींतून परत आल्यावर रात्रीं त्यांचें नित्याप्रमाणें बराच वेळ आपले स्त्रीपाशीं सुंदराबद्दल बोलणें चाललें होतें. तें त्या रात्रीं सुंदरानें सर्व ऐकिलें असें वाटतें. पुढें पहांटेस सुमारें तीन वाजतां तीं नवराबायको जागीं झालीं; तेव्हां सेनापति ह्मणाले:—

सेना०—तर मग आतां येथून लौकरच निघावें हें चांगलें. पण काय ग, तूं रात्रीं बोललीस कीं निंबाळकराचा मुलगा आहे; पण त्यास कोणी पाहिलें आहे काय? तो आपल्या सुंदरा योग्य असला पाहिजे. नाहीं तर काय कामाचा?

से० स्त्री०—मुलगा चांगला आहे असें ह्मणतात. लिहिण्यां पुसण्यांत कसा आहे तें आह्मांस काय कळतें? पण घरचें बरें आहे, असें मी ऐकितें. तो पसंत नसला तर दाभाड्यांच्या घरांत एक आहे तो पाहावा. नाहीं तर त्या पाटणकरांचा मुलगा पहावा.

सेना०—अग कितीही पाहिले तरी पहिल्याची सर येणार आहे काय?

(इतक्यांत जवळच्या पलंगावर सुंदरा निजली होती तिकडेस कोणी सुसकारा टाकिला असा भास होतो).

सेना०—अग तें केवळ रत्न होतें. त्याचे कोणते ह्मणून गुण सांगू?

से० स्त्री०—खरेंच! पण करावाचें काय? ज्याणें त्याणें आपल्या नशिबानें घेतलें पाहिजे. सर्व प्रकारें चांगलें होतें; पण आतां तें बोलून काय उपयोग आहे!

(मग सुंदराच्या पलंगाकडेस दृष्टी करून ह्मणते).

"माझा जिवा! तुझें नशिब. त्यास कोणाचा उपाय आहे."

(मग उठून सुंदराकडेस जाते आणि ती डाव्या कुशीवर दंडावर गाल टेकून निजली होती तिचेकडेस पाहून ह्मणते.)

"इकडे पाहिलें का? ही झोंपेंत कशी दिसत आहे ती? हिचें हें लावण्य पाहून हिजवर कोणी समयीं दृष्ट पडेल असें वाटतें. खरेंच, या रूपास योग्य असा मुलगा मिळाला पाहिजे." (क्षणभर स्तब्ध राहून) "ब्रह्मदेवानें कोठें तरी नेमून ठेविला असेल."

(इतकें बोलून, ती ममताळू आई सुंदराच्या आंगावरचें पांघरूण सरलें होतें तें नीट करूं लागली. त्या वेळीं सुंदराच्या

एका डोळ्यांतून पाणी निघून तें तिच्या दुसऱ्या गाला-वरून वहात आहे असें तिणें पाहिलें. तेव्हां ती गालावरून व सुंदराच्या तोंडावरून हळूच हात फिरवून व आपलें तोंड तिचे तोंडाशीं नेऊन ह्मणतेः— )

" माझे बछडे, तूं कांहीं काळजी करूं नको ! तुझे योग्य असा तुला उत्तम नवरा पाहून त्याला देऊं बरें ! "

( इतक्यांत त्या ममताळू आईच्या गळ्यास दोन गोंडस व नाजूक हातांची घट्ट मिठी बसते. आणि तिच्या कानाशीं स्फुंदत स्फुंदत करुणास्वरांत शब्द होतात कीं:— )

" आई, एकवेळां तूं मला देऊन टाकलीस, आतां मला तूं दुसऱ्या कोणासग देणार ? "

सुंदराच्या तोंडाखालचा पलंगपोस अश्रूंनीं ओला झाला होता त्यावरून सुंदराचा रात्रभर काय व्यापार चालला होता तें व तिच्या मनाची काय स्थिति आहे तें सुंदराच्या आईनें जाणलें.

उजाडल्यावर सेनापतीनीं लागलेंच नगरांतून निघून जाण्याची तयारी केली व ते पुढें लागलेच आपल्या वतनाच्या गांवीं जाण्यासाठीं निघून गेले. कारण त्यांस वाटलें कीं आतां या नगरांतील वास आपल्यास सर्वतोपरी दुःखप्रद होईल.

# भाग २४.

नारायणरावजी सेनापतींच्या घरून मागें परतून आपल्या बिऱ्हाडीं आले आणि आपल्या खोलींत जाऊन पहातात तों बाबासाहेब खुर्चीवर बसलेले आहेत. सकाळीं बाबासाहेबांच्या हातची चिठी वाचून पाहिली होती त्यावरून बाबासाहेबांची वृत्ति आनंदी दृष्टीस पडेल असें नारायणरावजींचें अनुमान होतें; परंतु ते बाबासाहेबांचे तोंडाकडेस पाहतात तों त्यांचें तोंड नेहमींपेक्षां जास्त उदास दिसलें. तें पाहून त्यांस किंचित् भीति वाटली. आपल्यास कळलेली बातमी जर बाबासाहेबांस समजली तर त्यांस विशेष वाईट वाटणार आहे हें त्यांस ठाऊक होतें. तथापि ती बातमी त्यांस समजणें इष्ट होतें. ह्मणून ती लौकर व आपल्याकडून समजेल तर चांगलें असें नारयणरावजीस वाटल्यावरून ते ह्मणतातः—

नारा०—बाबासाहेब, मला वाटलें कीं तुह्मीं इतक्यांत बंगल्यावरून आलां नसाल. साहेबांची भेट झाली नाहीं वाटतें?

बाबा०—नाहीं.

नारा०—कां बरें? साहेब बंगल्यांत नव्हते कीं काय?

बाबा०—बंगल्यांत साहेब होते.

नारा०—मग भेट झाली नाहीं? असें कसें झालें?

या प्रश्नावर बाबासाहेबांनीं उत्तर दिलें नाहीं. त्यांच्या जिवास अत्यंत खेद झाला आहे, असें त्यांच्या चर्येवरून दिसूं लागलें. तें पाहून नारायणरावजीस पराकाष्टेचें वाईट वाटलें. ते पुढें कांहीं वेळ न बोलतां उगाच टेबलावरील दवतीचें झांकण खालीं वर करीत राहिले.

अशीं दहा मिनिटें गेलीं. नंतर—

नारा०—मी सेनापतींचे बिऱ्हाडाहून जाऊन आलों. सेनापति—

बाबा०—दोन दिवस झाले, सर्व माणसांसुद्धां साताऱ्याकडे निघून गेले. मला समजलें.

नारा०—आपल्यास कोठें समजलें ?

बाबा०—साहेबांचे बंगल्यावर समजलें.

नारा०—तेथें कोणी सांगितलें ?

" सरकारास रावसाहेब, मीं सांगितलें. मुजरा करितों रावसाहेब. "

असें ह्मणत तांबडें डगलें घातलेला व गळ्यांतील पट्ट्यावर रुप्याचें बकल असलेला असा एक उंच व धिप्पाड शरीराचा शिपाई खोलींत येऊन मुजरा करितो, व त्याच्या पाठीमागून एकवीस वर्षाच्या उमरीचा ज्वान बळकट बांध्याचे असा एक तरुण मुलगा येतो.

नारा०—जमादार तुह्मी काय ? बंगल्यावर तुह्मी असोन साहेब बाबासाहेबांस भेटले नाहींत असें कसें झालें ?

जमा०—साहेबांकडे वर्दी लावण्याचें काम आतां आमचेकडे नाहीं, रावसाहेब.

नारा०—तर! कोणी नवीन मनुष्य ठेविला आहे कीं काय?

जमा०—होय. दोनशें रुपये दरमहाचा.

" तो कोण ? "

" आमचे भाऊसाहेब. "

" ह्मणजे ! ह्मणतां काय जमादार ? "

" काय सांगावें, रावसाहेब ! या आमच्या भाऊसाहेबानें तर आह्मांस खालीं पहायाला लाविलें आहे. साहेबांस-

मोरचें सर्व काम ह्मणतो मी करणार. मजशिवाय साहेबां-पाशीं कोणी जाऊं नये किंवा बोलूं नये. आह्मांस ताकीद केली आहे कीं, मला कळविल्याविना साहेबांकडे कोणाचीही वर्दी लावूं नये. कोणी भेटण्यास आला ह्मणजे त्याची चिठी घेऊन प्रथम त्यास दाखविली पाहिजे. मग त्याणें साहेबां-कडे न्या ह्मणून ह्मटलें तर ती आह्मी साहेबांकडे न्यावी. नाहीं तर नाहीं. कधीं स्वारी स्वतांच घेऊन जात असते.

नारा०—ह्मणता काय जमादार?

जमा०—खरोखरीच सांगतों रावसाहेब. ह्या रामभाऊ-नें महाराज गेल्यापासून असें चालविलें आहे. सकाळ-पासून रात्रीं साहेब निजायास जाईपर्यंत तो साहेबापाशीं नाहीं तर निदान बंगल्यापाशीं तरी लुडबुडत असतो. सा-हेबानें ' सी—पॉ—य ' अशी हांक मारिली कीं स्वारी लगेच "साब ' ह्मणून ह्मणत पुढें जाते. असा लुचरेपणा आ-पण जन्मांत कधीं पाहिला नव्हता.

नारा०—पण असें करण्यांत हेतु तरी काय?

जमा०—रावसाहेब! आमच्या भाऊसाहेबांना करण्याचा हेतु लागत नाहीं. साहेबाजवळ काय तें आपलें एकल्याचें तोंड बोलतें एवढें त्याला लोकांस दाखवावेंसें वाटतें आ-णि दुसरें काय? आतांच आमचे हे सरकार साहेबांचे भे-टीस आले होते; तेव्हां मी रामभाऊला जाऊन कळविलें. तेव्हां ' साहेब एव्हां कामांत आहेत असें जाऊन सांग जा ' ह्मणून मला ह्मणतो. आणि हाच मनुष्य महाराज होते तेव्हां आमचे हे सरकार साहेबाच्या बंगल्याचे कंपांउंडांत जाऊन पोंहोंचले नाहींत तों हातांतील काम टाकून ना-पण होऊन कुतऱ्यासारिखा धांवत पुढें जात असे. परवांचे

दिवशीं सेनापति साहेब जातेसमयीं साहेबांस सलाम कर-
ण्यास आले होते तेव्हां त्यांस उगाच दोन तास बसायास
लाविलें. शिपायी प्यादे यांस तर दरघडीस शिवी आहेच.
हाताखालच्या कारकुनांस एक दिवसही बरा शब्द नाहीं.
इतका हाताखालच्या लोकांवर करडा अम्मल करितो;
परंतु साहेबापाशीं असा वागतो कीं गुलामही तसें वाग-
ण्यास शरमेल.

नारा०—जमादार, असें आपण बोलूं नये.

जमा०—बोलूं नये तर काय करावें रावसाहेब? आह्मांस
दोन पैसे मिळत होते ते यानें बंद केले. सर्वांची वर्दी
हा लावण्यास इच्छितो हा हलकेपणा कोठला? बेटा जातीचा
ब्राह्मण याची तरी कांहीं लाज असावी? एक दिवस साहेबां-
नीं आपले बुटलेरास हांक मारली, तों आपला हा पुढें. सा-
हेब ह्मणतो, "बटलरकु बोलो, आज गौका गोस मगाव."
तें ऐकून स्वारी लागलीच "अच्छा साब" ह्मणून तर तर
धांवत बबरजीखान्याकडे जाऊन साहेबांची वर्दी बु-
टलेरास सांगते. साहेबाच्या बुटलेरासही या स्वारीचा पराकाष्ठे-
चा राग येतो. जेवायाचेवेळीं बुटलेर हा साहेबापाशीं कोणाची
कांहीं शिफारस करणार तों पडद्याचे बाहेर खुर्चीवर स्वारी
नेहमीं बसलेली असायाची. बुटलेर मला एक दिवस विचा-
रतो, 'साहेबाचा हा शिरस्तेदार जातीचा आहे तरी कोण?
शिपायाचें तर काम करतोच. अर्धं मुर्धं माझेंही काम क-
रूं लागला आहे. उद्यांपासून साहेबांचें जेवण टेबलावर
स्वतः नेऊनही ठेवीत जाईलसें वाटतें.'

नारा०—जमादार! अरे! लहान तोंडीं मोठा घांस घेऊं
नये. कसा झाला तरी तो आज मोठा आहे.

जमा०—कशाचा रावसाहेब मोठा? पगार दोनशें रुपये मिळतो ह्मणून? असें आपण ह्मणा, मी कधीं ह्मणणार नाहीं. अशा पगारावर आणि पैशावर मोठेपणा मानला तर मोठे लोक छकड्यावारी मोजले जातील कीं! रामभाऊच्या आंगीं अभिमानाचा एक कण जर असता तर खचीत तो आपली अदबी थोडी तरी राखून वागता; पण त्याचे आंगीं अभिमान ह्मणून कांहीं नाहीं. पराकाष्ठेचें व अगदीं नीचपणाचें आर्जव करून साहेबाची मर्जी मिळवायाची हीच काय ती त्याची इच्छा. आणि मर्जी मिळवून करायाचें काय ह्मणून नाहीं विचारलें! हाताखालच्या लोकांवर कडी नजर चालवायाची. एकादे समयीं फार चवताळून ज्याच्या त्याच्या आंगावर फारच तोंड टाकूं लागला ह्मणजे आह्मी मनांत तेव्हांच समजावें कीं स्वारीची आज साहेबांकडून कांहीं तरी कामांत मोठी शिफारस झाली आहे. स्वारी नरम असली ह्मणजे समजावें, कीं, स्वारीस आज चांगले बूट मिळाले आहेत.

हें बोलणें फार लांबवें हें चांगलें नाहीं असें नारायणरावजीस वाटल्यावरून ते ह्मणतातः—

जमादार! तें असो. पण हा कोण? तुमचा मुलगा किं काय?

जमा०—होय. माझा मुलगा. मीं यास या आमच्या सरकारच्या पायांवर घालण्यासाठीं आणिला आहे. यशवंता, या पायांवर मस्तक ठेव. हे पाय आजपासून तुझे यजमान. ह्यांची आज्ञा हाच तुझा धर्म. आणि ती पाळणें हीच तुझी सद्गती. सरकार! डागलेल्या तोफेवर यास तुटून जाऊन पडण्यास आपण सांगितलें आणि तो जर गेला नाहीं तर तो माझे पोटचा नाहीं असें मी समजेन!

नारा०–जमादार! बाबासाहेबांस तुह्मी आज ही अमोल्य देणगी दिली त्याबद्दल तुमचे त्यांच्यावर फार उपकार आहेत.

बाबा०–जमादार! खरोखरीच मजवर हे तुमचे मोठे उपकार आहेत. मी स्वतः आपल्यावर जशी प्रीति करितों तशीच प्रीति यावर सदोदित करीन.

जमा०–यापेक्षां मला कांहीं जास्त नको. मी घेतों तर आतां रजा.

नारा०–ठीक आहे. यशवंतराव, तुह्मी आपले वडिलांस पोहंचवून या. आतां तुमचें हें घर बरें.

नंतर जमादार व यशवंतराव निघून जातात. मग—

नारा०–जमादार खऱ्या हाडाचा आहे.

बाबा०–त्याच्यासारखा दुसरा मनुष्य आढळणें कठीण आहे. असो. पण गुरुजी! या रामभाऊचा तुह्मांला चमत्कार नाहीं का वाटत? महाराज होते तेव्हांचाच गा हा रामभाऊ? किं दुसरा?

नारा०–अहो बाबासाहेब, तोच. पण तेव्हां तुह्मी पाहत नव्हतां तो किती आर्जवी होता तें! त्याचें तें आर्जव पाहून मी नेहमीं मनांत ह्मणत असें कीं हा नीच मनाचा मनुष्य आहे. बाबासाहेब, प्रत्येक मनुष्यास कांहीं स्वाभिमान पाहिजे. आंगांत लीनता असावी पण, त्या लीनतेस स्वाभिमानाची मर्यादा पाहिजे. मर्यादेच्या पलिकडे लीनता गेली कीं तिजला नीचपणाचें रूप आलेंच. मोठे मनाचा मनुष्य कधींही आर्जव करणार नाहीं. साधारण आर्जवांतही नेहमीं मनाचा हलकेपणा असतोच. आर्जवी मनुष्य नेहमीं कार्यसाधु असतो. कार्य साधलें ह्मणजे त्याचें आर्जव संपलें.

बाबा०—आर्जव संपलें ह्मणून कोण हाका मारितो ; परंतु जो पहिल्यानें फार आर्जवी होता तोच इतका उद्दाम व त्रासदायक आतां कसा झाला याचें मला मोठें आश्चर्य वाटतें.

नारा०—रामभाऊ हा अगदींच नीच होय. याच्या प्रतीचे पुरुष हे अगदीं अधम असून ते धिःकारास पात्र आहेत असें मी समजतों. या रामभाऊचा स्वभाव पाहिला ह्मणजे मजपाशीं मुंबईंत एक टिप्या ह्मणून कुत्रा होता त्याची आठवण होते. बाहेरून आलें कीं त्याणें अती आनंदानें माझ्या आंगावर उड्या माराव्यात. मी जरा पाय लावला कीं तो पाय जिभेनें चाटून माझे पुढें उताणें मागील दोन पायांत शेपटी घालून ती हालवीत पाठीवर पडून माझ्या पायाजवळ लोळावें ; आणि माझ्या पायांतील जोडे चाटावे. आनंदी मुद्रेनें दोन लाथा दिल्या, तरी त्यास फारच आनंद वाटावा ; आणि आपले अनिवार लाड चालले आहेत, असें त्याणें, आपली हळू हळू शेपटी हालवून व माझ्या तोंडाकडे पाहून, दाखवावें. येथपर्यंत पाहून मला आनंद होई. पण इतक्यांत जर कां एकादा परका कुतरा मजकडे पहात रस्त्यावरून चाललेला त्याणें पाहिला तर तो तत्काळ धांवत त्याचे आंगावर उगाच जाऊन तुटून पडत असे. तें पाहून मात्र मला वाईट वाटे, आणि मी त्याला ह्मणें, ' टिप्या, तूं केव्हा अगदीं नीच, अधम आहेस. अरे, तुझ्या जातीचा तो प्राणी निमूटपणें रस्त्यानें चालला होता ; त्याच्या आंगावर उगाच कां बरें जाऊन पडतोस? त्याणें तुझें काय केलें? तुजवर जशी मी ममता करितों त्याप्रमाणें आपल्यावरही करावी अशा इच्छेनें त्याणें दुरून किंचित् पाहिलें न पाहिलें तों इतका तुला राग येतो. मग तो ग-

झ्या जवळ आला तर मला वाटतें, त्याचा तूं प्राणच घेशी-ल. हा तुझा काय मोठेपणा झाला ?' बरें, मी कधीं रागाऊन त्यास जोरानें दोन लाथा मारल्या तर तो भीति पावून लांब एका कोंपऱ्यांत जाऊन बसे. त्या वेळीं गांवांतील एखादा उनाड कुत्रा जरी जवळून गेला तरी त्याजकडे न पाहतां माझी मुद्रा प्रसन्न झाली किंवा नाहीं हें जाणण्यासाठीं तो सर्व वेळ मजकडे पहात राही.

बाबा०— रामभाऊची तर तऱ्हा अगदीं या सारखी आहे.

नारा०— अगदीं सारखी. कांहीं अंतर नाहीं.

बाबा०— पण गुरुजी ! कुत्र्यास ज्ञान नाहीं, ह्मणून तो तसा वागतो यांत आश्चर्य नाहीं ; परंतु ज्ञानी व विद्यासंपन्न प्राण्यानें असें वागावें काय ? रामभाऊस इंग्रेजी भाषा येते ; नाहीं काय ?

नारा०— ह्मणजे ? तो माझ्याच वेळीं मुंबईत सोसाय-टीच्या शाळेंत होता. वीस, रुपयाची परीक्षाही झाली आहे.

बाबा०—मग त्यास जातीचा अभिमान, कांहीं तरी स्वाभिमान असावा. तो त्याचे ठायीं अगदींच कसा वसत नाहीं ?

नारा०— बाबासाहेब ! हे व यासारखेच आणखी दुसरे सद्गुण ह्मणजे केवळ इंग्रजी विद्येनें उत्पन्न होतात असें नाहीं. विद्येनें ते वृद्धिंगत पावून चांगले बळावतात मात्र. त्याचें बीजारोपण अंतःकरणांत झालेलें पाहिजे. जन्मतः परमेश्वराकडून बहुधा तें झालेलें असतें. पण त्या बीजास कोंब येण्यास मूळची जागा चांगली पाहिजे. आलेले कोंब अनेक कारणांनीं सुकून जातात किंवा क्षीण होतात. हे कोंब सुकले किंवा क्षीण झाले ह्मणजे त्यांच्याच जवळचे दुर्गुणांचे कोंबांस विद्यारूपी सर्व अन्न मिळाल्या-

मुळें तेच जोरदार होऊन जातात. मीं आपल्यास रात्रीं वि- द्येची महती सांगितली त्यावेळीं एक गोष्ट सांगायाची राहि- ली कीं विद्या ही एक मोठी शक्ति आहे. ती दुष्टाच्या हातीं असली तर समयीं तो तिच्या योगानें आपलांच फायदा क- रून घेईल, किंवा दुसऱ्याचा नाश करून आपला फायदा करून घेईल किंवा फारच दुष्ट असेल तर आपला फायदा कांहींच करून न घेतां दुसऱ्याचा केवळ विघ्नसंतोषी वृत्ती- नें नाश करील. तीच शक्ति जर कोणा उत्तम मनुष्याच्या हातीं असली तर तिचे परिणाम वर सांगितल्याचे अगदीं उलट होतील. समयीं तो आपल्या हितानहिताकडे कां- हीं लक्ष न देतां केवळ परोपकारबुद्धीनें त्या शक्तीचा उ- पयोग स्वजातीच्या ह्मणजे मनुष्यजातीच्या कल्याणाकडे करील. किंवा त्या शक्तीच्या योगानें आपलें हित करून त्या बरोबर आपल्या बंधुजनांचेंही हित करील. निदान आपलें स्वतःचेंच हित करून घेईल; पण त्या शक्तीनें तो दुसऱ्याचें अनहित कधींहीं करणार नाहीं.

बाबासाहेब आनंदानें मान डोलवितात आणि गुरूजी पुढें काय ह्मणतात तें ऐकण्यास उत्कंठा दाखवितात. तें पाहून—

नारा०—बाबासाहेब ! रामभाऊसारिखे जे आहेत ते फक्त " स्वहित " या एका देवतेची पूजा करणारे असतात. ते मनाचे अमंगळ असल्यामुळें आपल्या देवतेकरितां फु- लांसाठीं घाणेरड्या जागेंत जावें लागलें तरी निशंःकपणें जातात. घाणींत पाय माखला तरी त्याबद्दल त्यांस कांहीं वाटत नाहीं. फार तर काय; पण घाणेरड्या जागेंत फुलें आहेत असें जरी त्यांनीं पाहिलें तरी तीं फुलें तोडण्यास

आपला आतां पाय कसा माखवावा हें कधीं ते मनांत आणीत नाहींत.

बाबा०—खरेंच गुरूजी! रामभाऊची ती साहेबांच्या बबरजीखान्यांत जाऊन वर्दी सांगण्याची गोष्ट ऐकून मला फार वाईट वाटलें.

नारा०—अशा नीचपणानें आपल्या देशाचें मोठें अनहित होत आहे.

बाबा०—देशाचें अनहित कसें? मी समजतों कीं ज्याचें त्याचेंच कायतें नुकसान.

नारा०—त्याचें कशाचें नुकसान? अशा रितीनें वागणाराचा जनदृष्टीनें फायदा होतो; परंतु एकट्याच्या अशा वागण्यानें एकंदर देशाचें नुकसान होतें. मी रामभाऊची गोष्ट घेऊन बोलत आहें.

बाबा०—तें कसें?

नारा०—रामभाऊसारखे जर मोठ्या कामावरचे लोक आपल्या वरिष्ठांशीं अशा नीच आर्जवानें वागूं लागले तर कांहीं दिवसांनीं साहेब लोकांस तशाच नीच आर्जवांची गोडी लागेल. व सर्वच हिंदुलोक असे नीच व आर्जवी आहेत असें त्यांस वाटून ते मान देण्यास योग्य नाहींत असें मग ते समजूं लागतील. आपल्याविषयीं अशी समजूत, आपल्या देशाच्या राज्यकर्त्यांची होणें हें देशाच्या अनहितास कारण आहे.

हें बोलणें संपत आहे तों दहा वाजतात. मग—

नारा०—अरे दहा वाजले काय? बाबासाहेब! चला तर आतां स्नानास जाऊं.

# भाग २५.

जेवण झाल्यानंतर नारायणरावजी व बाबासाहेब दिवाणखान्यांत बसले असतां, नारायणरावजी बाबासाहेबांस ह्मणतातः——

नारा०— बाबासाहेब, मीं सकाळीं उठून बाहेर आल्यावर आपण उठलां किंवा नाहीं तें गोविंदास विचारिलें. तेव्हां त्याणें आपण पांच वाजतांच उठून कपडे करून बाहेर गेला असें सांगितलें; तें ऐकून प्रथमतः मी अगदीं चकित झालों. पुढें त्याणें मला आपली चिठी दिली ती पाहून माझा जीव स्वस्थ झाला; पण आपण इतक्या जरूरीनें कमिशनर साहेबांकडेस कां गेलां होतां?

बाबा०— गुरूजी, अपल्या रात्रीच्या उपदेशानें मला दोन तास चांगली झोंप आली. नंतर जागा झालों. तेव्हां मनांत आपला उपदेश घोळूं लागला. मनाचें समाधान कसें करावें या विचारांत मी अगदीं निमग्न झालों. आपल्या उपदेशानें ह्मणा, अथवा ईश्वरी कृपेनें ह्मणा, माझ्या मनास एका प्रकारचें धैर्य आलें; आणि माझें दुःख प्रयत्नेंकरून दूर होणारें नसल्यामुळें, प्राप्त झालेल्या स्थितींतच सुख मानून घेतलें पाहिजे; दुसरा कांहीं उपाय नाहीं, असें वाटलें. मग तसें सुख मानून घेण्यास या नगरांतील वास उपयोगाचा नाहीं असें मनानें लागलेंच घेतलें; ह्मणून उजेडतांच प्रथम कमिशनर साहेबांकडेस जाऊन त्यांची परवानगी घ्यावी असें वाटलें; ह्मणून साहेबांकडेस इतक्या जलदीनें गेलों. गुरूजी, एथून कोठें तरी निघून जावें असें बरेच दिवस मनांत घोळत होतें; परंतु निघून जावें असें आजपर्यंत मनांत येई ना. साहेबांच्या बंगल्यांतून आल्यापासून तर आतां एथें

मुळींच राहूं नये असें वाटत आहे; यासाठीं गुरूजी, आपण आतां कोठें तरी बाहेर निघून जाऊं चला.

नारा०— बाबासाहेब, मला आपला विचार पसंत आहे. माझ्या मनांत आतां आपण एथें राहूं नये असें आहे. एथें राहिल्यानें आपल्यास कांहीं सुख न होतां उलटें जास्त वाईट मात्र वाटत जाईल.

याप्रमाणें नारायणरावजी व बाबासाहेब यांणीं नगरांतून निघून जाण्याचा निश्चय केल्या नंतर, त्यांणीं आपला मनोदय कमिशनर साहेबांस कळविला. साहेबांनीं बाबासाहेबांस नगरांतून निघून बाहेर पाहिजे तेथें जाऊन राहण्याची परवानगी सरकारांतून आणविली. मुंबईहून हुकूम येण्यास पंधरा दिवस लागले.

बाबासाहेबांची वृत्ति आतां पूर्वीपेक्षां हुशारीची दिसूं लागली. मुंबईहून परवानगी येण्याच्या पूर्वीं एके दिवशीं बाबासाहेब व नारायणरावजी बोलत बसले असतां गोविंदभटजी हातांत पत्र घेऊन येतो आणि नारायणरावजींस ह्मणतो कीं: " हें पत्र सेनापतींनीं आपल्या गांवाहून पाठविलें आहे. त्यांचा मनुष्य खालीं आला आहे. त्याणें तें पत्र आपल्यापाशींच देण्यास सांगितलें आहे. "

नारायणरावजी तें पत्र घेऊन फोडतात आणि वाचतात. आणि बाबासाहेबांसमक्ष गोविंदानें पत्र आणून दिलें ह्मणून त्यास मनांत मूर्ख असें ह्मणतात.

या पत्रांत सेनापतींनीं आपण नगरांतून तावडतोब निघून जाण्याचें कारण साद्यंत लिहिलें होतें. हें पत्र फक्त नारायणरावजींनीं वाचावें या इराद्यानें तें सेनापतींनीं लिहिलें होतें. त्यांतील बाबासाहेबांस जेवढा कळविण्यासारखा

मजकूर होता तेवढा नारायणरावजींनीं बाबासाहेबांस तोंडीं कळवावा अशी त्यांत नारायणरावजीस विनंती केली होती.

पत्रांतील कांहीं मजकूर बाबासाहेबांच्या मनास लागणारा होता. सेनापतींनीं बाबासाहेबांच्या गुणांची अत्यंत तारीफ करून शेवटीं बाबासाहेबांचें कूळ माहीत नसल्यामुळें सुंदरा बाबासाहेबांस देतां येत नाहीं असें त्यांत लिहिलें होतें. पत्राचे खालीं ताजाकलम होतें त्यांत चारच ओळी होत्या. त्या अशाः—

" बाबासाहेबांस सुंदरा देतां येत नाहीं खरी पण तिणें आपलें सर्व मन बाबासाहेबांवर ठेविलें आहे. दुसऱ्या कोणाची गोष्ट काढली तर एकसारखी रडत असते. असें मोठें संकट आह्मांवर येऊन पडलें आहे, हें कसें पार पडेल तें पडो. कळावें."

पत्र वाचून झाल्यानंतर नारायणरावजी बाबासाहेबांकडे पाहतात. मग—

बाबा०—गुरूजी, आतां माझ्याबद्दल कांहीं काळजी करूं नका. सेनापति कां निघून गेले हें मी जाणतों; व (नारायणरावजीच्या हातांतील पत्र आपले हातांत घेऊन) या पत्रांत काय मजकूर आहे हेंही पण मी, गुरूजी, जाणतों. मी कोणाचा कोण हें माहीत नाहीं ह्मणून वगैरे या पत्रांत लिहिलेलें असावें. दुसरें यांत काय असायाचें आहे?

( असें ह्मणत पत्राकडे तें वाचण्याच्या इराद्यानें पाहूं लागतात. )

नारा०—बाबासाहेब, आपला तर्क खोटा नाहीं. या पत्रांत आपण ह्मणतां तसाच मजकूर आहे. पूर्वीच्या संकेताप्रमाणें आतां घडून येण्यास मार्ग राहिला नाहीं असें

त्यांणीं यांत लिहिलें आहे. परंतु तें पत्र सांप्रत आपण वाचण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तें कशास वाचतां ? तें वाचल्यानें आपल्यास जास्त वाईट मात्र वाटेल.

बाबा०—मला आतां जास्त वाईट वाटेल? गुरूजी! मला वाटत नाहीं कीं आतां माझ्या मनास कोणत्याही गोष्टीनें हल्लींपेक्षां कांहीं जास्त वाईट वाटेल. मला वाटतें कीं हल्लीं मी कालचक्राच्या फेऱ्यानें दुःखाच्या अगदीं तळाशीं जाऊन पोहोंचलों आहें. आतां माझी पाळी वर येण्याची आहे. जास्त खालीं जाण्याची नाहीं.

नारा०—बरें आहे तर. आपली मर्जी. आपण पत्र वाचावें. मी सेनापतींच्या माणसाशीं जरा बोलून येतों.

असें ह्मणून नारायणरावजी खालीं सेनापतीकडील मनुष्य उभा होता; त्याजकडेस गेले; आणि त्याजला सेनापतीकडील सर्वांचें कुशळ विचारून त्यास दोन दिवस रहाण्यास सांगितलें. आणि मग माडीवर बाबासाहेबांकडे परत येऊं लागले तों माजघरांत गोविंदभटजीस पाहिलें. त्यास पाहून जरा उभे राहून ह्मणतातः—

नारायण०—गोविंदा, आजही तूं पत्र देण्याचे कामीं मूर्खपणा केलास बरें?

गोविंदा—( तें ऐकून ) तो कसा रावसाहेब?

नारायण०—अरे, आजचें पत्र ताबडतोब बाबासाहेबांच्या समक्ष आणून द्यावयाचें नव्हतें.

असें ह्मणून माडीवर चालते झाले.

गोविंदभटजी आपल्याशीं ह्मणतो, धन्य आहे रावसाहेबांची! मला त्यांजकडून पत्रासंबंधीं सर्व नियम तरी एकदां विचारले पाहिजेत.

इकडे नारायणरावजी माडीवर हलके पावलानें येऊन बाबासाहेबांनीं पत्र वाचून ठेविलें किंवा नाहीं तें दाराआड उभे राहून पाहूं लागले; तों बाबासाहेबांच्या हातांत तें पत्र आहे व त्याकडे बाबासाहेबांनीं खालीं मान घालून एकाग्र दृष्टि लावली आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तें पाहून नारायणरावजी हलके पावलानें बाबासाहेबांच्या खुर्चीच्या मागें जातात आणि मागें उभे राहून आपले दोन हातांची बाबासाहेबांच्या गळ्यास अत्यंत प्रेमानें मिठी घालतात आणि आपलें तोंड बाबासाहेबांच्या तोंडाशीं नेऊन ह्मणतात:—

" बाबासाहेब, मी आपल्यास सांगितलें नव्हतें कीं हें पत्र वाचून आपल्या मनाला व्यर्थ दुःख मात्र होईल. "

तें ऐकून बाबासाहेबांच्या डोळ्यांतून अश्रूचा एक बिंदु त्या पत्रावर पडतो. तो पाहून, नारायणरावजी पुन्हा ह्मणतात:—

" बाबासाहेब, हें काय बरें असें ! आतांच आपण काय बरें ह्मटलें होतें ? "

बाबासाहेब डाव्या हातानें डोळे साफ करून नारायणरावजींकडे तोंड करितात आणि ह्मणतात:—

" गुरूजी, आनंदाची बातमी ऐकून मला दुःख होईल असें वाटलें नव्हतें; आणि खरें पुसाल तर हे अश्रु आनंदानें डोळ्यांतून पडले किंवा दुःखानें पडले, तें मला यावेळीं सांगतां येत नाहीं.

ह्या वेळीं नारायणरावजी पत्राकडे पाहतात तों पत्रांतील ताजाकलम हें बाबासाहेबांच्या समोर असून त्या ताजाकलमाच्या ओळीवर बाबासाहेबांच्या डोळ्यांतील अश्रुबिंदु पडला होता, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

बाबासाहेब पुढें ह्मणतातः—


" ते कशानेंही [illegible]; पण, गुरूजी, आतां मी आपल्यास खरोखर सांगतों कीं हे बिंदु आजपर्यंत जें सर्व [illegible] मी भोगलें त्याजबद्दल आहेत. यापुढें झाल्या गोष्टींबद्दल या डोळ्यांतून कधींही अश्रु पडणार नाहींत, असें [illegible] खात्रीपूर्वक सांगतों. मी आतां पूर्वींचा [illegible] आयुष्यास भूतकाळच नाहीं असें मी आतां समजणार. गुरूजी, आतां मजविषयीं आपण खरोखरीच कांहीं काळजी करूं नये.

बाबासाहेब बोलल्याप्रमाणें वर्तले, कारण त्या पुढें त्यांची वृत्ति नेहमीं आनंदाची राहिली. नगरांतून निघते-समयीं कदाचित् त्यांस मागील स्मरण होऊन वाईट वाटेल अशी नारायणरावजींस भीति होती; परंतु तसें कांहीं झालें नाहीं. निघण्याची तयारी चालली असतांही बाबासाहेबांची वृत्ति आनंदांत होती.

सर्व तयारी झाल्या नंतर नारायणरावजी व बाबासाहेब सातान्यावरून पायमार्गानें मुंबईस जाण्यास निघाले. बरा-बर गोविंदभटजी व जमादारांचा मुलगा यशवंता असे होते.

बाबासाहेब नगरांतून निघून गेले त्या दिवशीं नगर-वासी जनांनीं बाबासाहेबांचा कसा निरोप घेतला व आपलें दुःख कसें प्रदर्शित केलें हें सांगण्याच्या भरीस आह्मी पडत नाहीं. त्या गोष्टी वाचकांच्या कल्पनेवर सोंपवून आ-ह्मीं त्यांची तूर्त रजा घेतों.

## पूर्वार्ध समाप्त.



पुणे